# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र

# जागतिकीकरण आणि समाज

**(Globalization and Society)**

**सत्र–३ : पेपर क्रमांक** SOE 023

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१६
**तृतीय आवृत्ती :** २०१७
सुधारित चौथी आवृत्ती : २०२१
एम. ए. भाग २ (सत्र ३ : जागतिकीकरण आणि समाज) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-630-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

एम. ए. भाग-२, सत्र ३ साठी 'जागतिकीकरण व समाज' या ऐच्छिक पेपरची निवड करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. मित्रानो आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग म्हणून ओळखले जाते. जागतिकीकरणाचा समाजावर मोठा प्रभाव पडला आहे. त्यामुळे समाजशास्त्रात जागतिकीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणूनच हा पेपर अभ्यासक्रमात ठेवला आहे.

''जागतिकीकरण आणि समाज'' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जागतिकीकरण आणि त्याची गतिमानता, जागतिकीकरणाची माध्यमे, जागतिकीकरण आणि संस्कृती आणि जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम या घटकांचा समावेश केला आहे. या चार घटकांचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे यथार्थ ज्ञान होईल. तसेच जागतिकीकरणाचा समाजावरील प्रभावही लक्षात येईल.

शेवटी मी सर्वप्रथम मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्राचे संचालक, अभ्यास मंडळाचे सदस्य आणि दूरशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. वरील सर्वांना त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. दयावती पाडळकर**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम
कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक

| **लेखन सहभाग** | **सत्र–३ घटक क्रमांक** |
|---|---|
| **प्रा. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली. | १, २, ३, ४ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३, ४ |
| **डॉ. दयावती पाडळकर**<br>मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम<br>कन्या महाविद्यालय, कडेगांव | ४ |

## ■ संपादक ■

**प्रा. डॉ. दयावती पाडळकर**
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम
कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका



| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | जागतिकीकरण आणि त्याची गतिमानता | १ |
| २. | जागतिकीकरणाची माध्यमे | २४ |
| ३. | जागतिकीकरण आणि संस्कृती | ४४ |
| ४. | जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम | ६३ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# जागतिकीकरण आणि त्याची गतिमानता

(Globalization and its Dynamics)

**घटक संरचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ जागतिकीकरणाचा अर्थ
- १.२.२ जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्ट्ये
- १.२.३ जागतिकीकरण आणि वैश्विक भांडवलशाही
- १.२.४ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे

१.३ सारांश

१.४ स्मरणार्थ संज्ञा

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास:

- जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्ट्ये सांगता येतील.
- जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांच्यातील संबंधाचे आकलन होईल.
- जागतिकीकरणाचे फायदे व तोटे यांचे आकलन होईल.

## १.१ प्रास्ताविक

या पेपरमध्ये तुम्ही जागतिकीकरण व समाज यांचे अध्ययन करणार आहात. कोणताही समाज आपणास स्थैर्य प्राप्त व्हावे यासाठी प्रयत्नशील असतो. तथापि, कोणताही समाज कधीच पूर्णतः स्थीर नसतो. त्यामध्ये सतत परिवर्तन होत असते. समाजातील संस्था, संघटना, नियमने, मूल्ये,

आचारविचार, इत्यादीमध्ये बदल होत असतात व या बदलांमुळे समाजाच्या संरचनेतही बदल होत असतात. समाजाच्या संरचनेत होणाऱ्या बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. समाजशास्त्र हे समाजाचा अभ्यास करते. समाजाचा अभ्यास करताना समाजाची संरचना कशी आहे हे जसे अभ्यासावे लागते तसेच समाजच्या संरचनेत कसे बदल होतात हे देखील अभ्यासावे लागते. मानव समाजात बदल घडवून आणणाऱ्या विविध प्रक्रिया सतत सुरू असतात. औद्योगिक क्रांतीनंतर मानव समाजात औद्योगिकीकरण, नागरिकरण, पाश्चिमात्त्यकरण, आधुनिकीकरण अशा अनेक प्रक्रिया सुरू झाल्या. या प्रक्रियांचा प्रभाव पडून मानव समाजात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. जागतिकीकरण ही देखील अशीच एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे जगातील सर्व समाजात अनेक लक्षणीय व महत्वपूर्ण बदल घडून येण्यास चालना मिळाली आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा समाजावर पडणारा प्रभाव अभ्यासणे आवश्यक ठरले आहे. यातूनच समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकीय विचारवंत, राज्यकर्ते, समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, प्रशासक इत्यादी मंडळी जागतिकीकरणाच्या अध्ययनाकडे वळलेले आहेत.

## १.२ विषय विवेचन

जागतिकीकरण ही सद्यःकालीत प्रक्रिया असून ती जगभर सुरू आहे. औद्योगिकीकरण, पाश्चिमात्त्यकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांचा विस्तारीत असा पुढचा टप्पा म्हणजे जागतिकीकरण होय. १९८० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात आर्थिक सुधारणेचे वा पुनर्रचनेचे जे कार्यक्रम सुरू झाले, त्यातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जागतिकीकरण ही संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणारी प्रक्रिया आहे. किंवा जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे ती मूलतः आर्थिक प्रक्रिया ठरते. तथापि, या प्रक्रियेस आर्थिक पैलूबरोबरच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक असे अनेक पैलू आहेत. म्हणून ती एक सर्वस्पर्शी व संकीर्ण अशी प्रक्रिया आहे. अशा या प्रक्रियेचे स्वरूप आपण या पहिल्या घटकात समजावून घेणार आहोत. त्यासाठी या घटकाचे चार विभाग पाडले आहेत. पहिल्या विभागात जागतिकीकरणाचा अर्थ, दुसऱ्या विभागात त्याची प्रभेदक वैशिष्ट्ये, तिसऱ्या विभागात जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही व चौथ्या विभागात जागतिकीकरणाचे फायदे व तोटे यांचे विवेचन केलेले आहे.

### १.२.१ जागतिकीकरणाचा अर्थ (Meaning of globalization)

जागतिकीकरण ही अत्यंत संकीर्ण व मानवी जीवनाच्या विविध पैलूशी संबंधित असणारी अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे सोपे नाही. वेगवेगळ्या अभ्यासकांनी जागतिकीकरणाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. त्यापैकी कांही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. **दिपक नय्यर** – एखाद्या राष्ट्राचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

२. **श्रवणकुमार सिंग** – आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करून तेथे जगातील साधनसामग्रीचे व भांडवलाचे सुलभ अभिसरण निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

३. **संयुक्त राष्ट्रसंघाच्या पश्चिम आशियासाठी असलेल्या आर्थिक व सामाजिक आयोगाच्या मते** – वस्तू, भांडवल, सेवा, आणि श्रम यांचा प्रवाह सुलभ करण्यासाठी राष्ट्रांच्या सीमांमधील अडथळे काढून टाकणे वा कमी करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

४. **जागतिक बँक –** जागतिकीकरण म्हणजे –

अ) उपभोग्य वस्तूंच्या सर्व वस्तूंच्या आयातीवरील नियंत्रण समाप्त करणे.

ब) आयात शुल्काचे दर कमी करणे.

क) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे होय.

वरील चारही व्याख्या या आर्थिक दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. कांही विद्वानांनी जागतिकीकरणाची व्याख्या वेगळ्या दृष्टिकोनातून केलेली आहे.

५. **ॲन्थनी गिडेन्स** – जगातील विविध लोकांमध्ये व क्षेत्रामध्ये वाढत असणारी पारस्पारिकता व परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय. ही पारस्पारिकता आर्थिक व सामाजिक संबंधातील तसेच स्थळकाळातील अंतर मिटवून टाकते.

६. **एम. अल्ब्रो आणि ई किंग** – ज्या प्रक्रियेद्वारे जगातील लोक एकाच समाजात एकत्रित होतात, त्या प्रक्रियेस जागतिकीकरण असे म्हणतात.

७. **बायलिस आणि स्मिथ** – जगातील वेगवेगळया प्रदेशातील लोकांमध्ये वाढत जाणारे आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यापारी व सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

८. **गीलपीन** – प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.

९. **चंद्रकांत खंडागळे** – जगातील विविध लोक, राष्ट्रे वा समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करुन त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

वरील विविध व्याख्यांच्या आधारे जागतिकीकरणाचा अर्थ आपणास तीन दृष्टिकोनातून सांगता येईल.

अ) आर्थिक दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करून तिच्याशी सर्व राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था जोडणे किंवा एकात्म करणे होय.

ब) सामाजिक दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे जगातील विविध लोक, राष्ट्रे वा समाज यांच्यात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून त्यांना एकाच जागतिक व्यवस्थेत सामील करणे होय.

क) राजकीय दृष्टिकोनातून जागतिकीकरण म्हणजे विकसित अशा प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारावयास लावणे होय.

थोडक्यात जागतिकीकरण ही जगातील विविध लोक, राष्ट्रे व समाज यांच्यातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंधाची जागतिक व्यवस्था निर्माण करणारी प्रक्रिया आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** (Check your progress) **क्र. १**

अ) **बहुपर्यायी प्रश्न** (Multiple choice questions)

१) सामाजिक परिवर्तन म्हणजे काय?

अ) सामाजिक परिवर्तन ब) समाजसंरचनेतील परिवर्तन

क) सामाजिक जीवनातील परिवर्तन ड) संस्कृतीतील परिवर्तन

२) कोणत्या कार्यक्रमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली?

अ) समाजसुधारणेच्या कार्यक्रमातून ब) आर्थिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमातून

क) राजकीय सुधारणेच्या कार्यक्रमातून ड) सांस्कृतिक परिवर्तनाच्या कार्यक्रमातून

३) आर्थिकदृष्ट्या जागतिकीकरण म्हणजे काय?

अ) जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे ब) जागतिक व्यवस्था निर्माण करणे

क) विकसित राष्ट्रांची धोरणे स्वीकारणे ड) स्थानिक अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे

४) जागतिकीकरणात कोणत्या सीमांचे उल्लंघन होत आहे?

अ) सामाजिक-सांस्कृतिक ब) आर्थिक-औद्योगिक

क) भौगोलिक-राजकीय ड) व्यापार-वाणिज्य

५) जागतिकीकरणात कोणती राष्ट्रे आपली ध्येयधोरणे इतर राष्ट्रांवर लादीत आहेत.

अ) अविकसित राष्ट्रे ब) विकसनशील राष्ट्रे

क) राष्ट्रराज्ये ड) विकसित अशी प्रभुत्त्वशाली राष्ट्रे

६) जागतिकीरण ही कोणत्या प्रकारची प्रक्रिया आहे.

अ) साधी ब) सुलभ क) संकीर्ण ड) स्वाभाविक

### १.२.२ जागतिकीकरणांची प्रभेदक वैशिष्ट्ये (Distinctive Characteristics of Globalization)

जागतिकीकरणाचा अर्थ व व्याख्या अभ्यासल्यानंतर आता तुम्ही त्याची प्रभेदक वैशिष्ट्ये समजावून घेणार आहात. प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे जागतिकीकरण ही औद्योगिकीकरण, पाश्चिमात्त्यकरण, आधुनिकीकरण यांच्याप्रमाणेच सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी एक प्रक्रिया आहे. तथापि; जागतिकीकरण ही इतर प्रक्रियांहून बरीचसी आगळीवेगळी अशी प्रक्रिया आहे. कारण ती प्रक्रिया इतर प्रक्रियापेक्षा अधिक व्यापक, सार्वत्रिक, सर्वस्पर्शी व संकीर्ण किंवा गुंतागुंतीची अशी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे वेगळेपण समजण्यासाठी तिची प्रभेदक किंवा व्यवच्छेदक वैशिष्ट्ये अभ्यासणे आवश्यक ठरते. एखाद्या वस्तूचे प्रभेदक वैशिष्ट्य म्हणजे असे वैशिष्ट्य की जे फक्त त्याच वस्तूचे वैशिष्ट्य असते व अन्य वस्तूंचे नसते. किंवा असेही म्हणता येईल की एखाद्यी वस्तू तिच्या ज्या वैशिष्ट्यामुळे इतर वस्तूपासून वेगळी ठरते किंवा ती वस्तू व इतर वस्तूंमध्ये भेद करता येतो त्यास प्रभेदक वैशिष्ट्य असे म्हणतात. जागतिकीकरणाची अशी कांही वैशिष्ट्ये आहेत की ज्यांच्यामुळे ही प्रक्रिया इतर प्रक्रियांपासून वेगळी आहे हे लक्षात येते. जागतिकीकरणाची प्रक्रिया व इतर प्रक्रिया यांच्यात भेद दर्शविणारी जागतिकीकरणाची जी वैशिष्ट्ये आहेत त्यांना जागतिकीकरणाची प्रभेदक वैशिष्ट्ये असे म्हणता येते. जागतिकीकरणाची कांही ठळक अशी प्रभेदक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मिती** – संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे पहिले वैशिष्ट्ये आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था ह्या जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्म करणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणात विविध राष्ट्रांतील भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठा, श्रम, वस्तू व सेवा इत्यादींचे एकीकरण करून विशाल आकार असलेल्या जगाचे प्रत्यक्ष व्यवहार करण्यासाठी एका लहान खेड्यात रूपांतर होणे अपेक्षित आहे. या प्रक्रियेत देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्याने कोणत्याही देशातील उत्पादीत वस्तू जगात कोठेही विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे संपूर्ण जगासाठी एकच बाजारपेठ तयार होऊन जग हे जणू एक खरेदीविक्रीचे संकुल (Shopping Complex) बनले आहे. भारतासारख्या विकसनशिल देशांच्यादृष्टीने जागतिकीकरण म्हणजे परकीय कंपन्यांना भारतात विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी सोईसुविधा उपलब्ध करून देणे, भारतीय कंपन्यांना परकीय कंपन्यांच्यासहकार्याने उद्योग उभारण्यास परवानगी देणे, जकात व आयात शुल्क कमी करून आयातीच्या उदारीकरणाचे कार्यक्रम राबविणे, परकीय भांडवल, तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळ यांचे स्वागत करणे होय. अशाप्रकारे जागतिक बाजारपेठ किंवा अर्थव्यवस्था निर्माण करणे हे जागतिकीकरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट आहे.

**२) जागतिक व्यवस्थेची निर्मिती** – साधारणतः जागतिकीकरण ही एक आर्थिक प्रक्रिया मानली जाते. तथापि, आधिक व्यापक दृष्टीने विचार केल्यास ती एक सामाजिक प्रक्रिया आहे हे लक्षात येते. कारण या प्रक्रियेत जगातील विविध समाजांचे एकीकरण करून एक जागतिक व्यवस्था (World or global system) निर्माण करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात **जार्ज मॉडेलस्की** म्हणतात की ही जगातील विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेने

लोकांना जगात कोठेही मुक्तपणे स्थलांतर करण्याचे स्वांतत्र्य मिळवून दिले आहे. वाहतुकीची प्रगत साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्याने असे स्थलांतर वाढत चालले आहे. व्यापार, उद्योग, नोकरी, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने लोक जगात कोठेही स्थलांतर करु लागले आहेत. त्यांची जीवनशैली एकसारखी बनत चालली आहे. त्यांच्या आकांक्षा, सवयी, मूल्ये यांच्यात समरूपता येऊ लागली आहे. संप्रेषण माध्यमे व माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे यामुळे विभिन्न राष्ट्रांतील लोकांमध्ये त्वरीत आंतरक्रिया होऊ लागल्या आहेत. जगात कोठेही घडलेल्या घटनेचा प्रभाव संपूर्ण जगावर पडू लागला आहे. एका देशात वा समाजात उद्भवलेली समस्या ही संपूर्ण जगास आपली समस्या वाटू लागली आहे. याचा परिणाम म्हणून विभिन्न समाजातील वा देशातील लोकांत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होऊन ते वाढू लागले आहेत. लोकांच्या मानसिक कक्षा रूंदावून त्यांच्यावर असणाऱ्या भौगोलिक व राजकीय सीमा नष्ट होत आहेत. स्थळकाळाचे अंतर कमी होऊन ''विश्वची माझे घर'' हा दृष्टिकोन प्रत्यक्षात साकारू लागला आहे. परिणामी, जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास चालना मिळाली आहे.

**३) उदारीकरण व खाजगीकरण या प्रक्रियांना चालना** - जागतिकीकरणात उदारीकरण व खाजगीकरण यांना मोठी चालना मिळाली आहे. जागतिक बँकेच्या मते तर आर्थिक उदारीकरण करणे व सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करणे म्हणजेच जागतिकीकरण होय. उदारीकरण व खाजगीकरण या दोन जागतिकीकरणाशी संलग्न असणाऱ्या प्रक्रिया आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्रांना आर्थिक उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडले आहे. कारण या दोन प्रक्रियांशिवाय जागतिकीकरण होणे शक्य नाही. म्हणून या दोन प्रक्रियांचे स्वरूप थोडक्यात समजावून घेऊ.

**उदारिकरण** - उदारिकरण म्हणजे एखाद्या गोष्टीवरील निर्बंध वा नियंत्रणे काढून टाकणे किंवा कमी करणे होय. आर्थिक उदारीकरण म्हणजे आर्थिक प्रक्रियेवरील निर्बंध वा नियंत्रणे काढून टाकणे वा कमी करणे होय. **चंद्रकांत खंडागळे** यांच्या मते उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग, गुंतवणूक, श्रमपुरवठा इत्यादी आर्थिक प्रक्रियांवर असलेले अनावश्यक शासकीय निर्बंध, नियंत्रणे व नियमने अधिकाधिक शिथील किंवा कमी करणे म्हणजे उदारीकरण होय. **एम. रामनजनेयुल** यांच्या मते आर्थिक उदारीकरण म्हणजे गुंतवणूक, आयात व उत्पादन यावर असलेले अनावश्यक निर्बंध, नियंत्रणे व परवाने मोडीत काढणे होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्रांनी आर्थिक प्रक्रियांवर असणारे अनिष्ट निर्बंध एकतर शिथील केले आहेत किंवा काढून टाकले आहेत. उदारीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगांना परवाना मुक्त करणे, परकीय गुंतवणूकीस परवानगी देणे, निर्यातीवरील निर्बंध उठवून आयात मुक्त करणे, परकीय चलनाचे व्यवहार नियंत्रण मुक्त करणे, विदेशी बँकाना प्रवेश देणे, करपध्दती साधी व सोपी करणे, भांडवल व नाणेबाजारात पारदर्शकता आणून त्याद्वारे परकीय गुंतवणूक आकर्षित करणे इत्यादी तरतुदी केल्या जात आहेत.

**खाजगीकरण** - संकुचित अर्थाने खाजगीकरण करणे म्हणजे शासकीय (सार्वजनिक) उद्योगाची मालकी खाजगी क्षेत्राकडे देणे तर व्यापक अर्थाने खाजगीकरण करणे म्हणजे शासकीय उद्योगाच्या मालकीहक्कात बदल करून किंवा बदल न करताही त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण खाजगी क्षेत्राकडे देणे होय. **चंद्रकांत खंडागळे** यांच्या मते खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक उद्योगाची मालकी खाजगी

क्षेत्राकडे किंवा त्याच उद्योगातील कर्मचाऱ्यांकडे देणे किंवा तो उद्योग भाडेपट्टीने खाजगी क्षेत्रास चालविण्यास देणे होय. **डी. आर. पेंडसे** यांच्या मते देशाच्या आर्थिक व्यवहारातील शासनाचा किंवा सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विविध राष्ट्रे खाजगीकरणाचे धोरण राबवू लागली आहेत. १९७० पूर्वीच इंग्लंडमध्ये अराष्ट्रीयकरण (Denationalization) या नावाने खाजगीकरणास सुरुवात झाली. **मार्गारेट थॅचर** (इंग्लंडच्या तत्कालीन पंतप्रधान) यांनी इंग्लंडमध्ये अनेक सरकारी उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविले. १९८० नंतर फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, जपान, तुर्कस्थान या देशानी तर **मिखाईल गार्बोचेव्ह** यांनी रशियात हे धोरण राबविले. पुढे इतरही साम्यवादी राष्ट्रांनी (पोलंड, रुमानिया, बल्गेरिया इ.) सरकारी उद्योगाचे खाजगीकरण केले. आज जागतिकीकरणात सहभागी झालेल्या बहुतेक विकसनशिल राष्ट्रांनी खाजगीकरणास सुरुवात केली आहे. थोडक्यात उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे हे जागतिकीकरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट आहे.

**४) विविध माध्यमे** – जागतिकीकरणाची प्रक्रिया ही विविध माध्यमांच्याद्वारे गतीमान झालेली आहे. ही माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) **आंतरराष्ट्रीय संघटना** – उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी.

ब) **प्रादेशिक संघटना** – उदा. अमेरिकन राज्य संघटना, आफ्रिकन ऐक्य संघटना, युरोपियन मुक्त व्यापार संघ, सार्क इत्यादी.

क) **बहुराष्ट्रीय महामंडळे** – उदा. पाँड्स, युनिलिव्हर, पेप्सी, कोका-कोला इ.

ड) **बिगरशासकीय संघटना** – उदा. अम्नेस्टी इंटरनॅशनल, रेडक्रॉस, स्काऊट्स अँड गाईड्स, मानवी हक्क आयोग इ.

ई) **जनसंप्रेषण साधने** – उदा. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट, इत्यादी.

वरील विविध माध्यमांमुळे जगातील विविध राष्ट्रांत वा समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध मोठया प्रमाणात निर्माण होऊन त्या संबंधात सतत वाढ होत आहे. तसेच राष्ट्राराष्ट्रातील व समाजासमाजातील परस्परावलंबनही वाढत चालले आहे. याचा परिणाम म्हणून सर्व राष्ट्रे व समाज हे एकाच जागतिक व्यवस्थेत सामील होऊ लागले आहेत. थोडक्यात विविध माध्यमांच्याद्वारे जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

**५) विकसित राष्ट्रांचे प्रभुत्त्व** – जागतिकीकरणात सर्व जगाची एकच किंवा सामाईक अशी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होत आहे. तत्त्वतः या नव्या जागतिक व्यवस्थेत सर्व राष्ट्रांचा समान सहभाग अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र सर्वांचा समान सहभाग आढळत नाही. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, कॅनडा व रशिया या आठ विकसित राष्ट्रांचे जागतिकीकरणात प्रभुत्त्व वा वर्चस्व (Dominance) निर्माण झालेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) जागतिक बँक (WB) आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) जागतिक व्यापार संघटना (WTO) इत्यादी आंतरराष्ट्रीय संघटना ह्या या आठ विकसित राष्ट्रांच्या प्रभावाखाली आहेत. त्यामुळे ही विकसित राष्ट्रे आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक ध्येयधोरणे व मूल्ये इतर राष्ट्रांवर लादत

आहेत. इतर राष्ट्रे ही विकसनशिल असल्याने ती त्यांच्या विकासासाठी या विकसित राष्ट्रांवर व आंतरराष्ट्रीय संघटनावर मदतीसाठी अवलंबून आहेत. त्यामुळे त्यांना विकसित राष्ट्राचे वर्चस्व स्वीकारावे लागत आहे. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित राष्ट्रांचे विकसनशिल राष्ट्रांवर प्रभुत्त्व निर्माण झाले आहे. त्यामुळे नव्या जागतिक व्यवस्थेत असमतोल आढळतो.

**६) गतिशिलतेत वाढ** – जागतिकीकरणात व्यक्तिची व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वाहतूकीच्या व दळणवळणाच्या प्रगत साधनांचा मोठा विस्तार घडून आला आहे. परदेश प्रवासावरील निर्बंध शिथील झाले आहेत तसेच हा प्रवास स्वस्तही झाला आहे. त्यामुळे व्यापार, व्यवसाय, शिक्षण, पर्यटन, नोकरी इत्यादीच्या निमित्ताने व्यक्ती जगात कोठेही स्थलांतर करु लागली आहे. राज्यदेखील व्यक्तीला त्यासाठी मदत व प्रोत्साहन देत आहे. तसेच उच्च गुणतत्तेच्या परकीय व्यक्तींना विविध राष्ट्रे आमंत्रित करु लागली आहेत. काही राष्ट्रांनी तर दुहेरी नागरिकत्त्व देणे सुरू केले आहे. याचाच अर्थ असा की, पूर्वी व्यक्तीचा विचार एका विशिष्ट राष्ट्राचा नागरिक म्हणून होत असे. आज मात्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तिचा विचार हा अखिल मानव समुदायाचा सदस्य म्हणून होऊ लागला आहे. त्यामुळे व्यक्ती ही अधिक गतिशील (Mobile) व अधिक जागतिक (Global) बनली आहे. याचाच परिणाम म्हणून कुटुंब, गाव, प्रांत, राष्ट्र इत्यादीबाबतचे प्रेम निष्ठा व बांधिलकीची भावना शिथील होत चालली आहे. थोडक्यात व्यक्तीच्या गतिशीलतेत वाढ होणे हे जागतिकीकरणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरले आहे.

**७) आमूलाग्र बदलाची प्रक्रिया** – जागतिकीकरण ही संपूर्ण मानव समाजात आमूलाग्र बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत उद्योग, व्यापार, शेती, वित्त, श्रमपुरवठा, तंत्रविद्या, दळणवळण, स्थलांतर, जीवनमान, शासनव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, विवाह, कुटुंब, कला, क्रीडा, मूल्ये, भाषा, संस्कृती, पर्यावरण अशा सर्वच क्षेत्रात वेगाने बदल घडून येऊ लागले आहेत. त्यामुळे जगाचा कायापालट होऊ लागला आहे.

★ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** (Check your progress) **क्र. २**

**अ) बहुपर्यायी प्रश्न** (Multiple choice questions)

१) साधारणतः जागतिकीकरण ही कोणत्या प्रकारची प्रक्रिया आहे?

अ) आर्थिक ब) सामाजिक क) औद्योगिक ड) सांस्कृतिक

२) व्यापक दृष्टिने विचार करता जागतिकीकरण ही कोणत्या प्रकारची प्रक्रिया आहे?

अ) आर्थिक ब) राजकीय क) सामाजिक ड) सांस्कृतिक

३) १९७० पूर्वीच्या इंग्लंडमध्ये कोणत्या नावाने खाजगीकरणास सुरुवात झाली?

अ) राष्ट्रीयकरण ब) केंद्रीकरण क) विकेंद्रीकरण ड) अराष्ट्रीयकरण

४) रेडक्रॉस काय आहे?

अ) प्रादेशिक संघटना ब) शासकीय संघटना

क) संप्रेषण माध्यम ड) बिगरशासकीय संघटना

५) जागतिकीकरणात कोणत्या राष्ट्रांचे प्रभुत्त्व आढळते?

अ) अविकसित ब) विकसित क) विकसनशील ड) वरील सर्व

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) जागतिकीकरणाचा अर्थ सांगा.

२) उदारीकरणाची व्याख्या द्या.

३) खाजगीकरण म्हणजे काय?

४) रशियात खाजगीकरणाचे धोरण कोणी राबविले?

५) बहुराष्ट्रीय महामंडळाची दोन उदाहरणे सांगा.

## **१.२.३ जागतिकीकरण आणि वैश्विक भांडवलशाही** (Globalization and world Capitalism)

जागतिकीकरणाचा अर्थ व वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांचा अभ्यास करणार आहात. आर्थिकदृष्ट्या जागतिकीकरण ही प्रक्रिया देशाची अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी एकात्म करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जागतिक व्यापारावरील निर्बंध दूर करून संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था म्हणजेच जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करणे अभिप्रेत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ही जी जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करावयाची आहे ती भांडवलशाही या प्रकारची अर्थव्यवस्था आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की जागतिकीकरण ही संपूर्ण जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था पसरविण्याची प्रक्रिया आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार व प्रचार किंवा वाढ व विस्तार करणे हे जागतिकीकरणामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जागतिकीकरण व भांडवलशाही यांच्यातील संबंध समजावून घेणे या ठिकाणी आवश्यक ठरते. त्यासाठी प्रथम अर्थव्यवस्था म्हणजे काय व अर्थव्यवस्थेचे विविध प्रकार थोडक्यात समजावून घेऊ.

**अर्थव्यवस्थेचा अर्थ व व्याख्या :** मानव आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी नैसर्गिक साधनसामग्रीचा उपयोग करीत असतो. पण मानवाच्या गरजा अमर्याद असून त्या भागविण्याची साधने मात्र मर्यादित असतात. अमर्याद गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ कसा घालावयाचा हा मानवापुढील महत्त्वाचा प्रश्न असून या प्रश्नास आर्थिक प्रश्न असे म्हणतात. हा प्रश्न सोडविण्यासाठी मानव जे वर्तन किंवा क्रिया करतो त्यास आर्थिक वर्तन किंवा आर्थिक क्रिया म्हणतात. आणि या आर्थिक वर्तनाचे किंवा क्रियांचे संघटन, नियमन व नियंत्रण करण्यासाठी मानवाने जी व्यवस्था निर्माण केली आहे तिलाच अर्थव्यवस्था असे म्हणतात. अर्थव्यवस्थेचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी तिच्या कांही व्याख्या पाहू.

**१) चंद्रकांत खंडागळे :** मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग यांच्याशी संबंधित असणाऱ्या संरचनांची व प्रक्रियांची व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय.

**२) रूथ बुनझेल :** मानवाच्या भौतिक अस्तित्वाशी संबंधित असणाऱ्या समस्यांच्या संदर्भात मानवाच्या एकूण वर्तनाचे केलेले संघटन म्हणजे अर्थव्यवस्था होय.

**३) जॉन क्यूबर :** ज्या व्यवस्थेत समाज त्यांच्या श्रमविभाजनाचे व परस्परावलंबनाचे संघटन घडवून आणतात तिला अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**अर्थव्यवस्थेचे प्रकार :** जगातील प्रत्येक समाजाची किंवा देशाची स्वतःची अशी अर्थव्यवस्था असते. जगातील विविध अर्थव्यवस्थांचे तीन प्रकार पाडलेले दिसतात.

**अ) भांडवलशाही अर्थव्यवस्था** (Capitalist economy) : ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर खाजगी व्यक्तींची मालकी व नियंत्रण असते तसेच त्यांचा उपयोग खाजगी नफा कमावण्यासाठी केला जातो त्या अर्थव्यवस्थेस भांडवलशाही अर्थव्यवस्था असे म्हणतात. **प्रा. लॉक** यांच्या मते मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित भांडवलावर खाजगी मालकी असणे व त्याचा उपयोग खाजगी नफा कमावण्यासाठी करणे ही वैशिष्ट्ये असलेल्या आर्थिक संघटन व्यवस्थेस भांडवलशाही म्हणतात.

**भांडवलशाहीची वैशिष्ट्ये :**

१) भांडवलशाहीत उत्पादन साधने ही खाजगी मालकीची असतात.

२) प्रत्येकास खाजगी मालमत्ता धारण करण्याचा, ती वारसाहक्काने संक्रमित करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क असतो.

३) उत्पादन हे जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी केले जाते.

४) उपभोक्ता (ग्राहक) हा सार्वभौम असतो. म्हणजे उपभोक्त्यांच्या आवडीनुसार उत्पादन केले जाते.

५) किंमत यंत्रणेद्वारे आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण होत असते.

६) या अर्थव्यवस्थेत व्यापार चक्र (तेजीमंदीचे चक्र) आढळते.

७) मागणी पुरवठ्याच्या तत्त्वानुसार उत्पादन होते.

८) आर्थिक व्यवहारात शासकीय हस्तक्षेप नाकारला जातो.

९) समाजात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात असते इत्यादी.

अमेरिका, जर्मनी, जपान, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादीत भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे.

**ब) समाजवादी अर्थव्यवस्था** (Socialist economy) : ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनसाधनांवर समाजाची मालकी व नियंत्रण असते व त्यांचा उपयोग हा संपूर्ण समाजाच्या हितासाठी केला जातो त्या अर्थव्यवस्थेस समाजवादी अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी असते.

२) समाजाला उत्तरदायी असणाऱ्या समाजाच्या प्रतिनिधिद्वारे उत्पादन साधनांचे संचालन होते.

३) खाजगी नफा कमावण्याऐवजी समाजाच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने उत्पादन केले जाते.

४) सर्वांना समान संधी उपलब्ध करून देऊन समता प्रस्थापित करण्यावर भर दिला जातो.

५) नियोजनबद्धपणे आर्थिक विकास साध्य करण्यावर भर दिला जातो.

६) वर्गविहीन समाजव्यवस्था प्रस्थापित करणे हे या अर्थव्यवस्थेचे ध्येय असते.

७) अनिर्बंध खाजगी मालमत्ता बाळगण्यास परवानगी नसते.

८) शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे ध्येय असते.

पूर्वीच्या सोव्हिएत रशिया, पोलंड, रूमानिया, बल्गारिया, झेकोस्लाव्हाकिया इत्यादी देशात समाजवादी अर्थव्यवस्था होती. आता उत्तर कोरीया, क्युबा यासारख्या राष्ट्रात ही अर्थव्यवस्था आहे.

**३) मिश्र अर्थव्यवस्था** (Mixed economy) : ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर समाजाची म्हणजे सरकारची तसेच खाजगी व्यक्तींची अशी दोघांचीही मालकी असते तिला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**मिश्र अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

१) या अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेतील गुणांचा स्वीकार व दोषांचा अस्वीकार केला जातो.

२) सार्वजनिक क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्रातही उद्योगधंदे उभारण्यास परवानगी असते. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांचे सहास्तित्व या अर्थव्यवस्थेत असते.

३) सार्वजनिक हिताच्यादृष्टीने खाजगी क्षेत्रावर कांही निर्बंध व नियंत्रणे घालण्याचा अधिकार सरकारला असतो.

४) आर्थिक विषमता कमी करणे, कामगार वर्गाचे कल्याण करणे, शोषणापासून व्यक्तींना संरक्षण देणे, ग्राहकांना आपल्या आवडीनुसार वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य देणे इत्यादी तरतुदी सरकारद्वारे केल्या जातात.

५) मक्तेदारीला आळा घालण्याचे कामही सरकार करते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.

**जागतिकीकरण आणि भांडवलशाही**

वरील तीन प्रकारच्या अर्थव्यवस्थेपैकी भांडवलशाही अर्थव्यवस्था ही जगातील बहुसंख्य औद्योगिकदृष्ट्या विकसित राष्ट्रांमध्ये आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांचे प्रभुत्व असून ही भांडवलशाही राष्ट्रे आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक धोरणे व मूल्ये इतर राष्ट्रांवर लादीत आहेत. म्हणजेच भांडवलशाहीचा जगभर वाढ व विस्तार करण्याचा प्रयत्न जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे करीत आहेत. त्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया व भांडवलशाही अर्थव्यवस्था यांचा जवळचा संबंध आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया तशी नवीन नाही. **ॲडम स्मिथ** या अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक विकासास चाालना देण्यासाठी अनिर्बंध तत्त्वाचा पुरस्कार करून उदारीकरण, व जागतिकीकरण या प्रक्रिया सुरू करण्याची शिफारस केली. तसेच त्याने व्यक्तीला रोजगार निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे व देशांतर्गत व परकीय व्यापार मुक्त असावा असेही सुचविले. स्मिथच्या या सुचनांची अंमलबजावणी केल्याने इंग्लंडच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास झाला. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार व विदेशी गुंतवणूकीस परवानगी ही जागतिकीकरणाची दोन क्षेत्रे विचारात घेतल्यास सुवर्णपरिमाणाच्या काळात म्हणजे अंदाजे १८९० ते १९१३ या पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात व्यापार-धंद्याच्या वाढीतून जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरूच होती असे म्हणता येते. युरोपियन राष्ट्रे व त्यांच्या वसाहती यांच्यात अनुक्रमे भांडवल व कच्चा माल यातून देवघेव चालूच होती. या प्रक्रियेतून भांडवलशाहीच्या कांही लक्षणांचा शिरकाव वसाहतींच्या अर्थव्यवस्थेमध्ये झाला.

तथापि, अनियंत्रित भांडवलशाहीत तसेच उदारीकरण व जागतिकीकरण या प्रक्रियांमध्ये कामगारांचे शोषण होते. शिवाय भांडवलशाहीतील अंतर्विरोधामुळे भांडवलशाही कोसळू शकते असे विचार साम्यवादी विचारवंत कार्ल मार्क्स याने मांडले. मार्क्सच्या विचारांचा प्रभाव पडून रशिया, चीन व पूर्व युरोपातील पोलंड, रूमानिया, बल्गेरिया, हंगेरी, झेकोस्लोव्होकिया, उत्तर कोरीया इत्यादी राष्ट्रांमध्ये आर्थिक व्यवहारावर सरकारचे पूर्ण नियंत्रण असणारी समाजवादी अर्थव्यवस्था उदयास आली. आणि जगांमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था व समाजवादी अर्थव्यवस्था या दोन परस्परविरोधी अर्थव्यवस्था प्रचलित झाल्या.

१९३० मध्ये जगात आर्थिक महामंदी आली. या महामंदीचे विश्लेषण करून **केन्स** या अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक मंदीस व बेकारीस आळा घालण्यासाठी भांडवलशाहीच्या कार्यपद्धतीत सरकारचा हस्तक्षेप असावा व उदारीकरणास आळा घालावा असे सूचविले. त्यानुसार इंग्लंडने आर्थिक व्यवहारावर निर्बंध घातले. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक व्यवहारावर सरकारचे नियंत्रण असावे हा विचार प्रभावी ठरला व आर्थिक नियोजनाचे धोरण अनेक देशांनी स्वीकारले.

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्वी पारतंत्र्यात असलेली राष्ट्रे म्हणजेच वसाहती या स्वतंत्र झाल्या. आपला आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी कांहीनी विकासाचे भांडवलशाही प्रारूप तर कांहीनी समाजवादी प्रारूप स्वीकारले. भारतासारख्या राष्ट्राने या दोन्ही प्रारूपातील चांगल्या तत्त्वांचा समन्वय असणारे मिश्र अर्थव्यवस्था हे विकासाचे वेगळे प्रारूप स्वीकारले. आणि काही उद्योग हे सार्वजनिक (सरकारी) क्षेत्रासाठी राखीव ठेवून बाकीचे उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले ठेवले. तथापि, खाजगी उद्योगांनी सरकारच्या आर्थिक धोरणाच्या चौकटीत राहूनच व्यवहार करावेत असे बंधन घातले.

अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतर जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था व मिश्र अर्थव्यवस्था अशा तीन प्रकारच्या अर्थव्यवस्था अस्तित्त्वात आल्या. या प्रत्येक अर्थव्यवस्थेमध्ये काही गुण दोष आहेत. अकार्यक्षमता, गैरकारभार, भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई (लालफित) इत्यादी दोषांमुळे समाजवादी अर्थव्यवस्थेतील तसेच मिश्र अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजेच सरकारच्या मालकीचे उद्योग तोट्यात गेले. त्यामुळे अनेक देशांत गंभीर आर्थिक संकटे उद्‌भवली. या संकटांवर मात करण्यासाठी इंग्लंड, अमेरिका यासारख्या राष्ट्रांनी आर्थिक व्यवहारावरील अनिष्ट निर्बंध दूर करून उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. तसेच सार्वजनिक उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविण्याचे म्हणजेच खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. १९७० पूर्वीच अराष्ट्रीयकरण (Denationalization) या नावाने इंग्लंडमध्ये खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. इंग्लंडच्या पंतप्रधान **मार्गारेट थॅचर** यांनी खाजगीकरणाचा पुरस्कार करून तेथील अनेक उद्योग व त्यातील कर्मचारी खाजगी क्षेत्राकडे सोपविले. इंग्लंडच्या अनुभवाने प्रेरित होऊन पुढे १९८० मध्ये फ्रान्सने व त्यानंतर ऑस्ट्रेलिया, जपान, तुर्कस्थान या राष्ट्रांनीही खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले.

सोव्हिएट रशियातील सरकारी उद्योगांची अधोगती होऊन समाजवादी अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. १९८८ मध्ये राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या **मिखाईल गार्बोचेव्ह** यांनी 'पेरेस्त्रोईका व ग्लासनोस्त' या संकल्पना स्वीकारून उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा स्वीकार केला. याचा परिणाम म्हणून सोव्हिएत रशियासह रूमानिया, पोलंड, बल्गेरिया इत्यादी राष्ट्रांतील समाजवादी अर्थव्यवस्था धडाधड कोसळल्या व तेथील सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करण्यात आले. चीननेही राजकीय क्षेत्रात समाजवादी व्यवस्था कायम ठेवली. पण आर्थिक क्षेत्रात उदारीकरण व खाजगीकरण स्वीकारले. पुढे टांझानिया, चिली, अल्जेरिया, ब्राझील हाँगकाँग, सिंगापूर, मेक्सिको, तैवान इत्यादी राष्ट्रांनीही उदारीकरण व खाजगीकरण स्वीकारले. अशाप्रकारे वरील राष्ट्रांमध्ये या प्रक्रियांच्या माध्यमातून भांडवलशाही अर्थव्यवस्थेची अनेक वैशिष्ट्ये स्वीकारण्यात आली.

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रात मोठमोठे उद्योग उभारले. आर्थिक व्यवहारावर सरकारचे नियंत्रण ठेवले, नियोजनबद्ध विकासाचे धोरण पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून राबविले. पण १९५० ते १९९० या ४० वर्षाच्या काळात सरकारी नियंत्रणे व आर्थिक नियोजन यांचा फायदा होण्यापेक्षा तोटाच अधिक झाला. सार्वजनिक उद्योग तोट्यात गेले. परकीय चलनसाठा घटला. दारिद्र्य, बेकारी महागाई वाढत गेली. १९९१ मध्ये आर्थिक संकट उद्‌भवले. त्यातून बाहेर पडण्यासाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्ज मागितले आणि ते देताना या संस्थांनी घातलेल्या अटीनुसार भारताने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा स्वीकार केला. अशाप्रकारे भारतानेही भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अनेक तत्त्वे व धोरणे या प्रक्रियांच्या माध्यमातून स्वीकारली. आज केवळ ६ उद्योगधंदे सरकारी क्षेत्रासाठी राखीव ठेऊन बाकीचे सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले केले आहेत. परकीय गुंतवणुकीस परवानगी दिली आहे. निर्यातीवरील निर्बंध उठवून आयात मुक्त केली आहे. एकंदरीत मिश्र अर्थव्यवस्थेचे अस्तित्व नाममात्र राहिले असून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढला आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा जगभर प्रसार केला जात असून पूर्वी कांही राष्ट्रांपुरती मर्यादित असलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्था बनविण्याचे प्रयत्न होत आहेत.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडावा.**

१) जागतिकीकरण ही संपूर्ण जगात कोणती अर्थव्यवस्था पसरविण्याची प्रक्रिया आहे?

अ) समाजवादी ब) मिश्र क) निर्वाहप्रधान ड) भांडवलवादी

२) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने कोणती अर्थव्यवस्था स्वीकारली?

अ) भांडवलशाही ब) समाजवादी क) मिश्र ड) साम्यवादी

३) इंग्लंडमध्ये अराष्ट्रीकरणाची प्रक्रिया कोणी सुरू केली?

अ) चर्चिल ब) मार्गारेट थॅचर क) गार्बोचेव्ह ड) ख्रुचेव्ह

४) सोव्हिएट रशियात कोणी ग्लासनोस्त व पेरेस्त्रोईका या प्रक्रिया सुरू केल्या?

अ) गार्बोचेव्ह ब) ख्रुचेव्ह क) येलत्सिन ड) पुतीन

५) अमेरिकेत कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था आहे?

अ) समाजवादी ब) मिश्र क) भांडवलवादी ड) साम्यवादी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) अर्थव्यवस्था म्हणजे काय?

२) कोणत्या अर्थव्यवस्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांचे सहास्तित्त्व आढळते?

३) भारताने कोणत्या साली जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले?

४) चीनमध्ये सद्या कोणत्या क्षेत्रात समाजवादी व्यवस्था आहे?

५) कोणत्या अर्थव्यवस्थेत व्यापारचक्र आढळते?

### **१.२.४ जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे** (Advantages (benifits) and Disadvantages of Globalization)

जागतिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये व जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांचा संबंध इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरणाचे फायदे व तोटे अभ्यासणार आहात. कांही अभ्यासकांच्या मते जागतिकीकरणाची प्रक्रिया ही नवीन नाही. ॲडम स्मिथ या इंग्रज अर्थशास्त्रज्ञाने आर्थिक विकासास चालना देण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा पुरस्कार केला. स्मिथच्या शिफारसीची अंमलबजावणी करून इंग्लंडने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची सुरुवात केली होती. तथापि, १९८० नंतर जगात जागतिकीकरणाचे वारे जोरदारपणे वाहू लागले.

जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आज सुमारे ३५ वर्षे उलटली आहेत. या ३५ वर्षाच्या अनुभवाच्या आधारे आपणास जागतिकीकरणाचे फायदे व तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**जागतिकीकरणाचे फायदे –**

**१) औद्योगिकीकरणास चालना** – जागतिकीकरणामुळे विकसनशिल राष्ट्रांत औद्योगिकीकरणास मोठी चालना मिळाली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगाची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी अनेक इष्ट निर्णय घेण्यात आले आहेत. उदा. परवाना पध्दतीचे निर्मूलन करणे, सार्वजनिक क्षेत्रातील राखीव उद्योगांची संख्या कमी करणे, परकीय गुंतवणूकीस वाव देणे, मक्तेदारी कायद्यात सुधारणा करणे, कर व्यवस्था सुधारणे इत्यादी. या सर्व उदार निर्णयांमुळे नवीन उद्योग उभारणे, जुन्या उद्योगांचे विस्तारीकरण करणे, उद्योगाचे वैविध्यकरण करणे, परकीय कंपन्यासह संयुक्त उद्योग उभारणे, उद्योगांचे विलीनीकरण करणे, त्यांचे हस्तांतरण करणे इत्यादीबाबतचे स्वातंत्र्य उद्योगपतींना मिळाले. त्यामुळे औद्योगिकीकरणाची गती वाढून औद्योगिक विकासास व रोजगारवृद्धी होण्यास मदत झाली आहे. उदारीकरणामुळे परकीय गुंतवणूक, तंत्रज्ञान, व्यवस्थाकिय कौशल्य, कच्चा माल इत्यादींची आयात वाढून स्थानिक उद्योगांची कार्यक्षमता व स्पर्धात्मक शक्ती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारताचा विचार करता जागतिकीकरणामुळे भारतात अनेक परकीय तसेच स्थानिक कंपन्यांनी नवे उद्योगधंदे सुरू केले आहेत. तसेच सद्याच्या उद्योगांचा विस्तार केला आहे. उदा. फोर्ड व हुंडाई या कंपन्यांनी मोटार कारखाने उभारले तर आयटीसी, हिंदुस्थान लिव्हर, पेप्सी, कोका-कोला, पिझ्झा-हट या कंपन्यांनी खाद्यपदार्थ व शीतपेयाचे कारखाने काढले. खाजगीकरणाच्या प्रक्रियेद्वारे आजारी सरकारी उद्योग खाजगी उद्योजकांना चालविण्यास दिले व त्यामुळे या आजारी उद्योगांची उत्पादकता, कार्यक्षमता व गुणवत्ता सुधारली. अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीवरील अनावश्यक निर्बंध व खर्च कमी केल्याने पर्यटन व हॉटेलिंग उद्योगांचा विकास घडून येत आहे. परकीय कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी स्थानिक उद्योगांना आपली उत्पादनक्षमता कार्यक्षमता मालाचा दर्जा इ. सुधारणे भाग पडत आहे. त्यामुळे देशी उद्योगांमध्येही सुधारणा होण्यास चालना मिळाली आहे.

**२) बाजारपेठांचा विस्तार** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्यांची उत्पादने परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी दिल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळाली आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणामुळे देशी उत्पादनांच्या दृष्टीने बाजारपेठा विस्तारीत झाल्या आहेत.

**३) परकीय व्यापारात वृद्धी** – जागतिकीकरणामुळे राष्ट्रांना आपला परकीय व्यापार मुक्त करावा लागत आहे. त्यामुळे आयात-निर्यातीवरील निर्बंध दूर झाले आहेत. तसेच आयात करात कपात करावी लागली आहे. तसेच आपले चलन परिवर्तनीय करावे लागले आहे. या उपायांमुळे राष्ट्रांचा परकीय व्यापार वेगाने वाढला आहे. परकीय व्यापार वाढल्याने या राष्ट्रांचा परकीय चलनसाठी (गंगाजळी) वाढला आहे. जागतिकीकरणामुळे विविध राष्ट्रांचा केवळ परकीय व्यापारच वाढला नाही तर त्या व्यापाराचे भौगोलिकदृष्ट्या वैविध्यकरण झाले आहे. म्हणजे पूर्वी काही राष्ट्रे

थोड्याच परकीय राष्ट्रांशी व्यापार करीत होती. आज ती जगातील विविध देशांशी व्यापार करू लागली आहेत. उदा. भारत पूर्वी केवळ इंग्लंड, जर्मनी, जपान, कॅनडा, अमेरिका, रशिया इत्यादी मोजक्याच राष्ट्रांशी व्यापार करीत असे. जागतिकीकरणामुळे आज भारत वरील राष्ट्रांबरोबरच मध्यपूर्व राष्ट्रांशी (इराक, सौदे अरेबिया, कुवेत, दुबई इ.) व आफ्रिकन राष्ट्रांशी (द. आफ्रिका, केनिया, घाना, टांझानिया, इथोपिया इ.) व्यापार करू लागला आहे. लॅटीन अमेरिकन राष्ट्रांशीही व्यापार वाढविण्याची संधी भारतास आहे. परकीय व्यापाराचे भौगोलिक क्षेत्र विस्तारल्यानेही परकीय गंगाजळी वाढत आहे.

४) **उपभोक्त्यांचा फायदा** – जागतिकीकरणामुळे उपभोक्त्यांचा (ग्राहकांचा) फायदा होत आहे. जागतिकीकरणामुळे आयात दर कमी झाल्याने एखाद्या राष्ट्रात म्हणजेच स्थानिक बाजारपेठेत परदेशातील विविध दर्जेदार वस्तू (उदा. वस्त्रे, खेळणी, बॅग्ज, पादत्राणे, दुचाकी-चारचाकी वाहने, टी.व्ही सेट, वॉशिंग मशिन, फ्रिज, मोबाईल हँडसेट, संगणक, लॅपटॉप इ.) विपूल प्रमाणात योग्य किंमतीत उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामुळे लोकांना आपल्या आवडीच्या वस्तू खरेदी करता येऊ लागल्या आहेत त्यामुळे ग्राहक हा बाजाराचा राजा बनला आहे.

५) **रोजगार वृद्धी** – जागतिकीकरणामुळे लोकांना विशेषतः उच्चशिक्षीतांना व कुशल व्यक्तींना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध झालेल्या आहेत. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, वाहतूक, संप्रेषण, माहिती-तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात असंख्य नोकऱ्या उपलब्ध झालेल्या आहेत. अशा रोजगार वा नोकऱ्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण देणाऱ्या विविध शिक्षणसंस्थाही सुरू झाल्या आहेत. विकसनशिल राष्ट्रातील उच्चशिक्षीत तरूणांना देशोविदेशात आकर्षक वेतन देणारे रोजगार मिळू लागले आहेत.

६) **सेवाक्षेत्राचा विस्तार** – जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्राचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. वाहतुकीच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक सुरू झाल्यान रस्ते व महामार्ग यांची स्थिती सुधारली आहे. हवाई वाहतुकीतही खाजगी व परकीय कंपन्यांनी गुंतवणूक केल्याने हवाई वाहतुकीची सुविधाही सुधारली आहे. लोहमार्ग व जलमार्ग सुविधांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे. बँका व वित्तसंस्थांना स्वायत्तता मिळाल्याने इंटरनेट बँकिंग, एटीएम सुविधा, कोठेही गेले तरी बँकिंग सुविधा (any where banking facility) इत्यादी सुविधा लोकांना मिळू लागल्या आहेत. जागतिकीकरणामुळे संप्रेषण (Communication) क्षेत्रातही क्रांती घडून आली आहे. दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट इत्यादीचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरीत संपर्क साधणे शक्य झाले आहे. स्पर्धेमुळे मोबाईल सेवा स्वस्त होऊन सामान्यातील सामान्य माणूसही मोबाईल वापरू लागला आहे. टपालसेवेच खाजगीकरण होऊन कुरिअर कंपन्याद्वारे त्वरीत टपाल पोहचविता येत आहे. जागतिकीकरणात जगातील नामांकित शिक्षणसंस्थांना इतर राष्ट्रात आपल्या शाखा उघडण्यास परवानगी मिळाल्याने तेथील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाय या परकीय शिक्षणसंस्थाशी होणाऱ्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्थानिक शिक्षणसंस्थांना आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे भाग पडत आहे. यातून शिक्षणक्षेत्रातील सुधारणांना गती मिळत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्र विस्तारले आहे व त्यामुळेही रोजगार वृद्धी झाली आहे.

**७) साजाजिक-सांस्कृतिक संबंधात वाढ** - जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक परस्परांच्या राष्ट्रांना भेटी देऊ लागल्या आहेत. शिक्षण, रोजगार, पर्यटन, इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही स्थलांतरीत होऊ लागले आहेत. परिणामी जगातील विविध लोक व राष्ट्रे यांच्यात केवळ आर्थिक सहकार्याचेच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक सहकार्याचेही संबंध वाढत चालले आहेत. या संबंधावरील राजकीय व भौगोलिक सीमा दूर झाल्या आहेत. त्यामुळे जग खूप जवळ आले आहे. राष्ट्राराष्ट्रातील या सहकार्यामुळे संपूर्ण जग हे जणू एक खेडे बनले आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक खेड्याचे (Global village) स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास चालना मिळाली आहे.

**जागतिकीकरणाचे तोटे** -

जागतिकीकरणाचे तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) स्थानिक उद्योगास मारक** - जागतिकीकरण हे स्थानिक उद्योगास मारक ठरत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्तम गुणतत्तेच्या परकीय वस्तू मुबलक प्रमाणात व वाजवी दरात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत. स्थानिक वस्तूंला या परकीय वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थानिक उद्योगात मंदी येऊन ते आजारी पडत आहेत. कांही स्थानिक उद्योजकांनी तर आपले उद्योग परकीय कंपन्यांना विकून टाकले आहेत. परकीय कंपन्यांनी जाहिरातीच्या जोरावर स्थानिक बाजारपेठा काबीज केल्याने स्थानिक उद्योगधंद्यांची विशेषतः लघुउद्योगांची स्थानिक बाजारपेठेत पिछेहाट झाली आहे.

**२) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी** - जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांची अनेक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिका, पश्चिम युरोपियन राष्ट्रे, जपान इत्यादीमधील अनेक कंपन्यांनी विकसनशील राष्ट्रातील महत्त्वाचे उद्योग आपल्या ताब्यात घेऊन स्थानिक उद्योजकांना बाजारपेठेतून हुसकावून लावले आहे. प्रचंड भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्तम व्यवस्थापकीय कौशल्य, आकर्षक जाहिरातबाजी इत्यादीच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक बाजारातील मोठा हिस्सा काबीज केला आहे.

**३) बेरोजगारीत वाढ** - अनेक विकसनशिल राष्ट्रांत मुळातच रोजगाराच्या संधी कमी आहेत. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाणे बरेच आहे. जागतिकीकरणामुळे बेरोजगारीचे हे प्रमाण वाढण्यास हातभार लागला आहे. परकीय वस्तूंशी स्पर्धा करू शकत नसल्याने अनेक स्थानिक उद्योग आजारी किंवा बंद पडून त्यातील कामगार बेरोजगारी (बेकार) बनले आहेत. खाजगीकरणाच्या धोरणामुळेही कामगार कपात होऊन अनेक कामगार बेकार झाले आहेत. लघुउद्योगांची पिछेहाट झाल्यानेही बेकारीत वाढ झाली आहे.

**४) विषमतेत वाढ** - जागतिकीकरणामुळे आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढली आहे. जागतिकीकरणामुळे ज्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत त्यांचा फायदा केवळ उच्च शैक्षणिक पात्रताधारक व्यक्तींना होत आहे. बडे शेतकरी, उद्योजक व व्यापारी या प्रक्रियेत मालामाल होत आहेत. त्यांच्या तुलनेत लहान शेतकरी, शेतमजूर, अकुशल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी दुर्बल घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत तर गरीब वर्ग अधिक गरीब होत आहे. श्रीमंत वर्ग चैन करू लागला आहे तर गरीब

वर्गास मूलभूत गरजा भागविणेही अवघड झाले आहे. परिणामी, आर्थिक व सामाजिक विषमता वाढत आहे.

**५) विकसनशील राष्ट्रांची लूट** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित देश उदा. अमेरिका व युरोपियन राष्ट्रे ही विकसनशील राष्ट्रांची लूट करीत आहेत. रॉयलटी, नफा, कर्जावरील व्याज इत्यादी रूपाने विकसनशील देशात मिळविलेले उत्पन्न आपल्या देशात पाठवून विकसित राष्ट्रे ही लूट करीत आहेत.

**६) कर्जबाजारीपणात वाढ** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली आहे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून कर्ज घेताना विकसनशील राष्ट्रांना उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारणे भाग पडते हे धोरण राबविताना परकीय भांडवल, तंत्रज्ञान, वस्तू व सेवा यांची आयात करावी लागते. आयात वाढल्याने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागते. परिणामी, ही राष्ट्रे कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत. उदा. मेक्सिको, ब्राझील, चिली, अर्जेंटिना यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे.

**७) पर्यावरणाची समस्या** – जागतिकीकरणामुळे पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर बनली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळविण्याच्या हेतुने नैसर्गिक साधनसामग्रीचा स्वैरपणे वापर करीत आहेत. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याऐवजी हवा, पाणी, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण वाढवित आहेत, जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे तापमान वृद्धीची समस्या उग्र बनली आहे.

**८) समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी** – जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रे समाजवादी व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी देऊ लागली आहेत. जागतिकीकरणात आर्थिक सुधारणांचे कार्यक्रम राबविण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे यांच्याकडून कर्ज व इतर मदत घ्यावी लागते. ही मदत देताना या संस्था व बडी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांवर अनुदानात आणि कल्याणकारी योजनांत कपात करावी, समाजवादी उपक्रम बंद करावेत यासारख्या अटी लादत आहेत. विकसनशील राष्ट्रांना या अटींचे पालन करणे भाग पडत आहे. त्यातूनच कामगार कपात करणे, कंत्राटी पध्दतीने कामगार भरती करणे, पेन्शन व विमा सुविधा बंद करणे, अन्नधान्य, गॅस, खनीज तेल इत्यादीवरील अनुदान बंद करणे इत्यादी उपाय योजना केल्या जात आहेत. त्यामुळे या राष्ट्रांतील गरीबांना आता कोणीच वाली राहिलेला नाही. महत्त्वाची म्हणजे इतरांना अर्थव्यवस्था मुक्त करण्यास व अनुदाने बंद करण्यास सांगणारी अमेरिका स्वतःमात्र आपल्या उद्योगांना संरक्षण व शेतकऱ्यांना अनुदाने देत आहे. ही दुटप्पी नीती अन्यायकारक आहे.

**९) सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव** – जागतिकीकरणाचा विकसनशील राष्ट्रांच्या सामाजिक–सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव पडत आहे. या राष्ट्रांतील लोकांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, सवयी, अभिवृत्ती, जीवनपध्दती इत्यादीत अनिष्ट परिवर्तन होत आहे. व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, उपयुक्ततावाद या मूल्यांचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे समष्टीवाद सामाजिक बांधिलकी, राष्ट्राचे हित, स्वसंस्कृती अभिमान, इत्यादींचा प्रभाव घटत आहे. या राष्ट्रातील नवीन पिढी ही तेथील हवामानास प्रतिकूल ठरेल अशा खाण्यापिण्याच्या व पोषाखाच्या

आहारी जात आहे. विकसित राष्ट्रातील वस्तूंचे व चालिरीतीचे अंधानुकरण होऊ लागले आहे. इंग्रजी भाषाचे प्रभुत्त्व वाढून देशी भाषांचे महत्त्व तरुण पिढीस वाटेनासे झाले आहे.

**१०) पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पायाभूत सेवांमध्ये (वीज, पाणीपुरवठा, रस्ते वाहतूक, संप्रेषण इत्यादी) गुंतवणूक करण्यास परवानगी दिली आहे. तथापि, या कंपन्या पायाभूत सेवासुविधांमध्ये गुंतवणूक करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्याऐवजी चैनीच्या वस्तूंचे (उदा. वॉशिंग मशिन, टी.व्ही सेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोटार सायकली, मोटार इत्यादी) उत्पादन करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे गरिबांचा फायदा होण्याऐवजी श्रीमंतांचे चैनीचे चोचले पुरविले जात आहेत.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** (Check your progress) **क्र. ४**

अ) **बहुपर्यायी प्रश्न** (Multiple choice questions)

१) कोणत्या इंग्रज अर्थशास्त्रज्ञाने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा पुरस्कार केला?

अ) केन्स ब) स्मिथ क) मार्क्स ड) रोस्टो

२) जागतिकीकरणामुळे बाजाराचा राजा कोण बनला आहे?

अ) ग्राहक ब) उत्पादक क) व्यापरी ड) विक्रेता

३) जागतिकीकरणामुळे कोणते स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास चालना मिळाली आहे?

अ) जागतिक राज्य ब) जागतिक राष्ट्र क) जागतिक नगर ड) जागतिक खेडे

४) जागतिकीकरणात कोणाची मक्तेदारी निर्माण होत आहे?

अ) राष्ट्रीय कंपन्यांची ब) बहुराष्ट्रीय कंपन्याची

ब) स्थानिक कंपन्यांची ड) शासकीय कंपन्यांची

५) जागतिकीकरणात कोणत्या धोरणास सोडचिठ्ठी दिली जात आहे?

अ) भांडवलवादी ब) व्यक्तीवादी क) समाजवादी ड) लोकशाहीवादी

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या सालानंतर जगात जागतिकीकरणाचे वारे जोरदारपणे वाहू लागले?

२) जागतिकीकरणामुळे कोणत्या व्यक्तींना रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत?

३) कोणत घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत?

४) जागतिकीकरणात कोणत्या राष्ट्रांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे?

५) जागतिकीकरणामुळे कोणत्या मूल्यांचा प्रभाव वाढत आहे?

## १.३ सारांश

या घटकात आपण जागतिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये, जागतिकीकरण व भांडवलशाही यांच्यातील संबंध आणि जागतिकीकरणाचे फायदे-तोटे इत्यादींची चर्चा केली आहे. जागतिकीकरण ही आर्थिकदृष्ट्या सर्व जगाची एकच अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. सामाजिकदृष्ट्या जागतिकीकरण ही जगातील सर्व लोक व समाज यांना एका जागतिक व्यवस्थेत सामील करण्याची प्रक्रिया आहे. तर राजकीयदृष्ट्या जागतिकीकरण ही प्रभुत्त्वशाली राष्ट्रांनी त्यांची ध्येयधोरणे इतर राष्ट्रांना स्वीकारावयास भाग पाडणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये तुम्ही अभ्यासलेली आहेत.

१) संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था निर्माण करणे.

२) जगातील विविध समाजांना एका जागतिक व्यवस्थेत आणणे.

३) उदारीकरण व खाजगीकरणांना चालना देणे.

४) विविध माध्यमांद्वारे जागतिकीकरण गतीमान होत आहे.

५) जागतिकीकरणात विकसित राष्ट्रांचे प्रभुत्त्व आढळते.

६) जागतिकीकरणामुळे व्यक्तीची व्यावसायिक व भौगोलिक गतीशिलता वाढली आहे.

७) जागतिकीकरण ही आमूलाग्र बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे.

यानंतर तुम्ही जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यांच्यातील संबंध अभ्यासलेला आहे. आज जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था व मिश्र अर्थव्यवस्था अशा तीन प्रकारच्या अर्थव्यवस्था आहेत. जागतिकीकरणाच्या माध्यमातून जगात भांडवलशाही अर्थव्यवस्था प्रसारित केली जात आहे. पूर्वीच्या अनेक राष्ट्रांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग करून भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या भारतानेही भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या अनेक वैशिष्ट्यांचा स्वीकार केला आहे. सर्वात शेवटी तुम्ही जागतिकीकरणाचे फायदे-तोटे अभ्यासलेले आहेत. जागतिकीकरणाचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत. १) औद्योगिकीकरणास चालना मिळाली आहे. २) बाजारपेठांचा विस्तार होत आहे. ३) परकीय व्यापारात वृद्धी होत आहे. ४) उपभोक्त्यांचा फायदा होत आहे. ५) रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत. ६) सेवाक्षेत्राचा विस्तार होत आहे. ७) विभिन्न राष्ट्रांतील लोकांमध्ये सामाजिक-सांस्कृतिक संबंध निर्माण होत आहेत. जागतिकीकरणाचे पुढील तोटे आहेत. १) जागतिकीकरण स्थानिक उद्योगास मारक ठरत आहे. २) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. ३) बेरोजगारी वाढत आहे. ४) विषमताही वाढत आहे. ५) विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांची लूट करीत आहेत. ६) विकसनशील राष्ट्रांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. ७) पर्यावरणाची समस्या गंभीर बनली आहे. ७) विकसनशील राष्ट्रे समाजवाद व कल्याणकारी धोरणास सोडचिठ्ठी देऊ लागली आहेत. ९) सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट परिणाम होत आहेत. १०) पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत आहे.

## १.४ स्मरणार्थ संज्ञा

- **औद्योगिक क्रांती** : शास्त्रीय शोधातून उदयास आलेल्या यंत्रांचा व तंत्रांचा उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणावर वापर झाल्याने उत्पादन पद्धतीत झालेले आमूलाग्र बदल.
- **औद्योगिकीकरण** : मोठमोठे उद्योगधंदे उभारण्याची प्रक्रिया.
- **नागरीकरण** : ग्रामीण लोकसंख्येचे शहरी विभागाकडे होणारे स्थलांतर.
- **पाश्चिमात्त्यीकरण :** पाश्चिमात्त्य संस्कृतीचे बिगर पाश्चिमात्त्य लोकांनी अनुकरण करण्याची प्रक्रिया.
- **आधुनिकीकरण :** विकसित राष्ट्रांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बाबींचे विकसनशील राष्ट्रांनी केलेले विवेकाधिष्ठत अनुकरण.
- **व्यावसायिक गतीशिलता :** एका व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायात प्रवेश करणे.
- **भौगोलिक गतीशिलता :** एका भौगोलिक क्षेत्रातून दुसऱ्या भौगोलिक क्षेत्राकडे जाणे.
- **उदारीकरण :** आर्थिक व्यवहारावरील निर्बंध काढून टाकणे वा शिथील करणे.
- **खाजगीकरण :** सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरण करणे.
- **विकसित राष्ट्रे :** दरडोई तसेच राष्ट्रीय उत्पन्न खूपच जास्त असणारी राष्ट्रे.
- **विकसनशील राष्ट्रे :** विकासाची प्रक्रिया सुरू झालेली राष्ट्रे.
- **मक्तेदारी :** एखाद्या गोष्टीवर विशिष्ट व्यक्तीचा वा समूहाचा एकाधिकार निर्माण होणे.
- **उपभोक्ता :** उपभोग घेणारी व्यक्ती म्हणजे ग्राहक.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

प्रश्न १ : बहुप्रश्नांची उत्तरे

१) ब २) ब ३) अ ४) क ५) ब ६) क

★ **स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) अ २) क ३) ड ४) ड ५) ब

ब) एका वाक्यात उत्तरे.

१) जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया.

२) आर्थिक व्यवहारावरील निर्बंध काढून टाकणे वा शिथील करणे.

३) सार्वजनिक उद्योग खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करणे.

४) मिखाईल गार्बोचेव्ह

५) पाँड्स, पेप्सी, कोका-कोला

★ **स्वयं अध्ययन प्रश्न-३**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ड २) क ३) ब ४) अ ५) क

ब) एका वाक्यात उत्तरे.

१) मानवाच्या आर्थिक वर्तनाचे संघटन, नियमन व नियंत्रण

२) मिश्र अर्थव्यवस्था

३) १९९१

४) राजकीय क्षेत्रात

५) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत

★ **स्वयं अध्ययन प्रश्न-४**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ब २) अ ३) ड ४) ब ५) क

ब) एका वाक्यात उत्तरे

१) १९८० नंतर

२) उच्चशिक्षीत व कुशल व्यक्तींना

३) दुर्बल घटक वंचित राहिले आहेत.

४) विकसनशील राष्ट्रांचा

५) व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, उपयुक्ततावाद

## १.६ स्वाध्याय

**प्रश्न १ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) जागतिकीकरणाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) जागतिकीकरण व जागतिक भांडवलशाही यावर चर्चा करा.

३) जागतिकीकरणाचे फायदे-तोटे विशद करा.

**प्रश्न २ टीपा लिहा**

१) जागतिकीकरणाचा अर्थ

२) अर्थव्यवस्थेचे प्रकार

३) जागतिकीकरणाचे फायदे

४) जागतिकीकरणाचे तोटे

५) उदारीकरण व खाजगीकरण

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Appadurai, Arjun (1997) Modernity a Large : Cultural Dimensions of Globalization, Oxford University Press, New Delhi.
- Waters, Malcolm (1996) Globalization, London, Routledge
- नलिनी पंडित, जागतिकीकरण आणि भारत-लोकवाङ्मय
- चंद्रकांत खंडागळे, इ. १२ वी समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❑❑❑

# घटक २

# जागतिकीकरणाची माध्यमे

(Agencies of Globalization)

**घटक संरचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ बहुराष्ट्रीय महामंडळे, आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था (जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर)

२.२.२ राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने आणि बाजारपेठ

२.२.३ अशासकीय संघटना (एन.जी.ओ)

२.३ सारांश

२.४ स्मरणार्थ संज्ञा

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास:

- बहुराष्ट्रीय महामंडळे व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था यांची जागतिकीकरणाची माध्यमे म्हणून असलेली भूमिका समजावून घेता येईल.
- राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने व बाजारपेठ यांची जागतिकीकरणातील भूमिका स्पष्ट करता येईल.
- बिगरशासकीय संघटनाची जागतिकीकरणाचे माध्यम म्हणून असलेली भूमिका विशद करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

पहिल्या घटकात तुम्ही जागतिकीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये, फायदे व तोटे इत्यादी समजावून घेतले आहेत. आता या दुसऱ्या घटकात तुम्हाला जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान करणाऱ्या

विविध माध्यमांचे स्वरूप व भूमिका समजावून घ्यावयाची आहे. ज्या घटकांच्या किंवा साधनांच्या माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होत आहे, तिला चालना मिळत आहे. त्या घटकांना वा साधनांना जागतिकीकरणाची माध्यमे असे म्हणतात. जागतिकीकरण ही अत्यंत व्यापक व गतिमान अशी प्रक्रिया आहे. जगातील वेगवेगळ्या समाजातील, राष्ट्रातील व खंडातील लोकामध्ये आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करून हे संबंध सतत वृद्धिंगत करणारी विविध माध्यमे आहेत. या माध्यमांच्याद्वारे जगातील लोक हे एका जागतिक व्यवस्थेत एकत्रित येत आहेत. जगातील बहुराष्ट्रीय महामंडळे (कंपन्या), जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना यासारख्या वित्तीय संस्था, जगातील विविध राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने, बाजारपेठ, बिगरशासकीय संघटना इत्यादी जागतिकीकरणाची प्रमुख माध्यमे आहेत. या माध्यमांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रवाही बनवलेली आहे. या माध्यमांचे स्वरूप व जागतिकीकरणातील त्यांची भूमिका तुम्ही येथे समजावून घेणार आहात.

## २.२ विषय विवेचन

जागतिकीकरणाच्या माध्यमांचे स्वरूप व भूमिका समजावून घेण्यासाठी या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात बहुराष्ट्रीय महामंडळे व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था यांचे स्वरुप व त्यांची जागतिकीकरणातील भूमिका स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या विभागात राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने व बाजारपेठ यांचे जागतिकीकरणाची माध्यमे म्हणून विवेचन केलेले आहे. तिसऱ्या विभागात बिगरशासकीय संघटनाचे स्वरुप व त्यांची जागतिकीकरणातील भूमिका विशद केलेली आहे.

### २.२.१ बहुराष्ट्रीय महामंडळे व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था (Multinational Corporations and International Finance Agencies)

प्रास्तविकेत नमूद केल्याप्रमाणे बहुराष्ट्रीय महामंडळे व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था ही जागतिकीकरणाची महत्त्वाची अशी प्रमुख माध्यमे आहेत.

**अ) बहुराष्ट्रीय महामंडळे** (Multi-National Corporations-MNCs)

बहुराष्ट्रीय महामंडळे(यांनाच बहुराष्ट्रीय कंपन्या असेही म्हणतात.) ही जागतिकीकरणाची प्रभावी माध्यमे असून त्यांच्याद्वारे जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास म्हणजेच जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होण्यास मोठी चालना मिळालेली आहे. या महामंडळांची जागतिकीकरणातील भूमिका किंवा योगदान समजावून घेण्यापूर्वी त्यांची व्याख्या, वैशिष्ट्ये, उदय व विस्तार थोडक्यात समजावून घेणे योग्य ठरते.

**बहुराष्ट्रीय महामंडळांची व्याख्या –**

**१) चंद्रकांत खंडागळे** : एका राष्ट्रात मुख्य व्यवस्थापकीय कार्यालय असलेल्या पण आपल्या शाखांमार्फत इतर अनेक राष्ट्रांत आर्थिक व्यवहार करणाऱ्या उद्योगसंस्थेस बहुराष्ट्रीय महामंडळ असे म्हणतात.

**२) संयुक्त राष्ट्रे :** जो उद्योग आपल्या देशाव्यतिरिक्त इतर देशांतही उत्पादन व सेवा वितरित करतो त्यास बहुराष्ट्रीय महामंडळ असे म्हणतात.

**३) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना :** बहुराष्ट्रीय महामंडळाचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे त्याचे मुख्य व्यवस्थापकीय कार्यालय एका देशांत प्रस्थापित असते तर इतर अनेक देशांमध्ये त्याच्या व्यवसायाचा कारभार चालतो.

**४) वॉलेस आणि वॉलेस :** दोन किंवा अधिक देशांमध्ये व्यवसायांचे मालकीहक्क असणाऱ्या व त्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या महामंडळास बहुराष्ट्रीय महामंडळ असे म्हणतात.

आज जगात उत्पादन, व्यापार, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रात हजारो बहुराष्ट्रीय महामंडळे कार्यरत असून त्यांच्या लाखो शाखा व उपशाखा जगातील विभिन्न देशात पसरलेल्या आहेत. जगातील सुमारे २० टक्के उत्पादन व ७० टक्के व्यापार या महामंडळामार्फत होतो. (इ.स. २००१ च्या जागतिक गुंतवणूक अहवालानुसार जगात सुमारे ६३,००० बहुराष्ट्रीय महामंडळे व त्यांच्याशी संलग्न असलेल्या ८,२२,००० शाखा होत्या.) अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जपान, रशिया, कोरिया, तैवान, सिंगापूर, चीन इत्यादी प्रमुख देशातील बहुराष्ट्रीय महामंडळे आहेत. भारतातही अनेक बहुराष्ट्रीय महामंडळे असून त्यांच्या शाखा अनेक देशात कार्यरत आहेत. युनिलिव्हर, कॅडबरी, पाँड्स, कोलगेट, मॅक्डॉल, डनलॉप, फिलिप्स, ब्रुक बाँड, पेप्सी, कोकाकोला, निप्पान डेन्रो, सॅमसंग, नोकिया, व्हर्लपूल, एल.जी. इत्यादी आपल्या परिचयाची असलेली बहुराष्ट्रीय महामंडळे आहेत. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील (उदा. तेल व नैसर्गिक वायू आयोग) तसेच खाजगी क्षेत्रातील (उदा. इन्फोसेस, विप्रो, रिलायन्स इ.) अनेक महामंडळे वा कंपन्या या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत.

**बहुराष्ट्रीय महामंडळांचा उदय व विस्तार :** आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय महामंडळाचे महत्त्व व प्रभाव खूपच वाढलेला आहे. तथापि, त्यांचा उदय फार पूर्वीच झालेला दिसतो. इ.स. १४५३ पूर्वी युरोप व पौर्वात्य देश यांच्यात खुष्कीच्या मार्गाने व्यापार चाले. १४५३ मध्ये तुर्की लोकांनी कॉन्स्टटिनोपल या शहरावर कब्जा केला व हा खुष्कीचा मार्ग बंद केला. त्यामुळे युरोपातील राज्यकर्ते व व्यापारी यांनी पूर्वेकडील देशांकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध घेण्यास धाडसी खलाशांना मदत व प्रोत्साहन दिले. यातूनच १४९८ मध्ये वास्को-द-गामा या पोर्तुगीज खलाशाने भारताकडे येणारा जलमार्ग शोधला. परिणामी इंग्लंड, पोर्तुगाल, डेन्मार्क, फ्रान्स इत्यादी युरोपियन राष्ट्रात भारतासह अन्य पौर्वात्य देशाशी व्यापार करण्याच्या उद्देशाने अनेक कंपन्या स्थापन केला. ३१ डिसेंबर १६०० रोजी इंग्लंडमध्ये स्थापन झालेली ''ईस्ट इंडिया कंपनी'' ही त्यापैकीच एक होती. या कंपन्या म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वा महामंडळाच्या उदयाची सुरुवात होती. पुढे १९ व्या शतकाच्या अखेरच्या काळात अशा अनेक कंपन्या उदयास आल्या. मात्र त्यांचे कार्यक्षेत्र केवळ युरोप, अमेरिका या देशांपुरतेच मर्यादित होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून बहुराष्ट्रीय महामंडळांची संख्या हळूहळू वाढू लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र त्यांची संख्या मोठ्या वेगाने वाढू लागली. एवढेच नव्हे तर त्यांचे उत्पादन, व्यापार, आर्थिक उलाढालही प्रचंड वाढत गेली.

**बहुराष्ट्रीय महामंडळाच्या वाढीची कारणे** पुढीलप्रमाणे आहेत.

**१) तंत्रज्ञानाचा विकास :** आधुनिक काळात बहुराष्ट्रीय महामंडळे ही संशोधन करून नवे तंत्रज्ञान शोधून काढतात. या नवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने कमी खर्चात सुबक व विपूल उत्पादन करतात. या विकसित तंत्रज्ञानाचा संपूर्ण फायदा उठविण्यासाठी आपल्या देशातील बाजारपेठ त्यांना

अपुरी पडते. म्हणून आपल्या उत्पादनाचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी व त्यामध्ये वैविध्य आणण्यासाठी ही मंडळे इतर देशात आपल्या शाखा उघडतात.

२) **वाढता खर्च भागविणे :** बहुराष्ट्रीय महामंडळे ही संशोधन, प्रयोग, व्यवस्थापन, जाहिरात इत्यादीवर प्रचंड खर्च करतात. हा खर्च केवळ एकाच देशातील बाजारपेठेतून वसूल होणे शक्य नसते. म्हणून ही मंडळे इतर देशात उत्पादन सुरू करणे, तेथील उद्योगांशी करार करून संयुक्त प्रकल्प उभारणे, इत्यादी मार्ग अवलंबितात.

३) **स्पर्धा :** आज बहुराष्ट्रीय महामंडळामध्ये तीव्र स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी त्यांना कमी खर्चात अधिक दर्जेदार उत्पादने व चांगली सेवा पुरविणे भाग पडत आहे. म्हणून हे मंडळे विविध देशात आपले प्रकल्प सुरू करतात. त्यामुळे अनेक फायदे होतात उदा. बाजारपेठेजवळ उत्पादन केल्याने विक्रीव्यवस्था सुलभ व कार्यक्षम होते. विविध देशातील लोकांच्या पसंतीनुसार उत्पादनात बदल करता येतो. विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांत कमी वेतनात कर्मचारीवर्ग उपलब्ध होतो. म्हणून विकसित देशातील महामंडळे विकसनशील देशात आपल्या शाखा उघडतात. याउलट विकसित देशातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, व्यवस्थापकीय कौशल्ये व इतर सोयीसुविधा मिळविण्यासाठी विकसनशील देशातील महामंडळे विकसित देशात उत्पादन सुरू करतात. अशाप्रकारे स्पर्धा महामंडळांना बहुराष्ट्रीय बनण्यास भाग पाडत आहे.

४) **वाहतूक, संप्रेषण व माहिती तत्रज्ञान**: या तीन क्षेत्रातील प्रगतीमुळेही एका देशातील महामंडळास इतर देशात आपले प्रकल्प सुरू करणे सोपे झाले आहे. अत्याधनिक संप्रेषण यंत्रणेमुळे विविध देशातील प्रकल्पांच्या कार्यात समन्वय साधता येतो. जलदगतीच्या वाहतूक साधनांमुळे भांडवल, तंत्रज्ञान, कामगार इ. एका देशातून दुसऱ्या देशात त्वरीत पाठविता येतात. उत्पादने त्वरीत जागतिक बाजार पेठेत पोहचविता येतात.

५) **उदारीकरण व खाजगीकरण**: १९८० नंतर अनेक देशांनी उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले. अर्थव्यवस्थेवरील अनिष्ट निर्बंध दूर केले. परकीय भांडवलास मुक्त प्रवेश दिला. सार्वजनिक उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविणे सुरू केले. आयातनिर्यात सुलभ केली. त्यामुळे बहुराष्ट्रीय महामंडळाची वाढ व विस्तार होण्यास चालना मिळाली.

**बहुराष्ट्रीय महामंडळांची जागतिकीकरणातील भूमिका –**

बहुराष्ट्रीय महामंडळे ही जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान करण्यात पुढीलप्रमाणे भूमिका पार पाडीत आहेत.

१) या महामंडळांच्या शाखा अनेक देशात आहेत. ही मंडळे ज्या देशात कमी आहे तेथे उत्पादन करतात व ज्या देशात बाजारपेठ आहे तेथे विकतात. या महामंडळाच्या शाखा अनेक देशात असून त्यांच्यात आर्थिक व्यवहार होतात. शिवाय ही मंडळे विविध देशांच्या शेअर बाजारात भांडवल गुंतवितात. त्यामुळे ही महामंडळे विविध देशांच्या अर्थव्यवस्थांना जोडण्याचे काम करतात व त्यामुळे जागतिकीकरणास चालना मिळते.

२) ही महामंडळे एखाद्या उत्पादनाचे सुट्टे भाग एका देशात बनवितात, त्यांची जुळणी दुसऱ्या देशात करतात व ते उत्पादन अनेक देशात विकतात. त्यामुळे स्थानिक स्तरापासून जागतिक स्तरापर्यंत

उत्पादन प्रक्रियेची एक शृंखला निर्माण होऊन त्यातून जागतिक बाजारपेठ निर्माण होते व स्थानिक उत्पादन जागतिक बाजारपेठेशी जोडले जाते. यातून जागतिकीकरण गतिमान होते.

३) विविध देश या महामंडळांना आपल्या देशात उत्पादन प्रकल्प सुरू करण्यास व भांडवल गुंतविण्यास आमंत्रित करतात. ज्या देशाचे धोरण आपणास फायद्याचे आहे तेथे ही महामंडळे गुंतवणूक करतात. आपणास फायदेशीर असेल असे धोरण या देशांना स्वीकारण्यास भाग पडतात. त्यामुळे या महामंडळांच्या शाखा ज्या ज्या देशात आहेत त्या देशांच्या धोरणात बराचसा एकसारखेपणा येतो. ही स्थिती जागतिकीकरणास अनुकूल ठरत आहे.

**आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था : जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व इतर** (International Finance Agencies : WB, IMF & others)

बहुराष्ट्रीय महामंळाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था ह्यादेखील जागतिकीकरणाचे एक माध्यम आहेत. या संस्थांच्या कार्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिशील होण्यास मोठी चालना मिळालेली आहे.

**आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था म्हणजे काय?** आंतरराष्ट्रीय स्तरावर म्हणजेच जागतिक स्तरावर कार्यरत असलेल्या संस्थेस आंतरराष्ट्रीय संस्था असे म्हणतात. एखाद्या व्यक्तीस वा समूहास वा संस्थेस वित्तपुरवठा म्हणजेच कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेस वित्तसंस्था असे म्हणतात. यावरून ''आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था म्हणजे जगातील विविध राष्ट्रांना वित्तपुरवठा वा कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेस आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था असे म्हणता येते.'' जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोन प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्था असून इतरही अनेक आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था आहेत.

**आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांचा उदय व विकास** - दुसऱ्या महायुध्दात जगातील अनेक देश उध्वस्त झाले होते. त्यांचे आर्थिक दिवाळे निघाले होते. उध्वस्त देशांची पुनर्रचना करणे, जागतिक व्यापार सुरळीत करणे, विदेशी चलनव्यवहारात स्थिरता आणणे, परस्पर सहकार्याने भांडवल गुंतवणूक करणे, जगातील राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये सहकार्य व शांततेचे संबंध प्रस्थापित करणे इत्यादी उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघासह (United Nations Orgnizations) अनेक आंतरराष्ट्रीय संस्था वा संघटना उदयास आल्या. कारण जगातील प्रत्येक राष्ट्रास परस्परांच्या आधाराची व सहकार्याची तीव्रतेने गरज भासू लागली होती. या पार्श्वभूमीवर आर्थिक क्षेत्रात प्रमुख तीन आंतरराष्ट्रीय संस्था उदयास आल्या त्या म्हणजे -

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetory Fund- IMF)

२) जागतिक बँक (World Bank)

३) जकात व व्यापारसंबंधीचा सामान्य करार (General Agreements on Terrifs and Trade-GATT)

या तीन संस्थांना मिळून **ब्रेटनवूडस् संस्था** असे म्हणतात. कारण १९४४ मध्ये अमेरिकेतील ब्रेटनवूडस येथे भरलेल्या परिषदेतील करारानुसार त्यांची स्थापना झाली आहे. या संस्थांचे विवेचन पुढीलप्रमाणे-

**१) आंतरराष्ट्रीय नाणे निधी** (International Monetory Fund- IMF)

आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तपुरवठा करणारी ही एक प्रमुख संस्था असून तिची स्थापना जुलै १९४४ मध्ये झाली तर प्रत्यक्ष अंमलबजावणी २७ डिसेंबर १९४५ पासून सुरू झाली.

**उद्दिष्टे** – आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्थिर स्वरूपाचे आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध निर्माण करणे.

२) आंतरराष्ट्रीय चलन व विनिमय दर प्रस्थापित करणे.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करणे.

४) सदस्य राष्ट्रांना निधी उपलब्ध करून देणे.

५) आंतरराष्ट्रीय व्यवहार समतोलाच्या समस्या असणाऱ्या सदस्य राष्ट्रांना मदत करणे.

**सदस्यत्त्व व भांडवल –** सद्या या निधीचे १८६ देश सदस्य आहेत. या निधीच्या संचालनासाठी एक मंडळ आहे. प्रत्येक सदस्य देशास या निधीमध्ये गव्हर्नर व वैकल्पिक गव्हर्नर अशी दोन पदे प्राप्त होतात. विविध देशांच्या गव्हर्नर्समधून या निधीचे गव्हर्नर्स मंडळ बनविले जाते. या मंडळातील गव्हर्नर्सच्या मताची शक्ती ही संबंधित देशास मिळालेल्या हिस्स्यावर (Quota)अवलंबून आहे. सदस्य राष्ट्रे या निधीकडे एक प्राथमिक ठेव ठेवतात. त्या ठेवीचा कांही भाग सोन्याच्या रूपात ठेवावा लागतो. आपण ठेवलेल्या ठेवीपेक्षा अधिक रक्कम सदस्य राष्ट्र आर्थिक संकटाच्या वेळी या निधीकडून कर्जाऊ म्हणून घेऊ शकतात. साधारणपणे पाच वर्षाच्या मुदतीत हे कर्ज फेडावयाचे असते. सर्वाधिक ठेव ठेवणाऱ्या राष्ट्रांचा प्रत्येकी एक याप्रमाणे पाच संचालक व इतर सभासद राष्ट्रांचे सात संचालक नाणेनिधीवर असतात.

**२) जागतिक बँक** (World Bank-WB)

जागतिक बँकेची स्थापना आंतरराष्ट्रीय नाणे निधीबरोबरच झाली. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोन्ही परस्परपूरक संस्था आहेत. जागतिक बँक संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्न आहे. पण तिचे कामकाज मात्र स्वतंत्रपणे चालते.

**उद्दिष्टे** – जागतिक बँकेची ४ प्रमुख उद्दिष्टे आहेत.

१) आपल्या सदस्य राष्ट्रांना उत्पादक कार्यासाठी भांडवल पुरवून त्याच्या विस्तारास मदत करणे.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारात दीर्घकालीन वाढ करणे.

३) परकीय गुंतवणूकीत सहभागी होऊन अशा गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.

४) जेथे खाजगी भांडवल उपलब्ध नाही तेथे उत्पादक कार्यासाठी सुलभ अटीवर कर्ज पुरविणे.

वरील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी जागतिक बँक आपल्या सदस्य राष्ट्रांना शेती विकास, उद्योग उभारणे, खाणकाम, पाणीपुरवठा, दळणवळण, ऊर्जानिर्मिती, वनीकरण इत्यादीसाठी वित्तपुरवठा करते. तसेच तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन पुरविते.

**सदस्यत्त्व** - जागतिक बँकेचे सदस्य होण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सदस्य असणे अनिवार्य आहे. विशिष्ट परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सदस्यात्त्वाच्या त्याग केला तरी जागतिक बँकेचे सदस्यत्त्व चालू ठेवता येते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ७५ टक्के सदस्यांची सहमती आवश्यक असते. सदस्य राष्ट्रास राजीनामा देता येतो. नियमभंग करणाऱ्या सदस्य राष्ट्राचे सदस्यत्त्व गव्हर्नर्स मंडळ रद्द करू शकते.

**सदस्य संस्था** - जागतिक बँक ही वेगवेगळ्या पाच संस्थांचा समूह आहे. त्या संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

**१) आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण व विकास बँकः** हीची स्थापना १९४५ मध्ये झाली. हिचा मुख्य उद्देश दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळातील अर्थव्यवस्थांची पुनर्रचना करण्यासाठी त्यांना मदत करणे हा होता. आता ती सदस्य राष्ट्रांना विकासासाठी कर्ज देते.

**२) आंतरराष्ट्रीय विकास अभिकरणः** (International Development Agency - IDA): याची स्थापना १९६० मध्ये झाली. यास जागतिक बँकेची उदार खिडकी (Soft Window) म्हणतात. कारण हे अभिकरण सदस्य राष्ट्रांना बिनव्याजी कर्ज ३५ वर्षासाठी देते. कर्ज घेणाऱ्या देशास सेवा शुल्क (०.७५%) द्यावे लागते.

**३) आंतरराष्ट्रीय वित्त निगम** (International Finance Corporation - IFC): याची स्थापना १९५६ मध्ये झाली. याला जागतिक बँकेची खाजगी शाखा म्हणतात. सदस्य राष्ट्रातील खाजगी संस्था व कंपन्यांना व्यापारी व्याज दराने कर्ज देण्याचे कार्य हा निगम करतो. कंपनीने कर्ज फेड न केल्यास सदस्य राष्ट्रास ते फेडावे लागते.

**४) बहुपक्षीय गुंतवणूक हमी अभिकरण** (Multilateral Investment Guarantee Agency - MIGA): याची स्थापना १९८८ मध्ये झाली. विकसनशील राष्ट्रात परकीय गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे हा याचा उद्देश आहे. परकीय भांडवल गुंतवणूकीदारास सदस्य राष्ट्रात केलेल्या गुंतवणूकीच्या प्रमाणात विमा दिला जातो. जो बिगरव्यापारी जोखीम पत्करतो.

**५) आंतरराष्ट्रीय भांडवल कलह निवारण केंद्र** (International Investment Disput Settlemnet Centre - ICSID) : याची स्थापना १९६६ मध्ये झाली. परकीय गुंतवणुकीच्या संदर्भात उद्भवलेला कलह सोडविणे हा याचा उद्देश आहे. याचे सदस्यत्त्व ऐच्छिक आहे. सदस्य राष्ट्रांना या केंद्राचे निर्णय बंधनकारक असतात.

**आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांची जागतिकीकरणातील भूमिका**: आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व इतर आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था ह्या जागतिकीकरणाची प्रक्रिया गतीशिल, व्यापक करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत.

१) जगातील बहुसंख्य विकसित तसेच अविकसित राष्ट्रे या संस्थांचे सभासद आहेत. त्यामुळे या वित्तीय संस्थांच्या माध्यमातून या सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक व व्यापारी संबंध निर्माण झालेले आहेत. त्यातूनच या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था परस्परांशी जोडल्या गेल्या आहेत आणि त्यातून एक जागतिक अर्थव्यवस्था (Global economy) निर्माण होण्यास मदत झाली आहे.

२) आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था ह्या आपल्या सदस्य राष्ट्रांना आर्थिक संकटाच्या काळात कर्ज देतात. कर्ज देताना या संस्था सदस्य राष्ट्रांना जागतिकीकरणाचे, उदारिकरणाचे व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारण्यास भाग पाडतात. यामध्ये परकीय व्यापार मुक्त करणे, परकीय भांडवल, तंत्रज्ञान, श्रम, व्यवस्थापन, बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादींना मुक्त प्रवेश देणे, आर्थिक व्यवहारातील अनावश्यक निर्बंध काढून टाकणे किंवा शिथील करणे, उद्योगधंद्यातील सार्वजनिक क्षेत्राचा जास्तीत जास्त वाव देणे इत्यादी अटी या वित्तसंस्था सदस्य राष्ट्रांवर घालतात. गरजू राष्ट्रांना या अटी स्वीकारणे भाग पडते. यातूनच जागतिकीकरणास चालना मिळते. उदा. १९९१ मध्ये भारतात आर्थिक संकट उद्भवले तेव्हा भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या निधीने भारतावर वरील अटी घातल्या. त्यामुळे नरसिंहराव सरकारला जागतिकीरणाचे धोरण स्वीकारावे लागले.

३) आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था ह्या आपल्या सदस्य राष्ट्रांना वित्तपुरवठ्या बरोबरच तांत्रिक साहाय्य, सल्ला व मार्गदर्शन देतात. हा सल्ला व मार्गदर्शन सदस्य राष्ट्रे स्वीकारतात. त्यामुळे या संस्थांच्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक व इतर धोरणात बराचसा एकसारखेपणा येतो. त्यातून जागतिकीकरणास चालना मिळते.

**३) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना** (GATT and WTO): दुसऱ्या महायुध्दाच्या काळात (१९३९-१९४५) विविध राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय व्यापारावर कडक निर्बंध लादले. त्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थांना संरक्षण मिळाले. परंतू आंतरराष्ट्रीय व्यापार विस्कळीत झाला व त्यामध्ये घट ही झाली. युध्द थांबल्यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत करण्यासाठी व वाढविण्यासाठी १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी ''जकात व व्यापार'' याविषयीचा सामान्य करार (General Agreement on Terifs and Trade) केला. या करारास संक्षिप्त रुपात गॅट (GAAT) करार असे म्हणतात. या करारास प्रारंभी काही राष्ट्रांनी विरोध केला. पण त्याचा फायदा समजल्यानंतर पुढे अनेक राष्ट्रे या करारात सहभागी झाली. १९९४ मध्ये त्यांची संख्या ११७ झाली. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्यादृष्टीने गॅट करारातील अडथडे दूर करण्यासाठी गॅटचे महासंचालक **आर्थर डंकेल** यांनी एक प्रस्ताव तयार केला. गॅटच्या सदस्य राष्ट्रांनी हा प्रस्ताव उरूग्वे येथील परिषदेत मान्य केला. या प्रस्तावास गॅट ऐवजी जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisaion - WTO) असे नाव दिले. १ जानेवारी १९९५ रोजी ही संघटना स्थापन झाली.

**जागतिक व्यापार संघटनेची जागतिकीकरणातील भूमिका** - जागतिक व्यापार संघटना ही जागतिकीकरणात महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. जागतिक व्यापार वाढविणे, त्यासाठी जकातीचे (आयात-निर्यातीचे) दर घटविणे, शेतीमालावरील अनुदान घटविणे, सदस्य राष्ट्रांचे उत्पादन, रोजगार, जीवनमान वाढविणे, पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करणे, सदस्य राष्ट्रांचा विकास करणे इत्यादी या संघटनेची उद्दिष्टे असून ती साध्य करण्यासाठी ही संघटना सदस्य राष्ट्रांना मदत करते, त्यांना सल्ला व मार्गदर्शन पुरविते. सदस्य राष्ट्रांच्या ध्येयधोरणावर ती प्रभाव टाकते. सद्या १४२ देश या संघटनेचे सदस्य असून सुमारे ९५ टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार या संघटनेच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे जगातील विविध राष्ट्रांमध्ये आर्थिक-वित्तीय-व्यापार विषयक परस्परसंबंध निर्माण होण्यास मोठी मदत होत आहे. यातूनच जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडावा.**

१) ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना कोणत्या देशात झाली?

अ) भारत ब) इंग्लंड क) अमेरिका ड) जपान

२) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना कोणत्या साली झाली?

अ) १९४४ ब) १९४५ क) १९४६ ड) १९४७

३) कोणत्या संस्थेस जागतिक बँकेची उदार खिडकी असे म्हणतात?

अ) IFC ब) ICSID क) IDA ड) MIGA

४) गॅट करार कोणत्या साली झाला?

अ) १९४४ ब) १९४५ क) १९४६ ड) १९४८

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) बहुराष्ट्रीय महामंडळाची व्याख्या द्या.

२) आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था म्हणजे काय?

३) ब्रेटनवूडस् संस्थांची नावे सांगा.

४) GATT चे पूर्ण रूप द्या.

५) जागतिक व्यापार संघटनेविषयीचा प्रस्ताव कोणी तयार केला होता?

## २.२.२ राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने आणि बाजारपेठ

राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने व बाजारपेठ ही देखील जागतिकीकरणाची प्रभावी माध्यमे आहेत. त्यांच्यामुळे जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

**१) राष्ट्र-राज्ये** (Nation-States): आज जगात अनेक राज्ये असून त्यांना राष्ट्र-राज्ये म्हणून ओळखले जाते.

**राष्ट्र-राज्याचा अर्थ** - समान इतिहास, भाषा, वंश, संस्कृती इत्यादी घटकांमुळे ज्या समुदायात एकतेची भावना निर्माण झालेली आहे अशा समुदायास राष्ट्र म्हणतात आणि असा एकतेची भावना असलेला समुदाय जेंव्हा विशिष्ट भूप्रदेशात राहातो व त्या भूप्रदेशावर एकाच राजकीय सत्तेचा अमल असतो तेंव्हा त्यास राष्ट्र-राज्य असे म्हणतात.

आज जगात सर्वच राष्ट्रे ही राष्ट्र-राज्ये असली तरी पूर्वी अशी राष्ट्र-राज्ये नव्हती. उदा. प्राचीन काळात ग्रीक लोकांचे एक राष्ट्र होते म्हणजेच त्यांच्यात एकतेची भावना होती. पण ग्रीकांची वेगवेगळी नगर-राज्ये (City-States) होती व त्यांच्यात युध्दे देखील होत असत. पहिल्या

महायुध्दानंतर जगाने स्वयंनिर्णयाचे तत्त्व स्वीकारले व प्रत्येक राष्ट्राचे एक राज्य निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली.

**राष्ट्र–राज्यांची जागतिकीकरणातील भूमिका–**

जगातील विविध राष्ट्र–राज्ये ही जागतिकीकरणाचे एक माध्यम म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत. आधुनिक काळात वाहतुकीची व संप्रेषणाची प्रगत साधणे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे एका राष्ट्र–राज्यातून जगाच्या कोणत्याही राष्ट्र–राज्यात त्वरीत स्थलांतर करणे सुलभ झाले आहे. परिणामी विविध राष्ट्र–राज्यांमध्ये आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होऊ लागले आहेत. यातूनच संपूर्ण जगाची एक व्यवस्था (Global-System) निर्माण होण्यास म्हणजेच जागतिकीकरणास चालना मिळालेली आहे.

२० व्या शतकात विविध राष्ट्र–राज्यांमध्ये परस्पर सहकार्य व परस्परावलंबन वाढत गेले. यातून आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी राष्ट्र–राज्यांनी एकत्र येऊन अनेक आंतरराष्ट्रीय संघटना (उदा. राष्ट्रसंघ, संयुक्तराष्ट्र संघटना) तसेच प्रादेशिक किंवा क्षेत्रिय संघटना (उदा. अरब लिग, अमेरिकन राष्ट्रसंघ, आफ्रिकन ऐक्य संघटना, फ्रेंच कम्युनिटी, युरोपियन संघ, ओपेक, सार्क इत्यादी) स्थापन केलेल्या आहेत. याशिवाय या राष्ट्र–राज्यांनी कांही लष्करी करार किंवा संघटनाही (उदा. नाटो, वार्सा, सिटो इ.) स्थापन केलेल्या आहेत. या सर्व संघटना आपल्या सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लष्करविषयक इत्यादीबाबतीत परस्पर सहकार्य व परस्परावलंबन निर्माण करून त्याद्वारे सामूहिक हितसंबंध साध्य करण्याचे कार्य करीत आहेत. यासाठी ही राष्ट्र–राज्ये परस्परांशी तह व करार करीत आहेत. या तहातील व करारातील अटी व नियम यांचे पालन त्यांना करावे लागते. त्यामुळे या राष्ट्रा–राज्यांच्या ध्येयधोरणात एकसारखेपणा कांही बाबतीत तरी निर्माण होत आहे. परिणामी, ही स्थिती जागतिक व्यवस्था निर्माण करण्यास म्हणजेच जागतिकीकरणास पोषक ठरत आहे.

**संप्रेषण साधने** (Media) – संप्रेषण साधने ही देखील जागतिकीकरणाचे प्रभावी माध्यम आहेत. संप्रेषण साधनांना मराठीत जनसंपर्क साधने किंवा प्रसार माध्यमे असेही म्हणतात.

**संप्रेषण माध्यमाची व्याख्या : १) चंद्रकांत खंडागळे :** ज्या साधनांच्याद्वारे विचार, मते, कल्पना, ज्ञान, माहिती इत्यादींचे एका व्यक्तीकडून किंवा समूहाकडून दुसऱ्या व्यक्तीकडे किंवा समूहाकडे संक्रमण (हस्तांतरण) करता येते त्या साधनांना संप्रेषण साधने असे म्हणतात.

**२) विल्यम स्कॉट** : ग्रंथ, नियतकालिक, रेडिओ, टी.व्ही. चित्रपट यासारखे संप्रेषणाचे कोणतेही साधन जे असंख्य लोकांपर्यंत पोहचू शकते त्यास संप्रेषण साधन असे म्हणतात.

संप्रेषण साधनांचे मुद्रित साधने (Print media) व इलेक्ट्रॉनिक्स साधने (Electronic media) असे दोन प्रकार पडतात. वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, टपाल, तारायंत्र इत्यादी मुद्रित साधने आहेत तर रेडिओ, टी.व्ही, सिनेमा, इंटरनेट, मोबाईल इत्यादी इलेक्ट्रॉनिक्स साधने आहेत.

आधुनिक काळात दिवसेंदिवस संप्रेषण साधनांची वाढ, विस्तार व विकास होत असून त्यांचा मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर मोठा प्रभाव पडला आहे.

**संप्रेषण साधनांची जागतिकीकरणातील भूमिका–**

संप्रेषण साधनांमुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया ही गतिमान होण्यास मोठी चालना मिळाली आहे.

१) संपर्क साधनांमुळे जगाच्या कोणत्याही भागातील व्यक्ती, समूह, संस्था व संघटना इत्यादींशी पाहिजे तेंव्हा त्वरीत संपर्क साधता येतो. त्यामुळे व्यक्तीव्यक्तीत विचार, ज्ञान माहिती इत्यादींची देवाणघेवाण करता येते. कोणताही संदेश जगात कोठेही पोहचविता येतो. त्यामुळे जगातील विभिन्न लोकांमध्ये, संस्था व संघटनांमध्ये घनिष्ठ असे परस्परसंबंध प्रस्थापित होऊन संपूर्ण जग जणू एक खेडे (Global Village) बनले आहे. म्हणजेच, संप्रेषण साधनांमुळे जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली आहे.

२) संप्रेषण साधनांमुळे जगाच्या कोणत्याही भागात उद्‌भवलेली समस्या व प्रश्न यांचा प्रभाव जगाच्या इतर भागावरही पडू लागला आहे. एका राष्ट्रात उद्‌भवलेली समस्या ही संपूर्ण जगाची समस्या आहे असे लोकांना संप्रेषण साधनांमुळे वाटू लागले आहे. आणि या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी विविध राष्ट्रांतील लोक परस्परांना सहकार्य करू लागले आहेत. यातूनच जागतिकीकरणास चालना मिळाली आहे.

३) संप्रेषण साधनांमुळे जगातील उद्योग, व्यापार, सेवा, कृषी इत्यादी क्षेत्रातील ज्ञान व माहिती जगातील सर्व लोकांना एकाच वेळी उपलब्ध होऊ लागली आहे. ज्ञान, माहिती, तंत्रे, कौशल्ये इत्यादींचे प्रसारण जगभर एकाच वेळी संप्रेषण साधनांच्याद्वारे करता येऊ लागले आहे. ई-बँकींगमुळे जगातील कोणत्याही बँकेतून पैसे काढणे व पैसे भरणे शक्य झाले आहे. व्यापारविषयक गरजा भागविण्यासाठी खास सॉफ्टवेअर विकसित केल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले हिशोब ठेवणे, आयात-निर्यातीची यादी बनविणे, खरेदी-विक्रीचे विश्लेषण करणे, उलाढालीवर नियंत्रण ठेवणे, योग्य तो निर्णय घेणे इत्यादी गोष्टी शक्य झाल्या आहेत. त्यामुळे एकाच छताखाली बसून जगभर आपल्या कार्याचा विस्तार करणे व त्या कार्यावर देखरेख ठेवणे शक्य झाले आहे. यातूनच जगातील लोकांत परस्परावलंबन व परस्परसहकार्य निर्माण होऊन जागतिक व्यवस्था प्रस्थापित होण्यास म्हणजेच जागतिकीकरण होण्यास चालना मिळाली आहे.

४) संप्रेषण साधनांद्वारे जगातील उद्योजकांना आपल्या उत्पादनांची संपूर्ण जगात जाहिरात करता येऊ लागली आहे. त्यामुळे दैनंदिन वापराच्या वस्तूंबाबतच्या (उदा. वस्त्रे, बूट, चपला, साबण, तेल, टूथपेस्ट, फास्ट फूड, शीत पेये इ.) आवडीनिवडी एकसारख्या बनत चालल्या आहेत. त्याचबरोबर संप्रेषण साधनांमुळे जगातील लोकांच्या श्रद्धा, मूल्ये, मते, दृष्टिकोन इत्यादीमध्येही समानता येत चालली आहे. म्हणजेच जगभरात एक समान अशी संस्कृती विकसित होऊ लागली आहे. यातूनच जागतिक स्तरावर एक सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होण्यास सुरूवात झाली आहे. परिणामी, जागतिकीकरणास पोषक अशी स्थिती निर्माण झाली आहे.

अशाप्रकारे संप्रेषण साधने ही जागतिकीकरणाचे माध्यम म्हणून प्रभावी भूमिका पार पाडीत आहेत.

**बाजारपेठ** (Market)

बाजारेपठ देखील जागतिकीकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे. बाजारपेठ हे असे ठिकाण असते की जेथे वस्तू व सेवा यांचा विनिमय किंवा खरेदी–विक्री होते. बाजारपेठेचे स्थानिक बाजारपेठ, राष्ट्रीय बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ असे एक वर्गीकरण केले जाते. जागतिकीरणाची प्रक्रिया गतिमान करण्यामध्ये बाजारपेठांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, श्रम, तंत्रज्ञान इत्यादींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारातून भांडवल उभारण्यास व आपली उत्पादने परकीय बाजारपेठेत विकण्यास परवानगी मिळाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्यांचा विस्तार होऊ लागला आहे. जागतिकीकरणात देशाची अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे अभिप्रेत आहे. बाजारपेठांच्या विस्तारांमुळे अशी जोडणी शक्य झाली आहे. एका देशातील उत्पादीत वस्तू जगाच्या कोणत्याही देशातील बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे संपूर्ण जगासाठी एकच बाजारपेठ तयार होऊन जग हे जणू एक खरेदीविक्रीचे केंद्र बनले आहे. त्यामुळे बाजारपेठा ह्या जागतिक व्यवस्था निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम बनलेल्या आहेत. जागतिकीकरणामुळे आयातीचे दर कमी झाल्याने एखाद्या देशातील बाजारपेठेत परदेशातील विविध दर्जेदार उत्पादने भरपूर प्रमाणात व वाजवी भावात उपलब्ध झाली आहेत. यामध्ये विविध घरगुती उपकरणे, वाहने यांच्याबरोबरच वस्त्रे, सौंदर्य प्रसाधने, खाद्यपदार्थ, पेये इत्यांदीचा समावेश आहे. त्यामुळे जगातील लोकांच्या पोषाखाच्या व खाण्यापिण्याच्या सवयीत एकसारखेपणा येऊ लागला आहे. थोडक्यात बाजारपेठांच्या माध्यमातून जगातील विविध देशांच्या लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनपद्धतीत एकसारखेपणा येत चालला आहे. यातूनच जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास चालना मिळाली आहे.

★ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडावा.**

१) जगातील राज्ये काय म्हणून ओळखली जातात.

अ) देश  ब) राष्ट्रे  क) राष्ट्र–राज्ये  ड) नगर राज्ये

२) प्राचीन काळात ग्रीकांची राज्ये कोणत्या प्रकारची होती?

अ) नगर–राज्ये  ब) राष्ट्र–राज्ये  क) स्वयंपूर्ण राज्ये  ड) स्वायत्त राज्ये

३) खालीलपैकी कोणत्ये इलेक्ट्रॉनिक्स संप्रेषण साधन आहे?

अ) वृत्तपत्र  ब) नियतकालिक  क) टपाल  ड) टेलिव्हिजन

४) कोणत्या साधनांद्वारे उद्योजकांना आपल्या उत्पादनाची संपूर्ण जगात जाहिरात करता येते?

अ) वाहतूक  ब) संप्रेषण  क) अमूर्त साधने  ड) यापैकी नाही

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राष्ट्र म्हणजे काय?

२) संप्रेषण माध्यमाचा अर्थ सांगा.

३) मुद्रित संप्रेषण साधने कोणकोणती आहेत.

४) बाजारपेठ म्हणजे काय?

### **२.२.३ अशासकीय संघटना** (Non-Governmental Organizations – NGOs)

बहुराष्ट्रीय महामंडळे व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था यांच्याप्रमाणेच बिगरशासकीय (अशासकीय) संघटना ह्यादेखील जागतिकीकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे. या संघटनांसाठी एनजीओज् (NGOs) हे संक्षिप्त रूप वापरतात. आपणही हेच संक्षिप्त रूप पुढील विवेचनात वापरणार आहोत. एनजीओज् जागतिकीरणाचे माध्यम म्हणून कशी भूमिका पार पाडतात किंवा जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रवाही करण्यासाठी कोणते योगदान देतात हे तुम्ही समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम एनजीओज्चा अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये थोडक्यात समजावून घेऊ.

**अशासकीय संघटनेचा अर्थ व व्याख्या –**

शासन किंवा सरकारपासून स्वतंत्र असलेल्या व खागजी व्यक्तींनी ऐच्छिकपणे एकत्रीत येऊन सामजिक बांधिलकीतून कार्य करण्यासाठी स्थापन केलेल्या संघटनेस बिगरशासकीय संघटना असे म्हणतात. बिगरशासकीय संघटनेचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी तिच्या कांही व्याख्या विचारात घेणे उचित ठरते.

**१) चंद्रकांत खंडागळे** – मानवी जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात सेवाभावीवृत्तीने लोकोपयोगी कार्ये करणाऱ्या पण शासकीय यंत्रणेचा भाग नसलेल्या ऐच्छिक संघटनेस बिगरशासकीय संघटना असे म्हणतात.

**२) संयुक्त राष्ट्रे** (United Nations) – शासकीय नियंत्रणापासून स्वतंत्र असलेल्या कोणत्याही प्रकारच्या खाजगी संघटनेस बिगरशासकीय संघटना असे म्हणतात.

**अशासकीय संघटनांची वैशिष्ट्ये –**

वरील व्याख्यांच्या आधारे एनजीओज्ची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

**१) सार्वत्रिकता** – बिगरशासकीय संघटना सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत. म्हणजे जगातील सर्व प्रकारच्या समाजात किंवा देशात या संघटनाचे अस्तित्त्व दिसून येते. विकसित, अविकसित, विकसनशील अशा सर्व समाजात या संघटना स्थापन केलेल्या आहेत आणि त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. विकसित देशांत त्यांची संख्या लक्षणीय आहे. अमेरिकेत सुमारे १५ लाख, रशियात २.७७ लाख तर भारतात २० लाख इतक्या एनजीओज् २००९ मध्ये कार्यरत होत्या.

**२) विविध स्तर** – बिगरशासकीय संघटना या स्थानिक (Local) राष्ट्रीय (National), क्षेत्रिय (Regional), आंतरराष्ट्रीय (International) अशा विविध स्तरावर कार्यरत आहेत. कांही एनजीओज्चे कार्यक्षेत्र हे स्थानिक स्तरापुरतेच मर्यादित असते. उदा. 'बटरफ्लाईज' (Butterflies) ही एनजीओ दिल्ली शहर व आसपासच्या भागातील भटक्या मुलांच्या शिक्षणासाठी कार्य करते. आंध्र प्रदेशातील रंगा रेड्डी जिल्ह्यातील एम. व्ही. फाऊंडेशन ही एनजीओ बालमजूरीच्या निर्मूलनासाठी

कार्य करते. महाराष्ट्रातील 'वनराई' ही एनजीओ पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे कार्य करते. कांही एनजीओचे कार्यक्षेत्र हे राष्ट्रीय स्तरावर चालते. उदा. 'कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट' ही एनजीओ राष्ट्रीय स्तरावर (भारतभर) स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य करते. कांही एनजीओज् या क्षेत्रीय वा प्रादेशिक स्तरावर कार्यरत आहेत. या एनजीओज् विशिष्ट क्षेत्रातील, वा प्रदेशातील वा खंडातील राष्ट्रांनी परस्पर सहकार्याने आपल्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी स्थापन केलेल्या आहेत. उदा. अरब लीग, अमेरिकन राष्ट्र संघटना, आफ्रिकन ऐक्य संघटना, फ्रेंच कम्युनिटी, दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (म्हणजे सार्क), दक्षिण पॅसिफिक फोरम इत्यादी. कांही एनजीओज् या आंतरराष्ट्रीय म्हणजेच जागतिक स्तरावर कार्यरत आहेत. उदा. रेडक्रॉस, मानवी हक्क आयोग, अम्नेस्टी इंटरनॅशनल, आंतरराष्ट्रीय ऑलंपिक समिती, आंतरराष्ट्रीय चेंबर ऑफ कॉमर्स, लायन्स क्लब, रोटरी क्लब इ. वाहतूकीची व संप्रेषणाची प्रगत साधने, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली क्रांती, जागतिक व्यापारात झालेली वाढ, बहुराष्ट्रीय महामंडळांचे विस्तारलेले कार्यक्षेत्र इत्यादी कारणांमुळे जगातील विविध राष्ट्रांत घनिष्ठ असे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. ही राष्ट्रे आपल्या गरजापूर्तीसाठी परस्परावलंबी बनली आहेत. त्यामुळे त्यांना परस्परसहकार्य करणे भाग पडत आहे. यातूनच क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर हजारो एनजीओज् उदयास आलेल्या आहेत.

३) **विविध कार्यक्षेत्राशी संबंधित** - एनजीओज् या मानवी जीवनाच्या विविध क्षेत्राशी संबंधित आहेत. आर्थिक, औद्योगिक, वाणिज्य, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आरोग्य, मानवता, नैतिकता अशा विभिन्न क्षेत्रात एनजीओज् कार्यरत आहेत. आपापल्या क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी त्या कार्य करतात. उदा. युध्दात व नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या जखमींना वैद्यकीय मदत पुरविण्याचे कार्य रेडक्रॉस करते. मानवी हक्क आयोग हा मानवाच्या मूलभूत हक्कांसंबंधीच्या प्रश्नांवर लढा देतो. अम्नेस्टी इंटरनॅशनल ही एनजीओ मृत्यूदंड व हिंसाचार यांना विरोध करून कैद्यांच्या हक्कांसाठी प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय ऑलंपिक समिती ही विविध क्रीडाप्रकारांना प्रोत्साहन देते. मुलांच्या चारित्र्याची जडणघडण करण्याचे कार्य स्काऊट्स अँड गाईड्स ही एनजीओ करते. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध देशातील कामगार संघटनांचा आंतरराष्ट्रीय महासंघ उदयास आलेला आहे. याशिवाय डॉक्टर्स, वकील, शिक्षक, अभियंता इत्यादी व्यावसायिकांच्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संघ स्थापन झालेले आहेत.

४) **ऐच्छिक संघटना –** एनजीओज् या ऐच्छिक स्वरूपाच्या संघटना आहेत. कारण त्यांचे सदस्यत्त्व स्वीकारणे वा नाकारणे हे व्यक्तीच्या समूहाच्या वा राष्ट्राच्या इच्छेवर अवलंबून असते. त्यासाठी सक्ती वा जबरदस्ती केली जात नाही. सेवाभावीवृत्ती, बांधिलकी, समाजकार्याची आवड, समान हितसंबंधाची जाणीव असलेल्या व्यक्ती वा समूह एकत्र येऊन उत्स्फूर्तपणे एनजीओची स्थापना करतात.

५) **लोकोपयोगी कार्ये –** एनजीओज् ह्या लोकोपयोगाची म्हणजेच समाजहिताची कार्य पार पाडीत असतात. बहुसंख्य एनजीओज् या मानवतेच्या भूमिकेतून सेवाभावीवृत्तीने कल्याणकारी कार्ये पार पाडतात. विशेषतः समाजातील दुर्बल, वंचित, पीडित, गरजू अशा घटकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्या कार्य करतात. हे कार्य करताना त्यांचा हेतू नफा कमविणे हा नसतो, तर सेवा देणे हा असतो. त्यांचे कार्य हे धर्मदाय स्वरुपाचे असते. कांही एनजीओज् या विशिष्ट समूहाच्या वा

समुदायाच्या हितसंबंधासाठी झटत असतात. कांही एनजीओज् या अतिव्यापक प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी (उदा. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, वन्यजीवांचे रक्षण करणे, मानवी हक्कांची प्रस्थापना करणे इत्यादी) झटत असतात.

६) **शासनसंस्थेपासून स्वतंत्र –** एनजीओज् या शासनसंस्थेपासून स्वंतत्र असतात. त्या शासकीय किंवा सरकारी यंत्रणेचा भाग नसतात. शासकीय नियंत्रणापासून त्या मुक्त राहून कार्य करतात. म्हणूनच त्यांना बिगरशासकीय वा बिनसरकारी संघटना असे म्हणतात. तथापि, एनजीओज्‌ना त्या त्या राष्ट्रातील शासकीय कायद्यांचे/नियमांचे पालन करूनच आपले कार्य करावे लागते. सरकार या संघटना मार्गदर्शन, मदत, प्रोत्साहन, सूचना देऊ शकते. शासकीय योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे काम शासन एनजीओज्‌वर सोपवू शकते. एनजीओज्‌ना शासकीय दरबारी नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी लागते. अशा नोंदणीकृत एनजीओज्‌ना शासन त्यांचे कल्याणकारी समाजोपयोगी कार्य विचारात घेऊन करसवलतही देऊ शकते.

**अशासकीय संघटनांची जागतिकीकरणातील भूमिका –**

बिगरशासकीय संघटना ह्या जागतिकीकरणाचे एक प्रभावी माध्यम म्हणून कार्य करीत आहेत. विविध राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंध व सहकार्य प्रस्थापित करून त्यांना एका जागतिक व्यवस्थेत सहभागी करण्यामध्ये एनजीओज् महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. जागतिकीकरणातील त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

१) **जागतिक व्यवस्था निर्मिती –** आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या एनजीओज् ह्या एखाद्या उद्‌दिष्टाच्यापूर्तीसाठी जागतिक स्तरावर एखादी व्यवस्था निर्माण करू शकतात आणि त्या व्यवस्थेत विविध राष्ट्रांना व त्यांच्या नागरिकांना सहभागी करून घेऊ शकतात. यातून जागतिकीकरणास चालना मिळते. कारण या एनजीओज्‌च्या शाखा किंवा घटकसंस्था या विविध राष्ट्रात कार्यरत आहेत. या शाखांच्या कार्यात समन्वय साधण्याचे त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावरील एनजीओज् करतात. या एनजीओजची स्थानिक स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत स्वतःची अशी व्यवस्थापकीय यंत्रणा असते. त्यामुळे त्यांना अशी जागतिक चळवळ उभारणे शक्य होते. उदा. आंतरराष्ट्रीय ऑलंपिक समिती ही एनजीओ दर ४ वर्षानी जागतिक ऑलंपिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करते. अनेक देशात तिच्या शाखा (राष्ट्रीय ऑलंपिक संघटना) आहेत. या शाखा आपापल्या खेळाडूंना या जागतिक स्पर्धेत सहभागी होण्यास प्रोत्याहन व मदत देतात. या शाखांना आंतरराष्ट्रीय ऑलंपिक समितीचे नियम पाळावे लागतात. यातूनच जागतिक स्तरावर खेळांसंबंधीची एक व्यवस्था निर्माण झाली आहे. अशाच प्रकारे इतरही आंतरराष्ट्रीय स्तरावरील एनजीओज्‌नी आपापल्या कार्य क्षेत्रात जागतिक व्यवस्था निर्माण केली आहे व त्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होत आहे.

२) **मनोवृत्तीची निर्मिती** – विविध एनजीओज् या जागतिकीकरणास अनुकूल अशी मनोवृत्ती विकसित करण्याचे कार्य करून जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रवाही करण्यास मदत करीत आहेत. जागतिकीकरणाचे समर्थन करणारी राष्ट्रे व त्या राष्ट्रातील बहुराष्ट्रीय महामंडळे ही आपल्या आर्थिक, औद्योगिक, वाणिज्य, व्यापार इत्यादी विषयाची ध्येयधोरणे, योजना, कार्यक्रम इत्यादींची विविध राष्ट्रांत जाहिरात करणे, त्यांची अंमलबजावणी करणे अशी कामे एनजीओज्‌वर सोपवितात.

एनजीओच्या या कार्यामुळे जागतिकीकरणास अनुकूल वा पोषक मनोवृत्ती निर्माण होते. उदा. अनेक एनजीओज् या फोर्ड फाउंडेशनसारख्या संस्थेच्या मदतीने आपल्या सदस्यांना वा कार्यकर्त्यांना परदेशात प्रशिक्षणासाठी पाठवितात. या प्रशिक्षणातून जागतिकीकरण कसे उपयुक्त वा फायदेशीर आहे हे पटवून दिले जाते. हे प्रशिक्षित कार्यकर्ते पुढे जागतिकीकरणाचे दूत व समर्थक म्हणून कार्य करतात.

**३) उपभोग संस्कृती वाढविणे** – एनजीओज् या उपभोग संस्कृती वाढविण्याचे कार्य करतात. त्यामुळे ही जागतिकीकरणास चालना मिळत आहे. जागतिकीकरणात उपभोगवादी संस्कृती वाढविणे आवश्यक आहे. कारण उपभोग वाढला तरच वस्तूंची मागणी वाढते व मागणी वाढली की, उत्पादन वाढते. उत्पादन वाढले की कंपन्यांचा किंवा उद्योगांचा नफा वाढतो. म्हणून या कंपन्या एनजीओज्च्या माध्यमातून उपभोगवादी संस्कृतीचा प्रसार करण्यावर भर देत आहेत. यातूनच विभिन्न राष्ट्रांतील नागरिकांच्या सवयी, आवडीनिवडी, वर्तनप्रकार, कल्पना इत्यादीमध्ये एकसारखेपणा निर्माण होऊ लागला आहे. ही स्थिती जागतिक व्यवस्थेच्या निर्मितीस साहाय्यक ठरत आहे.

**४) समस्यांची सोडवणूक** – बहुराष्ट्रीय कंपन्यांतील गळेकापू स्पर्धा, अतिऔद्योगिकीकरण व अतिनागरीकरण, वाहतूकीच्या साधनांतील वाढ इत्यादीमुळे जगात सर्वत्रच शोषण, मानवीहक्कांची पायमल्ली, पर्यावरणाचे प्रदूषण, अनारोग्य (illhealth), जागतिक तापमानवृद्धी अशा अनेक गंभीर समस्या उद्‌भवल्या आहेत. त्यांची सोडवणूक करणे कोणत्याही एका राष्ट्रास शक्य नाही. त्यामुळे विविध राष्ट्रांना त्यासाठी परस्पर सहकार्य करणे अनिवार्य ठरत आहे. त्यासाठी जागतिक लोकमत संघटीत करणे आवश्यक आहे. एनजीओज्‌द्वारे हे कार्य उत्तम प्रकारे पार पाडले जाऊ शकते. उदा. '**विश्व प्रकृती निधी**' ही एनजीओ पर्यावरण व वन्यजीव यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जागतिक स्वतरावर लोकमत संघटीत करण्याचे कार्य प्रभावीपणे करीत आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी '**ग्रीन चळवळ**' नावाची एनजीओ ही जगातील अनेक देशात पोहचली असून ती पर्यावरणाचा विनाश टाळण्यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना लोकांनी स्वीकारावी म्हणून प्रयत्न करीत आहे. यातूनच विविध राष्ट्रांतील परस्परसहकार्य वाढून जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होत आहे. थोडक्यात, जागतिक स्वरूपाच्या समस्यांच्या निर्मूलनासाठी विभिन्न राष्ट्रांना एकत्र येण्याचे, परस्परसहकार्य करण्याचे आवाहन करून एनजीओज् जागतिक व्यवस्था निर्मितीस हातभार लावत आहेत.

**५) वाढता प्रभाव** – आज आंतरराष्ट्रीय स्तरावर सुमारे ५ हजाराहून अधिक एनजीओज् असून त्यांची संख्या, कार्यक्षेत्र व प्रभाव वाढत चालला आहे. त्यामुळे विभिन्न राष्ट्रांना त्यांची दखल घेणे भाग पडत आहे. विविध राष्ट्रांच्या अंतर्गत व बहिर्गत धोरणावर ह्या एनजीओज् आपला प्रभाव टाकत आहेत. तसेच संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना आपल्या उद्‌दिष्टांच्यापूर्तीसाठी एनजीओज्चे सहकार्य घेत आहे. उदा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही संयुक्त राष्ट्रांची एक सलंग्न संस्था असून ती विविध राष्ट्रांना विकास कार्यक्रम राबविण्यासाठी अर्थसाहाय्य देते. पण विकास कार्यक्रमांचा दुष्परिणाम लोकांवर व पर्यावरणावर होऊ नये म्हणून विकास कार्यक्रमांची तपासणी करणारी यंत्रणा या नाणेनिधीने उभारली आहे व या यंत्रणेत एनजीओज्ना प्रतिनिधित्त्व दिलेले आहे. विविध राष्ट्रांमध्ये जे तह व करार होतात त्यावरही एनजीओज् ह्या प्रभाव पाडीत आहेत. एकंदरीत एनजीओज्चा प्रभाव

वाढत असल्याने राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्परसंबंधांची एक जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास हातभार लागत आहे.

अशाप्रकारे एनजीओज् ह्या जागतिकीकरणाचे एक प्रभावी माध्यम म्हणून उत्तम भूमिका बजावत आहेत.

★ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** (Check your progress) **क्रमांक–३**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी कोणती बिगरशासकीय संघटना कार्य करते?

अ) बटरफ्लाईज ब) वनराई

क) एम. व्ही. फाऊंडेशन ड) फाय फाऊंडेशन

२) खालीलपैकी कोणती बिगरशासकीय संघटना ही क्षेत्रिय स्तरावर कार्यरत आहे.

अ) कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट ब) रेडक्रॉस

क) मानवी हक्क आयोग ड) सार्क

३) अम्नेस्टी इंटरनॅशनल ही बिगरशासकीय संघटना कोणत्या कार्यक्षेत्राशी निगडीत आहे.

अ) बालकांचे हक्क ब) महिलांचे हक्क

क) कैद्यांचे हक्क ड) मुलांच्या चारित्र्याची जडणघडण

४) जागतिक ऑलंपिक क्रीडा स्पर्धा दर किती वर्षांनी आयोजित केली जाते.

अ) ४ ब) ५ क) ६ ड) ७

५) पर्यावरण व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे कार्य जागतिक स्तरावर कोणती संघटना करते.

अ) स्काऊट्स अँड गाईड्स ब) रेडक्रास

क) विश्व प्रकृती निधी ड) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) बिगरशासकीय संघटना म्हणजे काय?

२) आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या दोन बिगरशासकीय संघटनांची नावे सांगा.

३) बिगरशासकीय संघटना कोणत्या प्रकारची संस्कृती वाढविण्याचे काम करतात.

४) मुलांच्या चारित्र्याची जडणघडण करण्याचे कार्य करणाऱ्या एनजीओचे नाव सांगा.

## २.३ सारांश

या घटकात तुम्ही जागतिकीकरणाच्या विविध माध्यमांचे स्वरूप व भूमिका समजावून घेतलेली आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया गतीमान करणाऱ्या घटकांना किंवा साधनांना जागतिकीकरणाची माध्यमे असे म्हणतात. ही माध्यमे विविध प्रकारची आहेत. सर्वप्रथम तुम्ही बहुराष्ट्रीय महामंडळांची जागतिकीकरणातील भूमिका समजावून घेतलेली आहे. एका राष्ट्रात मुख्यालय असलेल्या व अनेक राष्ट्रांत आर्थिक व्यवहार करणाऱ्या उद्योगसंस्थेस बहुराष्ट्रीय महामंडळ म्हणतात. आज जगात हजारो बहुराष्ट्रीय महामंडळे असून ती जगतील विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांना जोडण्याचे काम करीत आहेत. तसेच विविध राष्ट्रांत ही मंडळे गुंतवणूक करतात व त्यांना आपली धोरणे स्वीकारण्यास भाग पाडतात. त्यामुळे त्या राष्ट्रांच्या धोरणात एकसारखेपणा येतो व ही स्थिती जागतिकीकरणास अनुकूल ठरत आहे. बहुराष्ट्रीय महामंडळाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर कांही संस्था जागतिकीकरणाचे माध्यम म्हणून महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. या संस्थांचे सदस्य विविध राष्ट्रे आहेत. या संस्थांच्या माध्यमातून सदस्य राष्ट्रांत आर्थिक व व्यापारी संबंध निर्माण होतात व त्यातून जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होते. या संस्था सदस्य राष्ट्रांना संकटकाळात आर्थिक मदत देताना जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण स्वीकारण्यास भाग पाडतात. जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय व्यापार होत असल्याने सदस्य राष्ट्रांमध्ये आर्थिक-व्यापारविषयक संबंध निर्माण होऊन जागतिकीकरणास चालना मिळत आहे. जगातील राष्ट्र-राज्ये देखील जागतिकीकरणाचे माध्यम म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत. या राष्ट्रांनी एकत्र येऊन अनेक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन केल्या असून या संघटना सदस्य राष्ट्रांमध्ये परस्परसहकार्य व परस्परावलंबन निर्माण करीत आहेत. यातून जागतिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होत आहे. संप्रेषण साधने, बाजारपेठा यादेखील विविध राष्ट्रांत परस्परसंबंध निर्माण करीत आहेत. आज जगात बिगरशासकीय संघटना (NGOs) मोठ्या प्रमाणावर स्थापन झाल्या असून त्यादेखील विविध राष्ट्रांमध्ये परस्परसंबंध निर्माण करून जागतिक व्यवस्था निर्माण करण्यात म्हणजेच जागतिकीकरण घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावित आहेत.

## २.४ स्मरणार्थ संज्ञा

- **बहुराष्ट्रीय महामंडळ :** एका राष्ट्रात मुख्यालय असलेल्या पण विविध राष्ट्रात आर्थिक व्यवहार करणाऱ्या उद्योगसंस्था.
- **आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था :** जगातील विविध राष्ट्रांना वित्तपुरवठा करणारी संस्था.
- **राष्ट्र :** एकतेची भावना असलेला समुदाय
- **संप्रेषण साधने :** विचार, मते, ज्ञान, माहिती इत्यादींचे संक्रमण करणारी साधने उदा. रेडिओ, टी.व्ही., चित्रपट, वृत्तपत्र
- **बिगरशासकीय संघटना :** शासकीय यंत्रणेचा भाग नसलेली व सेवाभावी वृत्तीने लोकोपयोगाचे कार्य करणारी संघटना

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ब  २) अ  ३) क  ४) ड

ब) एका वाक्यात उत्तरे

१) एका राष्ट्रात मुख्य व्यवस्थापकीय कार्यालय असलेल्या पण आपल्या शाखांमार्फत अनेक राष्ट्रांत आर्थिक व्यवहार करणाऱ्या उद्योगसंस्थेस बहुराष्ट्रीय महामंडळ म्हणतात.

२) जगातील विविध राष्ट्रांना वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थेस आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था म्हणतात.

३) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जकात व व्यापारासंबंधीचा सामान्य करार.

४) General Agreement on Terifs and Trade

५) आर्थर डंकेल

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) क  २) अ  ३) ड  ४) ब

ब) एका वाक्यात उत्तरे

१) एकतेची भावना असलेला समुदाय म्हणजे राष्ट्र होय.

२) विचार, मते, ज्ञान, माहिती इत्यादींचे संक्रमण करणाऱ्या साधनास संप्रेषण माध्यमे म्हणतात.

३) वृत्तपत्र, नियतकालिक ग्रंथ इत्यादी.

४) वस्तू व सेवा यांचा विनिमय होणारे ठिकाण म्हणजे बाजारपेठ होय.

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ब  २) ड  ३) क  ४) अ  ५) क

ब) एका वाक्यात उत्तरे

१) शासकीय यंत्रणेचा भाग नसलेली व सेवाभावीवृत्तीने लोकोपयोगाचे कार्य करणारी संस्था म्हणजे बिगरशासकीय संघटना होय.

२) रेडक्रॉस, मानवी हक्क आयोग, अम्नेस्टी इंटरनॅशनल इत्यादी.

३) उपभोग संस्कृती वाढविण्याचे कार्य करतात.

४) स्काऊट्स अँड गाईड्स

## २.६ स्वाध्याय

प्रश्न १ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) बहुराष्ट्रीय महामंडळांची व आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांची जागतिकीकरणातील भूमिका विशद करा.

२) राष्ट्र-राज्ये, संप्रेषण साधने व बाजारपेठा यांची जागतिकीकरणाची माध्यमे म्हणून चर्चा करा.

३) बिगरशासकीय संघटनांची वैशिष्ट्ये व जागतिकीकरणातील भूमिका स्पष्ट करा.

प्रश्न २ : टीपा लिहा.

१) बहुराष्ट्रीय महामंडळे

२) ब्रेटनवूड्स संस्था

३) बिगरशासकीय संघटना

४) जागतिक व्यापार संघटना

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Appadurai, Arjun (1997) Modernity a Large : Cultural Dimensions of Globalization, Oxford University Press, New Delhi.
- Waters, Malcolm (1996) Globalization, London, Routledge
- चंद्रकांत खंडागळे, इ. १२ वी समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❑❑❑

## घटक ३

# जागतिकीकरण आणि संस्कृती

**(Globalization and Culture)**

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ जागतिकीकरणाची मूल्ये

३.२.२ अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण

३.२.३ जागतिकीकरण आणि सांस्कृतिक सजातियकरण, धुरीणत्त्व आणि प्रभुत्त्व

३.२.४ जागतिकीकरण आणि धार्मिक आंदोलन/चळवळी

३.३ सारांश

३.४ स्मरणार्थ संज्ञा

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास–

- जागतिकीकरणीची मूल्ये स्पष्ट करता येतील.
- जागतिकीकरणात अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण कसे होत आहे याचे आकलन होईल.
- जागतिकीकरण आणि सांस्कृतिक सजातियकरण, धुरीणत्त्व व प्रभुत्व यांच्यातील संबंध विशद करता येईल.
- जागतिकीकरण आणि धर्म चळवळी समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

पहिल्या घटकात आपण जागतिकीकरण ही बहुआयामी, सर्वस्पर्शी व सर्वसमावेशक प्रक्रिया कशी आहे हे पाहिलेले आहे. जागतिकीकरणाचा मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रावर मोठा प्रभाव पडत आहे. जगातील सर्व समाजातील अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, शिक्षण प्रक्रिया इत्यादीवर जागतिकीकरणाचा मोठा प्रभाव पडत आहे. त्याचप्रमाणे जगातील सर्वच समाजातील संस्कृतींवर देखील या प्रक्रियेचा प्रभाव पडला आहे, पडत आहे. जागतिकीकरणाच्या आर्थिक-वित्तीय पैलप्रमाणेच त्यांचे सामाजिक-सांस्कृतिक पैलू देखील संकीर्ण असे आहेत. **केवीन रॉबीन्स** या जागतिकीकरणाच्या अभ्यासकाने जागतिकीकरण व संस्कृती यांची सविस्तर चर्चा केली आहे. जागतिकीकरण ही भांडवलशाही अर्थव्यवस्था जगभर प्रसारीत/ विस्तारीत करणारी प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेत भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा मानवी संस्कृतीवर मोठा प्रभाव पडला आहे. ते म्हणतात आज आर्थिक व्यवहारांचे जागतिकीकरण होत असून त्याच्याबरोबरच सांस्कृतिक रूपांतरणही घडून येत आहे. आज जगात सार्वत्रिक असे सांस्कृतिक उत्पादने (Universal cultural Products) होत आहे. म्हणजेच भौतिक वस्तुप्रमाणे संस्कृतीचेही उत्पादन होत आहे. यासंदर्भात **सातची आणि सातची** (Saathchi and Saathchi) म्हणतात की, आजच्या जागतिकीकरणाच्या युगात संस्कृतीची एककेंद्राभिमुखता (Cultural Convergence) होत आहे. संस्कृती ही मानवाची जीवन जगण्याची पद्धती आहे. जगातील प्रत्येक समाजाची स्वतःची अशी एक संस्कृती आहे. एकाची समाजाची संस्कृती इतराहून भिन्न आहे. तथापि, आज जागतिकीकरणाचा प्रभाव पडून विविध संस्कृतीचे मिलन होत आहे. एका संस्कृतीतील घटकतत्वांचा इतर क्षेत्रामध्ये प्रसार होत आहे. यातून एक समान जीवनपद्धती म्हणजेच संस्कृती आकारास येत आहे. म्हणजेच सांस्कृतिक सजातियकरणाची (एकजिनसीकरणाची) प्रक्रिया घडून येत आहे आणि यामध्ये अमेरिकन संस्कृतीचे प्रभुत्व दिसून येत आहे. जागतिकीकरणाचे धुरीणत्व अमेरिकेकडे असल्याचे दिसते. एकंदरीत जागतिकीकरणाचा संस्कृतीवर प्रभाव पडला आहे व पडत आहे. म्हणून या घटकात तुम्ही जागतिकीकरण व संस्कृती यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणार आहात.

## ३.२ विषय विवेचन

प्रास्ताविकात नमूद केल्याप्रमाणे या घटकात तुम्ही जागतिकीकरण व संस्कृती यातील संबंध अभ्यासणार आहात. विवेचनाच्यादृष्टीने या घटकाचे ४ विभाग पाडलेले आहेत. पहिल्या घटकात जागतिकीकरणाची प्रमुख मूल्ये किंवा गुणविशेष (ethos) स्पष्ट केलेले आहेत. दुसऱ्या विभागात अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून जगभर कसे होत आहे याची चर्चा केलेली आहे. तिसऱ्या विभागात जागतिकीकरण आणि सांस्कृतिक सजातियकरण, धुरीणत्व व प्रभुत्व यांची चर्चा केलेली आहे. तर शेवटचा चौथ्या विभागात जागतिकीकरण व धार्मिक चळवळी यांचे विवेचन केलेले आहे.

### ३.२.१ जागतिकीकरणाची मूल्ये (Ethos of Globalization)

या घटकात प्रथम तुम्ही जागतिकीकरणाच्या मूल्यांची चर्चा करणार आहात. या ठिकाणी 'मूल्ये' ही संज्ञा इंग्रजीतील Ethos या शब्दासाठी पर्यायी म्हणून वापरलेली आहे. Ethos या शब्दाचा

शब्दकोशातील अर्थ एखाद्या समुदायाची किंवा संस्कृतीची वैशिष्टे / गुणविशेष किंवा मूल्ये / नीतिनियम असा आहे. जागतिकीरण ही एक सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया असून या प्रक्रियेची कांही मूल्ये किंवा गुणविशेष आहेत. त्यापैकी पुढील प्रमुख मूल्ये तीन आहेत. १) अनियंत्रित किंवा अनिर्बंध व्यक्तीस्वातंत्र्य २) व्यक्तीवाद ३) उपभोगतावाद किंवा चंगळवाद. या तीन मूल्यांची चर्चा आपण आता करणार आहोत.

**१) अनियंत्रित किंवा अनिर्बंध स्वातंत्र्य(**Uncontrolled Freedom)

स्वातंत्र्य हे एक महत्वाचे मूल्य आहे. या जगातील प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्य असले पाहिजे हे मूल्य जागतिक स्तरावर मान्य केलेले आहे. स्वातंत्र्य हा एक मूलभूत हक्क आहे हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क सनदेतही मान्य केलेले आहे. तथापि, कोणताही समाज आपल्या सदस्यांना (व्यक्ती व समूहांना) अनिर्बंध स्वातंत्र्य देत नाही. व्यक्तीच्या वर्तनावर कांही नियंत्रणे किंवा निर्बंध घातले जातात. यासाठीच मानव समाजात विवाह, कुटुंब, धर्म, राज्य, अशा अनेक सामाजिक संस्था उदयास आलेल्या आहेत. या संस्था व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण वा नियमन करतात. समाजमान्य पद्धतीने न वागणाऱ्या सदस्यांना शिक्षा देण्याची तरतूदही समाज करीत असतो. त्यामुळे व्यक्ती व समूह हे समाजाची नियंत्रणे किंवा निर्बंध पाळीत असतात. याचा परिणाम म्हणून स्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. जगातील सर्वच समाजात कमीजास्त प्रमाणात व्यक्तीवर्तनावर अशी नियंत्रणे घातलेली आहेत. उदा. व्यक्तीने केंव्हा व कोणाशी विवाह करावा, कोणते शिक्षण घ्यावे, कोणता व्यवसाय करावा, कोठे वास्तव्य करावे, कोण-कोणते कर भरावेत इत्यादी. त्यामुळे व्यक्तीला अनियंत्रित स्वातंत्र्य मिळत नाही.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र ही नियंत्रणे वा बंधने एकतर दूर होत आहेत किंवा शिथिल (सैल) होत आहेत. कारण जागतिकीकरण हे संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. उदारिकरण ही जागतिकीकरणाशी (liberalization) सलंग्न असलेली प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत आर्थिक व व्यापारविषयक व्यवहारावरील सर्व निर्बंध (भौगोलिक व राजकीय) दूर करून जगातील सर्व राष्ट्रांराष्ट्रांमध्ये मुक्त असे परस्परसंबंध निर्माण करणे अभिप्रेत आहे. याचाच अर्थ असा की जागतिकीकरण व उदारिकरण या प्रक्रिया अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात.

दुसरी गोष्ट अशी की, जागतिकीकरण ही प्रक्रिया भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रसार करणारी प्रक्रिया आहे. जगात जेथे भांडवलशाही अर्थव्यवस्था नाही तेथे ही अर्थव्यवस्था प्रसारीत करण्यावर जागतिकीकरण भर देते. भांडवलशाही अर्थव्यवस्था हीच मुळी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी व्यवस्था आहे. भांडवलशाहीत व्यक्तीला अधिकाधिक स्वातंत्र्य असते. संपत्ती कमावणे, तिचा पूर्ण उपभोग घेणे, ती वारसांकडे संक्रमित (हस्तांतरीत) करणे, किंवा तिची विल्हेवाट लावणे, आपल्या आवडीचा व्यवसाय करणे, जास्तीत जास्त नफा कमविणे याबाबतचे स्वातंत्र्य व्यक्तीला व समूहांना असते. राज्य व इतर संस्थांनी आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करू नये, व्यक्तीच्या उपक्रमेशिलतेला पूर्ण वाव द्यावा असेही भांडवलशाहीचे पुरस्कर्ते मानतात. अशा या स्वातंत्र्यास वाव देणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेचा प्रचार, प्रसार वा विस्तार करण्याचे कार्य जागतिकीकरण करीत आहे. त्यामुळे अनियंत्रित स्वातंत्र्य हे जागतिकीकरणाचे एक मूल्य आहे असे म्हणता येते.

व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे, तिच्यावर राज्याची तसेच अन्य संस्था व संघटनांची बंधने नसावीत असे जागतिकीकरण मान्य करते. प्रत्येक व्यक्तीस आपली इच्छा, आवड, क्षमता, पात्रता इत्यादीनुसार आपला विकास करण्याचे स्वातंत्र्य आहे असे ही जागतिकीकरण मान्य करते. प्रत्येक व्यक्ती ही एका विशिष्ट समाजाची वा राष्ट्राची सदस्य वा नागरिक असून तिच्यावर त्या राष्ट्राची बंधने असतात हा पारंपरिक विचार जागतिकीकरणात मागे पडत चालला आहे. कारण जागतिकीकरणात संपूर्ण जग हाच एक समुदाय (Global Community)आहे आणि प्रत्येक व्यक्ती ही या जागतिक समुदायाची सदस्य आहे असे मानले जात आहे. जागतिकीकरणात व्यक्तीचे महत्व वाढत चालले आहे. तिला अनिर्बंध स्वातंत्र्य आहे हा विचार प्रबळ बनला आहे. त्यामुळेच आज व्यक्ती ही व्यापार, उद्योग, नोकरी, शिक्षण, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही जाऊ शकते. राज्यदेखील व्यक्तीला त्यासाठी प्रोत्साहन व मदत देत आहे. एवढेच नव्हे तर विविध राष्ट्रे ही उच्च गुणवत्तेच्या परकीय नागरिकांना आमंत्रित करीत आहेत. कांही राष्ट्रांनी तर अशा परकिंयाना दुहेरी नागरिकत्व देण्याची तरतूद केलेली आहे. याचाच अर्थ असा की, पूर्वी व्यक्तीचा विचार एखाद्या राष्ट्राचा नागरिक म्हणून होत असे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात व्यक्तीचा विचार संपूर्ण जागतिक समुदायाच्या संदर्भात होऊ लागला आहे. त्यामुळे व्यक्ती ही अधिक स्वतंत्र, गतिशील व जागतिक बनली आहे. तिच्यावरील निर्बंध गळून पडत चालले आहेत. जागतिकीकरणात व्यक्तीला जगात कोठेही जाण्याचे, कोठेही वास्तव्य करण्याचे, कोठेही जाऊन शिक्षण घेण्याचे व उद्योगव्यवसायय करण्याचे स्वातंत्र्य मिळू लागले आहे. आपल्या आवडीनुसार वास्तव्याचे व कामाचे स्थळ बदलण्याचे, जगात हवे तेथे स्थलांतर करण्याचे स्वातंत्र्य उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे जागतिकीकरणात सहभाग झालेल्या राष्ट्रांनी आपल्या नागरिकांना परदेशात कोठेही सहजपणे जाता यावे म्हणून 'पासपोर्ट व व्हिसा' संबंधीचे नियम शिथिल केलेले आहेत. तसेच हवाई प्रवासाचे शुल्कही कमी केलेले आहे. त्यामुळे व्यक्तीला जगात कोठेहे जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य उपलब्ध झालेले आहे. आपले कुटुंब, गाव, राष्ट्र वा समाज याविषयीची बांधिलकी शिथिल होऊन महत्वाकांक्षी व्यक्ती या जगाच्या कोणत्याही भागात नोकरीधंद्यांच्या निमित्ताने जाऊन राहाण्याचे स्वातंत्र्य उपभोगू लागल्या आहेत.

थोडक्यात जागतिकीकरण हे अनिर्बध स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. त्यामुळे व्यक्तीविकासास मोठा वाव मिळत आहे. व्यक्तींचा विचार विशिष्ट राष्ट्राच्या संदर्भात न होता संपूर्ण जगाच्या संदर्भात होऊ लागला आहे. परिणामी, व्यक्ती ही अधिकाधिक स्वंतत्र, गतिशील व जागतिक बनली आहे.

### २) **व्यक्तिवाद** (Individualism)

व्यक्तिवाद हे जागतिकीकरणाचे दुसरे मूल्य आहे. व्यक्तिवाद ही एक विचारसरणी असून ती समूह किंवा समष्टी (Collectivity)च्या हितापेक्षा व्यक्तीच्या हितास अधिक महत्व वा प्राधान्य देते. प्रत्येक व्यक्तीस स्वतःचे जास्तीत जास्त हित साध्य करण्याचा हक्क आहे असे व्यक्तिवाद मानतो. जागतिकीकरण ही प्रक्रिया व्यक्तिवादाचा पुरस्कार करते, त्याला प्रोत्साहन देते. व्यक्तीने आपले कुटुंब, समुदाय, राष्ट्र किंवा समाज यांच्याहितापेक्षा स्वतःच्या हितास प्राधान्य द्यावे, स्वतःपेक्षा अन्य कांहीही महत्वाचे नाही असे व्यक्तिवाद मानतो. त्यामुळे कोणत्याही समूहाकडून किंवा समष्टीकडून आपल्या विकासाच्या मार्गात अडथळे आणले जात असतील तर ते दूर करून

व्यक्तीने स्वतःचा विकास  साध्य करावा या गोष्टीस जागतिकीरणाची प्रक्रिया प्रोत्साहन देते. त्यामुळे व्यक्तिवाद हे या प्रक्रियेचे मूल्य किंवा गुणवैशिष्ट्य ठरते.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रसार/विस्तार करण्यासाठी जगातील भांडवलशाही राष्ट्रांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. भांडवलशाही व्यक्तिवादाचा पुरस्कार करते. प्रत्येक व्यक्तीस खाजगी संपत्ती मिळविण्याचा, धारण करण्याचा तिचा उपभोग घेण्याचा तसेच तिची विल्हेवाट लावण्याचा पूर्ण अधिकार आहे असे भांडवलशाही मानते. अशा अधिकाराने सर्व व्यक्तींचा विकास होतो आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचा/देशाचाही विकास होतो असेही भांडवलशाही मानते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या हिताचा विचार करावा, स्वतःचा विकास घडवून आणावा आणि त्यामध्ये समाजाने/देशाने अडथळे आणू नयेत याचा व्यक्तिवाद पुरस्कार करतो. राज्य किंवा इतर कोणत्याही संस्थेने व्यक्तिविकासावर निर्बंध घालू नयेत. उलट व्यक्तिविकासाच्या मार्गात येणारे अडथळे दूर करावेत, व्यक्तिविकासाठी मदत, मार्गदर्शन व प्रोत्साहन द्यावे या गोष्टीचा पुरस्कार व्यक्तिवाद करतो.

अशा या व्यक्तिवादास जागतिकीकरणाची प्रक्रिया ही जोरदार चालना देत आहे. व्यक्तीने आपल्या कुटुंब, समुदाय, राष्ट्र यासारख्या समष्टीविषयीच्या निष्ठांचा त्याग करून स्वविकासासाठी किंवा स्वतःचे हित साध्य करण्यासाठी जगाच्या कोणत्याही भागात स्थलांतरीत व्हावे अशा मताचा पुरस्कार जागतिकीकरण करीत आहे. अर्थात व्यक्तिवाद हे कांही नवीन मूल्य नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस प्रारंभ होण्यापूर्वीच हे मूल्य अस्तित्वात आलेले आहे. इंग्लंडमधील विचारवंत बेंथम, जेम्स मिल्ल, जे. एस. मिल्ल, हर्बर्ट स्पेन्सर इत्यादींनी व्यक्तिवादाचा किंवा व्यक्तिस्वातंत्र्यवादाचा पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्तीस स्वहित साध्य करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य  असते. इतर व्यक्ती व संस्थांनी (शासन वा राज्यसंस्थेनेही) व्यक्तीच्या हितास बाधा/अडथळा आणू नये असे मत त्यांनी मांडले. यातूनच पुढे ॲडम स्मिथ (अर्थशास्त्राचा जनक) यांनी निर्हस्तक्षेपाचे तत्व(Laissez Faire Doctrine) मांडून असे प्रतिपादन केले की, व्यक्तीला आर्थिक क्षेत्रात पूर्ण स्वातंत्र्य असावे, सरकारने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करू नये. संरक्षण, न्याय, कायदा, चलन, विदेशी संबंध, रस्ते, कालवे इत्यादी क्षेत्रे सोडून ऊर्वरीत सर्व क्षेत्रात शासनाने खाजगी कर्तृत्वास पूर्ण वाव द्यावा. यातूनच उदारमतवाद व उदारीकरणाची सुरुवात झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उदारीकरण व खाजगीकरणाचा पुरस्कार केला जातो. खाजगी उद्योजकांनी हवा तो उद्योग सुरू करावा, हवे तेवढे उत्पादन करावे, हवी तेथे हवी तेवढी निर्यात करावी, त्याद्वारे अधिकाधिक उत्पन्न व नफा मिळवावा आणि स्वतःचे हित साध्य करावे, स्वतःचा विकास घडवून आणावा याचा पुरस्कार जागतिकीकरणात केला जातो. त्यामुळेच व्यक्तिवाद हे जागतिकीकरणाचे एक मूल्य ठरते.

**३) उपभोक्तावाद**(Consumerism)

उपभोक्तावाद हे जागतिकीकरणाचे तिसरे मूल्य आहे. उपभोक्तावादास मराठीत ग्राहकवाद तसेच चंगळवाद असेही म्हणतात. उपभोक्तावाद ही श्रद्धा आहे. या श्रद्धेनुसार वस्तू व सेवांची खरेदी करून त्यांचा अधिकाधिक उपभोग घेणे ही गोष्ट योग्य वा चांगली मानली जाते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रसार वा विस्तार केला जात आहे. म्हणजेच जागतिकीकरण ही भांडवलशाहीचा पुरस्कार करणारी प्रक्रिया आहे. भांडवलशाही ही अधिकाधिक उत्पादन करणे,

अधिकाधिक उपभोग घेणे या गोष्टींचा पुरस्कार करते. जास्तीत जास्त नफा (Profit) मिळविणे हे भांडवलशाहीचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे अधिक नफा मिळविण्यासाठी अधिक उत्पादन करणे, त्याची विक्री करणे, त्यासाठी जाहिरातीद्वारे लोकांना उत्पादने खरेदी करण्यास प्रवृत्त करणे व त्या उत्पादनांचा अधिकाधिक उपभोग घेणे (वापर करणे) यावर भांडवलशाही भर देते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत लोकांना अधिकाधिक उपभोगवादी/ चंगळवादी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्यक्तींना अधिकाधिक उपभोगाच्या चैनीच्या वस्तू खरेदी करण्यास प्रवृत्त केले जात आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तमोत्तम वस्तू व सेवा निर्माण केल्या जात आहेत. कृत्रिम गरजा निर्माण करून नवनवीन उत्पादने लोकांच्या माथी मारली जात आहेत. उदा. स्वच्छतेसाठी साबणाची गरज आहे. पण त्यामध्ये विविधता आणून वेगवेगळया प्रकारच्या साबणांची उत्पादन केले जात आहे. (उदा. कपड्यासाठी वेगळा साबण, स्नानासाठी वेगळा साबण, केसांसाठी वेगळा साबण, बालकांसाठी वेगळा साबण इ.) आणि ग्राहकांना आकर्षित करून ही उत्पादने खरेदी करण्यास प्रवृत्त केले जात आहे. पूर्वी लोक काटकसर करीत. आपले उत्पन्न पाहून खर्च करीत. कर्ज काढून गरजा पूर्ण करणे अयोग्य मानले जाई. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र व्यक्तीला चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज पुरवठा केला जात आहे. कर्जपुरवठ्याच्या सुविधा वाढविल्या जात आहेत. जुजबी कागदपंत्राच्या आधारे कर्ज देणाऱ्या वित्तसंस्थाची बाजारात संख्या वाढली आहे. 'एकावर एक मोफत' अशा योजनाद्वारे गरज नसताना ही जादा वस्तू खरेदी करण्यास भाग पाडले जात आहे. कर्ज काढा पण चैन करा अशी मानसिकता निर्माण केली जात आहे. 'वापरा आणि फेकून द्या' (Use and throw)तसेच 'जुने द्या नवे घेऊन जा' अशा घोषणांद्वारे लोकांना नवनवीन वस्तूंच्या खरेदीसाठी प्रवृत केले जात आहे. अशाप्रकारे उपभोक्तावाद हे एक जागतिकीकरणाचे मूल्य बनले आहे. लोकांना उपभोक्तावादी बनविले तरच अधिक उत्पादनाद्वारे अधिक नफा हे भांडवलशाहीचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते.

### ★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न-क्रमांक १

### अ) बहुपर्यायी प्रश्न

१) जागतिकीकरण ही कोणत्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा प्रसार करणारी प्रक्रिया आहे?

अ) समाजवादी ब) मिश्र क) भांडवलशाही ड) कृषीप्रधान

२) जागतिकीकरणाशी संलग्न असणारी प्रक्रिया कोणती आहे?

अ) संस्कृतीकरण ब) उदारीकरण

क) पाश्चिमात्यकरण ड) आधुनिकीकरण

३) व्यक्तिवादाचा पुरस्कृर्ता कोण आहे?

अ) बेंथम ब) मार्स्क क) लेनिन ड) माओ

४) निर्हस्तक्षेपाचे धोरण कोणी मांडले?

अ) जेम्स मिल्ल ब) जे. एस. मिल्ल क) लॉक ड) ॲडम स्मिथ

५) भांडवलशाहीचे मुख्य उद्दिष्ट कोणते आहे?

अ) नफा कमावणे　　　　ब) सेवा देणे

क) निर्वाह चालविणे　　　　ड) यापैकी एकही नाही

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) जागतिकीकरणाची प्रमुख्य मूल्ये सांगा.

२) व्यक्तीवाद कोणाच्या हितास अधिक प्राधान्य देतो?

३) अर्थशास्त्राचा जनक कोण आहे?

४) उपभोक्तावाद म्हणजे काय?

## ३.२.२ अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण

जागतिकीकरणाची मूल्ये अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरणात अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे जगभर प्रसारण व प्रक्षेपण कसे केले जात आहे हे समजावून घेणार आहात. जागतिकीकरण ही सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत जगातील राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परस्परसंबंध निर्माण केले जात आहेत आणि अशा परस्परसंबंधातून संपूर्ण जगाची एकच व्यवस्था (World of global system) निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. तत्वतः जागतिकीकरणात म्हणजेच जागतिक व्यवस्था निर्माण करण्यामध्ये जगातील सर्व राष्ट्रांचा समान सहभाग असणे अभिप्रेत आहे. प्रत्यक्षात मात्र या प्रक्रियेत कांही थोड्या विकसित राष्ट्रांचे प्रभुत्व किंवा वर्चस्व असल्याचे दिसून येते. या विकसित राष्ट्रापैकी अमेरिका (U.S.A.) हे राष्ट्र महाशक्ती(Super power) मानले जात असून या राष्ट्राचे सर्वात जास्त प्रभुत्व असल्याचे आढळते. त्यामुळे कांही विचारवंत व टिकाकार असे म्हणतात की जागतिकीकरण ही प्रसारणाची (diffusion) प्रक्रिया असून तिच्यामध्ये अमेरिकेच्या संस्कृतीचा व मूल्यव्यवस्थेचा इतर राष्ट्रांमध्ये प्रसार केला जात आहे. कांही टीकाकार यापुढे जाऊन असे म्हणतात की, जागतिकीकरणाच्या माध्यमातून अमेरिका हे राष्ट्र त्याची आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये व धोरणे (Values and policies) इतर राष्ट्रांवर विशेषतः विकसनशील राष्ट्रांवर लादत आहे. **गीलपीन** या विचारवंताने याच दृष्टिकोनातून जागतिकीकरणाची व्याख्या दिलेली आहे. ते म्हणतात, प्रभुत्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था व संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण होय.'' टिकाकारांचे हे मत समजावून घेण्यासाठी प्रथम प्रसारण, प्रक्षेपण व मूल्यव्यवस्था या तीन संज्ञांचा अर्थ थोडक्यात समजावून घेणे उचित ठरते.

**१) प्रसारण** (Diffusion)

प्रसार किंवा प्रसारण ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. जेंव्हा दोन समाज किंवा समूह एकमेकांच्या संपर्कात येतात तेंव्हा त्यातील एका समूहाची विशेषतः प्रभावशाली समूहाची सांस्कृतिक तत्वे (Culture traits) दुसऱ्या समूहाकडून आत्मसात केली जातात. या प्रक्रियेसच प्रसारण असे म्हणतात. या प्रक्रियेत एका समूहाची सांस्कृतीक तत्वे ही दुसऱ्या समूहात प्रसारित होतात. उदा. ब्रिटिश राजवटीत भारतीयांचा ब्रिटिश लोकांशी संपर्क आला आणि भारतीयांनी ब्रिटिश संस्कृतीतील अनेक घटकतत्वे (उदा. ब्रिटिशांची वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी, अभिवादनाचे प्रकार,

शिष्टाचार, मूल्ये, विचारसरणी इ.) स्वीकारली. याचाच अर्थ असा की ब्रिटिश संस्कृतीतील घटकतत्त्वांचा भारतीय समाजात प्रसार झाला आणि आज ही घटकतत्वे भारतीय संस्कृतीचा एक भाग बनली आहेत. उदा स्त्रियांनी केस कापणे, पुरुषांनी केस वाढविणे, डायनिंग टेबलवर बसून काट्याचमच्यानी खाणे, धुम्रपान व मद्यपान निषिद्ध न मानणे, स्त्रीपुरुषानी सार्वजनिक ठिकाणी नृत्य करणे वा आलिंगन देणे इत्यादी. पाश्चात्य लोकांच्या/ब्रिटिशांच्या सांस्कृतिक घटकतत्वांचे अनुकरण करण्याच्या या प्रक्रियेस **एम. एन. श्रीनिवास** यांनी पाश्चिमात्यीकरण असे म्हटले आहे. पाश्चिमात्यीकरण ही पाश्चिमात्य संस्कृतीचा भारतीय समाजात प्रसार होण्याचीच प्रक्रिया आहे. (याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रसारणामध्ये कांही वेळा प्रभावशाली समूहदेखील दुसऱ्या समूहाच्या कांही सांस्कृतिक घटकतत्वांचा स्वीकार करीत असतो). जागतिकीकरणाचे कांही टिकाकार असे म्हणतात की जागतिकीकरण ही देखील अशीच एक प्रसारणाची प्रक्रिया असून या प्रक्रियेत अमेरिकन सांस्कृतिक घटकतत्वांचा इतर राष्ट्रांमध्ये प्रसार केला जात आहे.

**प्रक्षेपण** (Projection)

प्रक्षेपण म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या किंवा समूहाच्या कल्पना, मते, धोरणे, भावना, अभिवृत्ती इत्यादी गोष्टी इतरांच्यापुढे मांडणे होय.जागतिकीकरणात अमेरिका व इतर विकसित राष्ट्रे आपल्या कल्पना, मते, धोरणे, भावना, अभिवृत्ती इत्यादी इतर राष्ट्रांच्या समोर मांडीत आहे.

**मूल्यव्यवस्था** (Value System)

प्रत्येक समाजाची स्वतःची अशी एक मूल्यव्यवस्था असते. ज्या मानदंडाच्या किंवा निकषांच्या आधारे आपण कोणत्याही बाबतीत योग्य-अयोग्य, इष्ट-अनिष्ट, चांगले-वाईट असा भेद करतो त्यांना मूल्ये असे म्हणतात. **हॅरि जॉन्सनच्या** मते, मूल्य हे एक असे सांस्कृतिक व वैयक्तिक मानदंड आहे की, ज्याच्या आधारे आपण वेगवेगळया गोष्टींमध्ये तुलना करून कांही गोष्टी मान्य व इतर अमान्य, कांही चांगल्या व इतर वाईट, कांही बरोबर तर इतर चूक ठरवितो. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, मानवता, धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्ये आहेत. या मूल्यांना अनूसरून लोकांनी वर्तन करावे अशी अपेक्षा असते. अर्थात मूल्ये ही सापेक्ष (relative) स्वरूपाची असतात. म्हणजे स्थळकाळानुसार बदलणारी असतात. एका स्थळी (समाजात) व एका काळी (कालखंडात) जो मानदंड मूल्य मानले जाते तोच मानंदड इतर स्थळी व काळी मूल्य मानले जाईल असे नाही. उदा. पूर्वी युद्ध करणे म्हणजे हिंसा करणे योग्य मानले जाई. आज मात्र लोकशाही समाजात युद्ध म्हणजेच हिंसा अयोग्य मानली जाते. कारण अहिंसा हे लोकशाही समाजातील मूल्य आहे. वेगवेगळ्या समाजाची वेगवेगळी मूल्ये असतात व प्रत्येक समाजास आपलीच मूल्ये योग्य वाटत असतात. कांही समाज विशेषतः प्रभावशाली वा शक्तीशाली समाज आपल्या मूल्यांचा इतर समाजात प्रसार करण्याचा प्रयत्न करीत असतो. कांहीवेळा तो आपली मूल्ये इतरांवर लादण्याचा (प्रक्षेपित करण्याचा) प्रयत्न करीत असतो.

**जागतिकीकरण म्हणजे अमेरिकेच्या मूल्यव्यसस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण आहे :**

या घटकाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे जागतिकीकरण ही अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचा इतर राष्ट्रांमध्ये प्रसार व प्रक्षेपण करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत अमेरिका हे राष्ट्र प्रभावशाली असून ते आपली मूल्ये ही इतर राष्ट्रांमध्ये प्रसारीत व प्रक्षेपित करीत आहे.

अमेरिका हे एकं विकसित राष्ट्र आहे. या राष्ट्रांची अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था ही भांडवलशाहीवर आधारेलेली आहे. भांडवलशाही ही व्यक्तीस्वातंत्र्याच्या मूल्यास महत्व देते. व्यक्ती ही स्वतंत्र आहे तिला आपल्या आवडीचा उद्योगधंदा करण्याचे, खाजगी मालमत्ता धारण करण्याचे, तिचा उपभोग घेण्याचे, आपल्या वारसांना ती हस्तांतरीत करण्याचे किंवा तिची विल्हेवाट लावण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे असे भांडवलशाही मान्य करते. त्यामुळे अमेरिका व इतरही भांडवलशाही राष्ट्रे ही मोठमोठ्या उद्योगधंद्यातून उत्पादित केलेल्या वस्तूं जागतिक बाजारपेठेत विकून अधिकाधिक नफा कमावण्यावर भर देतात. आपले हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राष्ट्रे जागतिकीकरणाचा पुरस्कार करीत आहेत. आपल्या औद्योगिक उत्पादनाची विविध राष्ट्रांमध्ये विक्री व्हावी म्हणून अमेरिका व इतर भांडवलशाही राष्ट्रे व्यक्तिवाद व्यक्तिस्वातंत्र्य, उपभोक्तावाद (चंगळवाद) इत्यादी मूल्ये इतर राष्ट्रांमध्ये प्रसारित व प्रक्षेपित करीत आहेत. आपल्या औद्योगिक उत्पादनास ग्राहक मिळावा म्हणून ही राष्ट्रे लोकांच्या मनावर उपभोक्तावादी/ चंगळवादी मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

प्रत्येक समाजाचे/राष्ट्रांचे विशिष्ट असे भौतिक/भौगोलिक पर्यावरण असते. त्या पर्यावरणाला अनुकूल ठरेल असेच आचरण त्या समाजाच्या सदस्यांनी करणे आवश्यक आणि म्हणून योग्य असते. उदा. उष्णकटिबंधातील लोकांनी सुती कपडे तर शीतकटीबंधातील लोकांनी लोकरीची कपडे वापरणे हितकाकारक असते. कपड्याप्रमाणेच खाण्यापिण्याबाबतच्या सवयी किंवा आचरणप्रकार हे पर्यावरणाशी सुसंगत असणारे असावे लागतात. प्रत्येक समाजाची याबाबतची कांही स्वतःची मूल्ये आहेत. तथापि, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिका आपली वर्तनविषयक मूल्ये (वेशभूषा खाण्यापिण्याच्या सवयी इ.) इतर समाजांवर लादीत आहे, प्रसारीत, प्रक्षेपित करीत आहे. यातून आरोग्यविषयक कांही गंभीर समस्या उद्‌भवू लागल्या आहेत. उदा. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतातील खेड्यापाड्यातदेखील वर्षभर (सर्व ॠतूंमध्ये) शीतपेये (कोल्डड्रिंक्स) व आईसक्रिम उपलब्ध झाली आहेत. आणि तरुण पिढीही अगदी थंडीच्या दिवसातही त्यांचे सेवन करू लागली आहे. पाश्चात्य समाजातील फास्टफूड सेवनाची कल्पना विकसनशील समाजात लोकप्रिय होत आहे. **मॅकडोनाल्ड** या बहुराष्ट्रीय कंपनीचे फास्टफूड (खाद्यपदार्थ) पुरविणारी हॉटेल्स जगभर सुरू झाली असून त्यांचे सेवन करण्याची फॅशन (सवय) लोकप्रिय होत आहे. खाण्यापिण्याच्या सवयींचे हळूहळू **मॅक्डोनाल्डीकरण** (McDonaldisation) होत चालले आहे. आणि पारंपरिक खाद्यपदार्थांची निर्मित मागे पडत चालली आहे. खाण्यापिण्याप्रमाणेच अमेरिकन कपडे (जीन्स, टी शर्ट, बरमूडा) प्रवासी बॅग्ज, खेळाचा पोशाख, बूट व साहित्य ही जगभरातील राष्ट्रात खपविली जात आहेत. अमेरिकेतील औषधे व हवाबंद खाद्यपदार्थ देखील जगभर लोकप्रिय होत आहेत. पाश्चात्य राष्ट्रातील विशेषतः अमेरिकेतील वस्तूंचा वापर करणे व तेथील खाण्यापिण्याच्या सवयीचा अंगीकार करणे ही गोष्ट योग्य व प्रतिष्ठेची आहे असे जाहिरातीच्या माध्यमातून विविध राष्ट्रांतील लोकांच्या मनावर बिंबविले जात आहे. थोडक्यात जागतिकीकरणात खाणेपिणे, पोशाख इत्यादीबाबतची अेमेरिकन मूल्ये इतर राष्ट्रांत प्रसारित व प्रक्षेपित केली जात आहेत. अर्थात ही मूल्ये स्थानिक पर्यावरणाशी विसंगत असल्याने आरोग्यास घातक ठरू शकतात याचे भान (जाणीव) अनेकांना नाही. ज्यांना याचे भान आहे त्यांची स्थिती 'कळतय पण वळत नाही'अशी आहे.

केवळ खाणेपिणे व पोशाखाबाबतचीच मूल्ये नव्हे तर विवाह, कुटुंब, शिक्षण, धर्म इत्यादीबाबतची अमेरिकन मूल्ये देखील जागतिकीकरणाच्या माध्यमातून इतर राष्ट्रांत प्रसारीत होऊ

लागली आहेत. करिअरसाठी अविवाहीत राहणे किंवा उशीरा विवाह करणे, विवाह न करताच स्त्री पुरुषानी एकत्र राहाणे (Live in relationship), किरकोळ कारणास्तव घटस्फोट घेणे व पुनर्विवाह करणे, समलिंगी संबंध ठेवणे व त्याची कबुली देणे, विवाहानंतर अपत्य होऊ न देणे, केंद्र कुटुंब स्थापन करणे, वृद्ध मातापित्याविषयीच्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करणे इत्यादी मूल्यांचा प्रभाव विकसनशील राष्ट्रांवर पडत आहे. तसेच अमेरिकेतील शिक्षणविषयक मूल्ये व धोरणे यांचाही प्रसार जागतिकीकरणामध्ये केला जात आहे. परिणामी, विकसनशील राष्ट्रांतील अनेक बुद्धिमान तरुण हे उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यास प्राधान्य देऊ लागले आहेत. विशेष म्हणजे त्यातील अनेक विद्यार्थी हे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेतच कायमचे वास्तव्य करण्यास प्राधान्य देऊ लागले आहेत. आपली मुले ही शिक्षणासाठी वा नोकरीसाठी अमेरिकेत आहेत ही गोष्ट विकसनशील राष्ट्रांतील पालकांना प्रतिष्ठेची वाटू लागली आहे. यावरून अमेरिकन जीवन पद्धतीचा व जीवन मूल्यांचा प्रभाव व प्रसार कसा वाढत आहे हे लक्षात येते.

अमेरिकेच्या सामाजिक मूल्यांप्रमाणेच राजकीय मूल्यांचाही प्रसार जागतिकीकरणातून होत आहे. कांही टिकाकारांच्या मते तर जागतिकीकरणाच्या माध्यमातून अमेरिका आपली राजकीय मूल्ये व ध्येयधोरणे ही इतर राष्ट्रांवर लादीत आहे. अमेरिकेमध्ये लोकशाही राजकीय व्यवस्था आहे. ज्या राष्ट्रांत लोकशाही राजकीय व्यवस्था नाही तेथे ही व्यवस्था सुरू करण्याचा खटाटोप अमेरिका करताना दिसते. जगात शांतता राखण्याची जबाबदारी केवळ आपलीच आहे अशा थाटात अमेरिका ही इतर राष्ट्रांच्या राजकारणात हस्तक्षेप करीत आहे. उदा. अफगाणीस्थान, इराण, कुवेत इत्यादी राष्ट्रात अमेरिकेने केलेला हस्तक्षेप सर्वश्रूत आहे. अनेक विकसनशील राष्ट्रांना आर्थिक व शस्त्र-अस्त्रांची मदत करून त्यांना आपल्या अंकीत ठेवू पाहाते आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या भारतासारख्या अनेक विकसनशील देशांनी समाजवादी व कल्याणकारी धोरणाचा स्वीकार केला. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र अमेरिका अशा राष्ट्रांना जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज देताना समाजवाद व कल्याणकारी धोरणाचा त्याग करण्यास भाग पाडीत आहे. विविध कल्याणकारी योजना व अनुदाने बंद करण्यास किंवा त्यामध्ये कपात करण्यासाठी दबाव टाकीत आहे.

जागतिकीकरणाद्वारे पाश्चात्य समाजातील इंग्रजी भाषा इतर राष्ट्रांमध्ये लोकप्रिय होऊ लागली आहे. जागतिकीकरणात इंग्रजी भाषेस अतोनात महत्व आले आहे. राष्ट्राराष्ट्रांमध्ये होणाऱ्या आर्थिक व व्यापारविषयक व्यवहारात इंग्रजी भाषेचा वापर होत आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा बोलणे, तिच्यातून शिक्षण घेणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर एखाद्या व्यक्ती वा संघटनेशी इंग्रजीतून संपर्क साधणे या गोष्टी आवश्यक व प्रतिष्ठेच्या मानल्या जाऊ लागल्या आहेत. चीनसारख्या साम्यवादी राष्ट्रातही इंग्रजी भाषेचे प्रचंड आकर्षण वाटू लागले आहे. त्याचा परिणाम म्हणून स्थानिक भाषेकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. एवढेच नव्हे तर स्थानिक भाषेतून बोलणे व शिक्षण घेणे हे मागासलेपणाचे लक्षण वाटू लागले आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या माध्यमातून अमेरिकेच्या मूल्यांचे इतर राष्ट्रांमध्ये प्रसारण व प्रक्षेपण होत आहे.

★ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : क्रमांक २**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) कोणते राष्ट्र महाशक्ती मानले जाते?

अ) रशिया  ब) अमेरिका  क) इंग्लंड  ड) चीन

२) ब्रिटिशांच्या सांस्कृतीक घटकतत्वांचे अनुकरण करण्याच्या प्रक्रियेस श्रीनिवासन यांनी काय म्हटले आहे?

अ) संस्कृतीकरण  ब) जागतिकीकरण

क) आधुनिकीकरण  ड) पाश्चिमात्यीकरण

३) मूल्ये ही कोणत्या स्वरूपाची असतात?

अ) निरपेक्ष  ब) सापेक्ष  क) विशेष  ड) यापैकी एकही नाही

४) भांडवलशाही कोणत्या मूल्यास महत्व देते?

अ) व्यक्तिस्वातंत्र्य ब) समाजवादी  क) साम्यवादी  ड) समाजकल्याण

५) अमेरिकेत कोणत्या प्रकारची राजकीय व्यवस्था आहे?

अ) कुलीनशाही  ब) लोकशाही  क) हुकूमशाही  ड) राजेशाही

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) प्रसारण म्हणजे काय?

२) प्रक्षेपणाचा अर्थ सांगा.

३) मूल्याची व्याख्या द्या.

४) जागतिकीकरणात अमेरिका विकसनशील देशांना कोणत्या धोरणाचा त्याग करण्यास भाग पाडीत आहे?

५) पाश्चिमात्यीकरण ही संकल्पना कोणी मांडली आहे?

## ३.२.३ जागतिकीकरण आणि सांस्कृतिक सजातियकरण, धुरिणत्व आणि प्रभुत्व

(Globalization and Cultural Homogenization, Hegemony and Dominance)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे इतर राष्ट्रांत कसे प्रसारण आणि प्रक्षेपण होत आहे हे अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरण आणि सांस्कृतिक सजातियकरण, धुरीणत्व आणि प्रभुत्व याचा अभ्यास करणार आहात.

**सांस्कृतिक सजातीयकरण** (Cultural Homogenization)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवी संस्कृतीचे सजातियकरण किंवा एकजिनसीकरण घडून येत आहे. हे सजातीयकरण कसे घडून येत आहे हे समजावून घेण्यापूर्वी प्रथम संस्कृती व सजातीयकरण म्हणजे काय हे थोडक्यात समजावून घेऊ या.

**संस्कृतीचा अर्थ**

संस्कृती हे मानवाचे आणि म्हणून मानव समाजाचे प्रभेदक वैशिष्ट्य आहे. मानव हा देखील एक प्राणी (Animal) आहे. तथापि, आपल्या गरजा भागविण्यासाठी तो इतर प्राण्यांप्रमाणे निसर्गाला शरण गेला नाही. आपणास नैसर्गिकपणे लाभलेल्या कांही खास शारीरिक वैशिष्ट्यांच्या आधारे मानवाने अनेक भौतिक किंवा मूर्त वस्तू (उदा. घरेदारे, खाद्यपदार्थ, कपडेलत्ते, भांडीकुंडी, हत्यारे, अवजारे, यंत्रे, दागदागिने इत्यादी) आणि अभौतिक किंवा अमूर्त वस्तू (उदा. आचार-विचार, रूढी-परंपरा, भाषा-लिपी, श्रद्धा-मूल्य, कला-कौशल्ये, मते-कल्पना, नियमन-संस्था इत्यादी) निर्माण केल्या आणि त्यांच्या साहाय्याने तो आपल्या गरजा पूर्ण करू लागला व सभोवतालच्या पर्यावरणाशी अनुकूलन (समायोजन) साधू लागला. अशा या भौतिक व अभौतिक वस्तूंचा समुच्चयासच संस्कृती असे म्हणतात. **रॉल्फ पिडिंग्टनच्या मते** ''ज्या भौतिक व बौद्धिक साधनांच्या साहाय्याने लोक आपल्या जैविक व सामाजिक गरजांची पूर्तता करतात आणि आपल्या पर्यावरणाशी अनुकूलन साधतात त्या साधनांच्या समुच्चयासच  लोकांची संस्कृती असे म्हणतात.'' महत्वाचे म्हणजे ही संस्कृती मानव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत करू लागला. मानवाची प्रत्येक पिढी आपल्या परीने या संस्कृतीत भर घालीत आली. यातूनच प्रत्येक मानव समाजाची स्वतःची अशी एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती उदयास आली. प्रत्येक समाज आपल्या संस्कृतीनुसार जीवन व्यतीत करू लागला. त्यामुळेच संस्कृतीस मानवाची जीवन जगण्याची पद्धती किंवा जीवन मार्ग (Way of life) असेही म्हणतात. जगात असंख्य मानव समाज असून त्यांची संस्कृती ही वेगवेगळी आहे. त्यामुळे विविध मानव समाजाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीत म्हणजेच संस्कृतीत विभिन्नता किंवा विजातियता (heterogeneity) दिसून येते. आधुनिक समाज विशेषतः औद्योगिक-नागरी समाज (Industrial Urban Societies) अत्यंत संकीर्ण व विशाल आकाराचे असून ते सामाजिक-सांस्कृतिक दृष्ट्या विजातीय स्वरूपाचे बनलेले आहेत. तथापि, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र जगातील विविध समाजात सांस्कृतिक सजातियता निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

**सांस्कृतिक सजातीयकरणाचा अर्थ**

संस्कृतीचा अर्थ समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही सांस्कृतिक सजातियकारणाचा अर्थ समजावून घेणार आहात. एखाद्या वस्तुचे विविध भाग (Part) हे जर एकाच प्रकारचे असतील, एकजिनसी स्वरूपाचे असतील तर ती वस्तू सजातीय स्वरूपाची आहे असे म्हणतात. यावरून एखाद्या वस्तूच्या विविध भागांना एकाच प्रकारचे म्हणजे एकजिनसी बनविण्याची प्रक्रिया म्हणजे सजातीयकरण होय असे म्हणता येते. संस्कृती ही संकीर्ण आहे. म्हणजे ती अनेक घटकांची किंवा भागांची बनलेली असते. एखाद्या संस्कृतीचे विविध भाग हे एकजिनसी स्वरूपाचे असतील तर ती संस्कृती सजातीय स्वरूपाची आहे असे म्हणतात. पण हे विविध विभाग जर वेगवेगळया प्रकारचे म्हणजेच बहुजिनसी स्वरूपाचे असतील तर ती संस्कृती विजातिय स्वरूपाची आहे असे म्हणतात. आदिम समाजासारख्या लहान समाजांची संस्कृती ही सजातीय स्वरूपाची असते. कारण या संस्कृतीतील विविध घटक किंवा भाग उदा. वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या पद्धती, निवास पद्धती, यंत्रे, हत्यारे, श्रद्धा, मूल्ये, भाषा, सामाजिक नियमने व संस्था इत्यादी हे एकजिनसी स्वरूपाचे असल्याचे दिसते. याउलट आधुनिक समाजाची विशेषतः औद्योगिक नागरी समाजाची (Industrial

Urban Societies) संस्कृती ही अत्यंत विजातिय स्वरूपाची असल्याचे दिसते. कारण या संस्कृतीचे विविध भाग हे उदा. वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या पद्धती, सामाजिक नियमने व संस्था इत्यादी विभिन्न प्रकारचे म्हणजेच बहुजिनसी स्वरूपाचे असल्याचे आढळते. जिला आपण मानव संस्कृती (Human culture) म्हणतो ती विजातिय स्वरूपाची आहे. कारण तिचे विविध घटक वा भाग हे अत्यंत विभिन्न किंवा बहुजिनसी स्वरूपाचे आहेत. संस्कृतीच्या या विभिन्न भागांना एकाच प्रकारचे किंवा एकजिनसी स्वरूपाचे बनविणे म्हणजे सांस्कृतिक सजातियकरण करणे होय असे म्हणता येते.

**जागतिकीकरण ही सांस्कृतिक सजातीयकरणाची प्रक्रिया**

जागतिकीकरण ही सांस्कृतिक सजातीयकरण घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या पक्रियेत जगातील विविध राष्ट्रांमध्ये किंवा समाजामध्ये आर्थिक, वाणिज्य, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक असे परस्परसंबंध व परस्परावलंबन निर्माण होणे अभिप्रेत किंवा अपेक्षित आहे. त्यानुसार जगातील विविध समाजात घनिष्ठ असे परस्परसंबंध व परस्परावलंबन निर्माण होऊ लागले आहेत. तत्वतः या प्रक्रियेत सर्व राष्ट्रांचा/ समाजांचा समान सहभाग अपेक्षित आहे. तथापि, प्रत्यक्ष व्यवहारात मात्र जागतिकीकरणाचे धुरिणत्व किंवा पुढारपण हे औद्योगिकदृष्टया विकसित अशा कांही थोड्या राष्ट्रांकडे (विशेषतः अमेरिका व कांही युरोपियन राष्ट्रे यांच्याकडे) असल्याचे आढळते. जागतिकीकरणात या राष्ट्रांचे वर्चस्व वा प्रभुत्व निर्माण झालेले आहे. आणि ही विकसित राष्ट्रे ही आपली संस्कृती इतर राष्ट्रांवर लादीत आहेत. विशेषतः विकसनशील राष्ट्रांतील लोक देखील विकसित राष्ट्रांतील सांस्कृतिक गोष्टींचे मोठ्या प्रमाणावर अनुकरण करू लागले आहेत. त्यामुळे सांस्कृतिक सजातियकरण घडून येण्यास चालना मिळाली आहे.

जागतिकीकरणाची मूळ प्रवृत्ती ही भांडवलवादी व लोकशाहीवादी आहे. भांडवलवाद व लोकशाहीवाद यांनी जी संस्कृती निर्माण केली आहे ती प्रामुख्याने धर्मनिरपेक्ष (Secular) स्वरूपाची आहे. जागतिकीकरणातून अशाच धर्मनिरपेक्ष संस्कृतीचा प्रसार जगभर होऊ लागला आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हे मूल्य सर्वच समाजाच्या संस्कृतीत हळूहळू स्वीकारले जाऊ लागले आहे. व्यक्तीने आपल्या व्यक्तिगत जीवनात धर्मपालन करावे मात्र सार्वजनिक जीवनात वावरताना धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन ठेऊन वागावे हा विचार किंवा मूल्य सर्वत्र स्वीकारले जाऊ लागले आहे. म्हणजेच धार्मिक बाबतीत सजातीयता निर्माण होत आहे.

धार्मिक बाबीप्रमाणेच वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे, यंत्रे-तंत्रे इत्यादीबाबतीतही जागतिकीकरणाच्या माध्यमातून सजातीयकरण घडून येऊ लागले आहे. जागतिकीकरणात सहभागी झालेल्या राष्ट्रांतील लोकांची वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी व एकंदर जीवनशैली (Life-Style) ही एकसारखी होऊ लागली आहे. जगभरातील लोक (पुरुषाप्रमाणेच स्त्रियादेखील) जीन्स, टी शर्ट, बरमूडा, बूट्स, स्लिपर्स, प्रवासी बॅग्ज वापरू लागले आहेत. पुरुषाप्रमाणेच स्त्रियांही केस कापू लागल्या आहेत. स्त्रीपुरुषांच्या अलंकार पद्धतीत, अभिवादन प्रकारात, शिष्टाचारात एकसारखेपणा येत आहे. फास्ट फुड्स, कोल्ड्रींक्स, आईस्क्रिम, केक, पिझ्झा, बर्गर असे खाद्यपदार्थ जगभर अगदी खेड्यापाड्यतही लोकप्रिय होऊ लागले आहेत. जागतिकीकरणाची प्रक्रिया ही माहिती-तंत्रज्ञानावर स्वार होऊन जगभर पसरू लागली आहे. त्यामुळे माहिती-तंत्रज्ञानाचा वापर हा

माहिती व ज्ञान मिळविण्यासाठी तसेच मनोरंजनासाठीही होऊ लागला आहे. मोबाईल, कॉम्प्युटर, इंटरनेट, सॅटेलाईट अशा साधनांच्या माध्यमातून जगाच्या कोणत्याही भागातील व्यक्तीशी आंतररक्रिया करता येऊ लागली आहे. त्यामुळे आंतरक्रियेच्या पद्धतीत व मनोरंजनाच्या पद्धतीत एकसारखेपणा येत चालला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत लोकांच्या विशेषतः उच्चशिक्षीत नवीन पिढीच्या इच्छाआकांक्षा, ध्येये, मूल्ये, जीवनपद्धती, विचारसरणी इत्यादी गोष्टीही एकसारख्या होत असल्याचे आढळत आहे. जागतिकीकरणामुळे उत्पादन प्रक्रियेत व सेवा क्षेत्रात समान असे उत्पादन तंत्रे व कौशल्ये वापरली जाऊ लागली आहेत. जागतिकीकरणात परकीय भांडवलाबरोबरच परकीय तंत्रज्ञानासही मुक्त प्रवेश दिला जात आहे. परिणामी, जगभरातील उत्पादन प्रक्रियेत वापरावयाची तंत्रे, कौशल्ये, यंत्रे, अवजारे इत्यादींतही एकसारखेपणा येऊ लागला आहे. मागे आपण पाहिले की, अनियंत्रित स्वातंत्र्य, व्यक्तिवाद व उपभोक्तावाद ही तीन जागतिकीकरणाची प्रमुख मूल्ये किंवा गुणविशेष (ethos) असून त्याचा प्रभाव जगातील सर्व व्यक्ती व समूहांवर वाढत चालला आहे. त्यामुळे मूल्यांचेही सजातीयकरण होत असल्याचे दिसून येत आहे. मूल्यांप्रमाणेच भाषेच्या बाबतीतही सजातीयकरण घडून येत आहे. वेगवेगळ्या समाजामध्ये वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. तथापि, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र इंग्रजी भाषेचा वापर वाढत चालला आहे. विविध राष्ट्रांतील लोक परस्परांशी संप्रेषण साधण्यासाठी इंग्रजीचा वापर करू लागले आहेत. माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही इंग्रजी भाषेचे वर्चस्व असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी इंग्रजी भाषा शिकणे अनिवार्य झालेले आहे. त्यामुळेच पूर्वी इंग्रजी भाषेकडे दुर्लक्ष करणाऱ्या राष्ट्रांमध्येही आता तरुण पिढी इंग्रजी भाषा शिकण्यास व इंग्रजी भाषेतून शिक्षण घेण्यास प्राधान्य देऊ लागली आहे. आज इंग्रजी ही जागतिक स्तरावरील व्यवहाराची संपर्क भाषा बनल्याने तिचा वापर जगभर होऊ लागला आहे. भाषा हा संस्कृतीचा एक महत्वाचा घटक असून या घटकाचेही सजातियकरण होत चालले आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणामुळे वेशभूषा, केशभूषा, खाणेपिणे, यंत्रे तंत्रे, कौशल्ये, श्रद्धा, मूल्ये भाषा व एकंदर जीवनशैली इत्यादी सांस्कृतिक बाबींमध्ये सजातियता येत चालली आहे. यालाच सांस्कृतिक सजातियता असे म्हटले जाते.

थोडक्यात जागतिकीकरणाची प्रवत्ती ही सजातियता वा एकजिनसीपणा आणण्याची आहे. या प्रक्रियेत जगातील लोक एकाच साच्यात घातले जात आहेत. जगातील सर्व लोकांच्या आवडी निवडी, इच्छाआकांक्षा, सवयी, वर्तनप्रकार, जीवनशैली एकसारख्या बनविण्याचे प्रयत्न जागतिकीकरणात होत आहेत. याचा मुख्य आधार भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. जागतिकीकरणातून भांडवलशाहीचा प्रसार होत आहे. आणि त्यामुळे भांडवलशाहीतील मूल्ये व जीवनशैली ही जगभर प्रसारीत केली जात आहेत. परिणामी सांस्कृतिक सजातियकरणास चालना मिळाली आहे. यासंदर्भात **केवीन रॉबिन्स** म्हणतात की, भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा मोठा प्रभाव मानवी संस्कृतीवर पडला आहे. आज आर्थिक व्यवहारांचे जागतिकीकरण झाल्याने सांस्कृतिक रूपांतरणाचा नवीन प्रवाह आला आहे. आज जगात सार्वत्रिक सांस्कृतिक उत्पादने (Universal cultural products) तयार होत आहेत. याचाच अर्थ असा की, संस्कृतीचे ही वस्तूंप्रमाणे उत्पादन होऊ लागले आहे.

यासंदर्भात **सातची आणि सातची** (Saathchi and Saathchi) म्हणतात की, जागतिकीकरणात सांस्कृतिक मिलाफ (Cultural Convergence) झाला आहे. याचाच अर्थ असा की, जगातील लोकांची जीवनपद्धती एकसारखी झाली आहे. सर्व लोक राष्ट्र-राज्यांच्या सीमांचे उल्लंघन करून एका समान संस्कृतीचा स्वीकार करू लागले आहेत. त्यांच्या उपभोगाच्या वस्तू एकसारख्याच आहेत. उदा. पिझ्झा, टूथपेस्ट, डबाबंद खाद्यपदार्थ, पेये, जेलपेन इत्यादी. जागतिकीकरणाने एक अशी सहभागी संस्कृती (Shared culture) निर्माण केलेली आहे की जी जागतिक स्वरूपाची किंवा विश्वव्यापी अशी आहे. जागतिकीरणात संस्कृतीची निर्मिती करणारे उत्पादक व व्यापारी हे अशी संस्कृती निर्माण करू इच्छित आहेत की जी राष्ट्रांच्या राजकीय व भौगोलिक सीमा समाप्त करून टाकेल. यासंदर्भात **अमेरिकन केबल न्यूज नेटवर्क** ने असे म्हटले आहे की, आजची संस्कृती ही इलेक्ट्रॉनिक संस्कृती आहे व ती सिग्नल्स(Signals) वर बसून येते व सर्वांना चकीत करून सोडते, दिपवून टाकते. हे नेटवर्कने पुढे असेही म्हटले आहे की, ''आर्थिक जागतिकीकरणामुळे जगात एकप्रकारची सांस्कृतिक-सामाजिक क्रांती आली आहे. अमेरिकेतील पांढरपेशी व्यक्ती जेवढी या क्रांतीने प्रभावित झालेली आहे तेवढीच मास्को किंवा टोकिओतील कार्यकारी अधिकारीही प्रभावित झाले आहेत. यायाच अर्थ असा की, जे कांही आम्ही अमेरिकेसाठी करतो ते अमेरिकेबाहेरही उचित ठरते. आमच्या बातम्या वस्तूतः जगाच्या बातम्या आहेत.''

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणात संस्कृतीचे सजातियकरण घडून येत आहे. असे सजातियकरण घडवून आणण्यामध्ये अमेरिका व युरोपियन राष्ट्रांचा वाटा मोठा आहे. कारण जागतिकीकरणाची प्रक्रिया ही या राष्ट्रांच्या नेतृत्वाखालीच सुरू आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत या राष्ट्रांचे प्रभुत्व आहे. ही राष्ट्रे आपली आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक धोरणे व मूल्ये विकसनशील राष्ट्रांवर लादीत आहेत. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वित्तसंस्था आर्थिक जागतिकीकरणास चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावित आहेत आणि या संस्थावर अमेरिकेचे वर्चस्व आहे. अमेरिकेच्या इच्छेनुसारच या संस्था कार्य करीत आहेत. बहुराष्ट्रीय महामंडळे (MNCs) ही देखील जागतिकीकरणाची माध्यमे म्हणून कार्य करीत आहेत. या महामंडळाची मुख्यालये ही अमेरिका व युरोपियन राष्ट्रांमध्ये आहेत. त्यामुळे ही महामंडळे या राष्ट्रांच्या धोरणांचा प्रसार व प्रचार करताना दिसतात. याचाच अर्थ असा की, जागतिकीकरणाचे धुरिणत्त्व किंवा नेतृत्व हे अमेरिका व अन्य विकसित युरोपियन राष्ट्रे यांच्याकडे आहे.

**★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक-३**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) कोणत्या समाजाची संस्कृती ही सजातीय स्वरूपाची असते?

अ) औद्योगिक ब) नागर क) ग्रामीण ड) आदिम

२) जागतिकीकरणाची मूळ प्रवृत्ती ही कोणत्या प्रकारची आहे?

अ) समाजवादी ब) भांडवलवादी क) कल्याणकारी ड) मिश्र

३) जागतिकीकरणातून कोणत्या संस्कृतीचा प्रसार जगभर होऊ लागला आहे?

अ) धार्मिक ब) धर्मनिरपेक्ष क) अधार्मिक ड) धर्मविरोधी

४) जागतिकीकरणात कोणत्या भाषेचा वापर वाढत चालला आहे?

अ) स्पॅनिश ब) फ्रेंच क) इंग्रजी ड) वरील सर्व

५) जागतिकीकरणाचे धुरिणत्त्व प्रामुख्याने कोणत्या राष्ट्राकडे आहे?

अ) इंग्लंड ब) ऑस्ट्रेलिया क) जपान ड) अमेरिका

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) संस्कृतीची व्याख्या द्या.

२) सांस्कृतिक सजातियकरण म्हणजे काय?

३) कोणत्या समाजाची संस्कृती ही विजातिय स्वरूपाची असते?

४) केवीन रॉबिन्स यांच्या मते कोणत्या अर्थव्यवस्थेचा प्रभाव मानवी संस्कृतीवर पडला आहे?

५) कोणत्या वित्तसंस्था आर्थिक जागतिकीकरणास चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावित आहेत?

### ३.२.४ जागतिकीकरण आणि धार्मिक चळवळी :

(Globalisation and Religious Movement).

जागतिकीकरण ही एक व्यापक संकल्पना आहे. समाजातील त्याचबरोबर विश्वातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक सर्वच घटकांना जागतिकीकरणाने प्रभावित केले आहे. भौगोलिक राजकीय धर्म मूल्य आणि परंपरा यांच्या एकत्रीकरणातून संस्कृती बनते. जागतिकीकरणामुळे संस्कृतीचे विश्वाच्या अनेक सीमांच्या पलीकडे आगमन त्याचबरोबर मानवतावादी आणि विवेकी वैश्विक सभ्यतेची निर्मिती झाली याच्या आधारावर ती वैश्विक मूल्यांचा विकास होत आहे. जागतिकीकरण हे अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार करत असल्यामुळे व्यक्तिविकास मोठा वाव मिळत व्यक्तीचा विचार विशिष्ट राष्ट्राच्या संदर्भात न होता संपूर्ण जगाच्या संदर्भात होऊ लागला. जागतिकीकरणाच्या तीन तत्वाची आपण चर्चा केली आहे. त्यामध्ये अनियंत्रित किंवा अनिरुध्द स्वातंत्र्य, व्यक्तिवाद, आणि उपभोक्तावाद. १९९१ ला जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण हे धोरण भारताने स्वीकारले या धोरणाने समाजामध्ये अमुलाग्र बदल झाले असले तरी धार्मिकतेबद्दल लोकांच्या मनामध्ये आधुनिकता आली नाही. वैज्ञानिक, तांत्रिक, भौतिक सर्व क्षेत्रात प्रगती दिसून येते परंतु प्रत्यक्ष लोकांच्या जीवनामध्ये धार्मिकतेचे स्थान मजबूत बनत असताना दिसत आहे. भारतात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरू झालेल्या वैचारिक क्रांतीमुळे मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा आधुनिक दृष्टीकोन विकसित झाला. बुधीवाद, तर्कनिष्ठा, मानवतावाद या तत्वांनी आधुनिक दृष्टीकोणाला

आकार दिला. या आधुनिक दृष्टीकोनातून काही सुबुद्ध भारतीय प्रचलित समाजव्यवस्थेचे, अन्गोपागाचे जीवनपद्धतीचे तौलानिक दृष्ट्या परीक्षण करू लागले. असे करताना समाजातील काही घटकांवर होणारा अन्याय, जुलूम, विषमता यांच्या दृष्टीस पडली. या अनिष्ट प्रवृत्ती व पद्धती नष्ट करण्याचा व समाज निरोगी बनवण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. या त्यांच्या प्रयत्नातून भारतामध्ये सामाजिक सुधारणेच्या युगाचा प्रारंभ झाला. यामध्ये या चळवळींना धार्मिक सुधारणा चळवळ असे म्हंटले जाते त्याचबरोबर सुधारणा सर्व ही म्हटले जाते यामध्ये प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राम्हो समाज, रामकृष्ण मिशन, त्यास थियोसोफिकल सोसायटी, सत्यशोधक समाज, नारायण गुरु व केरळमधील अस्पृश्यता आंदोलन, वायकोम सत्याग्रह, त्याचबरोबर या सुधारणा आंदोलनातील महत्त्वपूर्ण तत्वे यांची विस्तृत चर्चा सदर घटकात केली आहे. त्याच बरोबर संपूर्ण विश्वभर मानवतावादाची शिकवण देणाऱ्या बुद्ध धम्माचा येथे थोडक्यात परिचय केला आहे.

१९ व्या शतकातील सुधारणा कार्यामध्ये प्रामुख्याने तीन प्रवाह आढळून येतात. हे तीनही प्रवाह जरी भिन्न असले तरी त्यांचे अंतिम ध्येय मात्र भारतामध्ये समाजसुधारणा घडवून आणणे हेच होते. सुधारणा वाद्यांच्या या मावाळ गटाचे प्रणेते होते राजाराम मोहन राय समाज सुधारणेचा विचार समाजावर चुकवून भागणार नाही तो विचार समाजातूनच उदयाला यायला पाहिजे व त्यासाठी लोक जागृतीची निकड आहे असे सुधारणावाद यांचे मत होते. सुधारणेची गरज समाजाला जाणवून देण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रीय लिखाण केले. ईश्वरचंद्र विद्यासागर, पिअरीचंद्र, व किशोरी चंद्र मित्रा गिरीश चंद्र घोष केशवचंद्र सेन न्यायमूर्ती रानडे इत्यादी मंडळींनी या गटामध्ये राजा राम मोहन राय यांच्याबरोबर आघाडीवर होती. या गटाला लोक जागृती बरोबरच कायद्याची सही घेणे हितकारक व आवश्यक वाटते. सती प्रथेविरुद्ध राम मोहन राय यांनी सातत्याने केलेला प्रसार सतीबंदीला दिलेला पाठिंबा किंवा ईश्वर विद्यासागर यांनी विधवा विवाहाच्या समर्थनात केलेले लिखाण व त्या कायद्याचा पाटलाग ही एक बोलके उदाहरण आहे. लोकजागृतीसाठी सामूहिक संघटित कार्याची गरज त्यांना जाणवल्यामुळे ब्राम्हो समाजाची यासारख्या संस्था ही त्यांनी स्थापन केल्या.

सुधारकांना प्रस्थापित धर्म हा प्रगतीतील अडथळा वाटला. अनेकेश्वरवाद, मूर्तीपूजा, आचारधर्माचा प्रभाव, पुनरजन्मावर विश्वास, दैववाद, परमपरांचा प्रभाव व समाजजीवनावर धर्माचा अतिरिक्त पगडा हि मध्ययुगीन हिंदी समाजाची वैशिष्टये होती. मध्ययुगामध्ये हा धर्म लोकांना खटकला नाही. पण बुद्धिवाद, विवेकनिष्ठा, ऐहिकता यावर आधारित, विज्ञाननिष्ठा, मानवतावाद, व्यक्तीस्वातंत्र्य व समता या नवीन प्रेरणा घेऊन आलेल्या आधुनिक युगात नवशिक्षीताना या धर्मामध्ये अनेक दोष दिसू लागले. आता एकेश्वरवाद, विश्वधर्म, विवेकनिष्ठा, मानवतावाद, व ऐहिकता यावर आधारित धर्मविचार पुढे आले. या सुधारकांनी भौतिक प्रगतीला महत्व दिले धर्म व व्यवहार यांची फारकत केली. मूर्तीपूजा, रूढीपरंपरा व पोथिनिष्ठा यांना विरोध केला. या सर्व सुधारणांनी धर्माच्या

अवडंबराचा निषेध केला. कर्मकांडामध्ये व स्वर्ग-नरक यांच्यात अडकलेल्या धर्माला आपल्या परीने शुद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. अनेकांना वेद वा उपनीषीदानमध्ये धर्माचे शुद्ध स्वरूप सापडले. राजा राम मोहन रॉय यांचा 'ब्राम्हो समाज' (१८२८), स्वामी विवेकानंद यांचा 'रामकृष्ण मिशन' (१८२७), दयानंद सरस्वतींचा 'आर्य समाज', आत्माराम पांडुरंग यांचा 'प्रार्थना समाज'(१८६७) या व इतर अनेक संस्था व व्यक्तींनी धर्मसुधारनेला प्रथम पसंती दिली.

सर्व धर्मसुधारकानी नीतीवर चांगल्या वागणुकीवर फार मोठा भर दिला. या सुधारकांनी नीतीची संकल्पना पारंपारिक नीती कल्पनेपेक्षा वेगळी होती. धर्म व आज्ञापालन याऐवजी विवेकबुद्धी हा सुधारकप्रणीत नीतीचा आधार होता. प्रत्येकामध्ये असणारी विवेकबुद्धी शिक्षणाच्या सहायाने विकसित करता येते. या भूमिकेतून शिक्षकांनी पाश्चात्य शिक्षणावर भर दिला. मानवतावाद, व्यक्तीस्वातंत्र्य, समता, बंधुता, प्रेम, सत्य, इत्यदी, नीती मुल्ये सुधारकांनी आदर्श मानली. याच नीतीकल्पनेवर सुधारकांच्या सामाजिक सुधारणा आधारित होत्या. एवढेच नव्हे तर सर्वच क्षेत्रातील सुधारणा या नीतीवर म्हणजेच आत्म्याच्या उन्नतीवर अवलंबून आहेत, असे सर्व सुधारकांना वाटत होते. अशाप्रकारे धर्म हा समाजाचा एक अभिन्न अंग असल्यामुळे त्यामधील सुधारणा समाजसुधारणाच ठरल्या. अनेक सुधारकांनी धर्माला प्राधान्य दिले ते यामुळेच. या सुधारकांनीच आपल्या कृतीने धर्मामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, आणि साऱ्या समाजाचेच चित्र हळू-हळू बदलू लागले. जागतिकीकरणाच्या कालखंडात जागतिकीकरण आणि धर्म चळवळी यांचा आढावा घेतात असे दिसून येते की, जगातील देश धर्म जसे सेक्युलॅरिझम कडे पाहतात एक मात्र खरे की गेल्या वीस तीस वर्षाच्या कालखंडामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या झांजवतात धर्माचा प्रभाव अजिबात कमी न होता उलट तो वाढत चालला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे सांस्कृतिक संघ संस्था व संघटनांकडून सेक्युलॅरिझम चा चुकीचा अर्थ काढलेला आहे. भारतीयांचा सेक्युलॅरिझम हा तर प्रगत लोकशाही राष्ट्रापेक्षा फार वेगळा अर्थ आहे असे दिसून येते.

जागतिकीकरणाच्या वातावरणात धर्माचा वाढता प्रभाव आणि धर्मनिरपेक्षतेला तिलांजली असा काहीसा प्रकार येथे होत आहे. जागतिकीकरण व सेक्युलरिझम मधील दरी वाढत आहे.

पीटर बर्गर या समाजशास्त्रज्ञाचा संदर्भ देता धर्म आणि राष्ट्र हे दोन्ही संस्कृतीच्या अधिष्ठानासाठी एकमेकासमोर स्पर्धक म्हणून उभे आहेत अशी आताची स्थिती आहे, असे वाटते. खरे पाहता विवेक, तर्क, मानवता, सहानुभूती, सहिष्णुता इत्यादींचा प्रभाव जनसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारात असण्याची गरज आहे. त्यातूनच मानवतावादी संस्कृतीचे संवर्धन होऊ शकते. परंतु धर्मव्यवहारच आता जनसामान्यांच्या जीवनात वरचढ ठरत आहे. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञान यांचा प्रभाव असलेल्या या बदलत्या परिस्थितीत धर्माचरण हे एक निरुपयोगी कर्मकांड असायला हवे होते. व एव्हाना कालबाह्य व्हायला हवे होते. परंतु धर्माचे पुरस्कर्ते शासनाच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदतीने

जबरदस्तीने समाजावर धर्माचरण लादण्याचा प्रयत्न करत आहेत. मुळात या धर्माचरणात चमत्कार, अतींद्रियशक्ती, वा मिथकं इत्यादींचेच उदात्तीकरण केलेले असते. त्याला कुठलाही, तार्किक, वैज्ञानिक वा नैतिक आधार नाही. भौतिक सुखाच्या शोधासाठी अत्यंत अनुकूल ठरत असलेल्या जागतिकीकरणात यांचाही मागमूसही नसावा, अशी अपेक्षा असते.

धर्म व जागतिकीकरण यांच्यातील घनिष्ठ संबंधाप्रमाणे धर्म आणि अर्थकारण यांच्यातील संबंधाविषयीसुद्धा प्रस्तूत घटकात विश्लेषण केले आहे. मुळात धर्माला चिकटून असलेल्या समाजात कमालीचे दारिद्र्य असते, असे तिचे मत आहे. आणि त्या समाजात श्रीमंत व गरीब यांच्यात फार मोठी दरी असते. ही विषमता गरीबांना धर्माचरणाकडे खेचते. जागतिक बाजारपेठेत मागणी तसा पुरवठा या तत्वाचा दबाव असल्यामुळे प्रत्येक धर्म बाजारपेठेतील वाट्यासाठी स्पर्धा करत असतात. भारतीय बाजारपेठ त्या तुलनेने फारच मोठी असल्यामुळे हिंदू धर्माची चांगलीच चलती आहे. व परमेश्वर त्याच्या व्यापाऱ्यांना 'छप्पर फाडके' देत आहे.

कदाचित समाजाला सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ व्हावेसे वाटल्यास अंधश्रद्धांना खतपाणी घालणाऱ्या व शोषणाला उत्तेजन देणाऱ्या धर्माला उतरती कळा लागेल. त्यासाठी खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षतेचे तंतोतंत पालन हवे व धर्माला चार भिंतीतच रहायला भाग पाडायला हवे.

मानवता, विज्ञान व धर्मनिरपेक्षता या सारख्या संकल्पनाबद्दल व त्यांचा व्यवहारात उपयोग करायला हवे यासाठी आस्था असणाऱ्या सर्वांसाठी आहे. कट्टर धार्मिकतेच्या या पोषक वातावरणात विवेकी विचारांना थारा देणे अत्यंत कठिण काम आहे असे वाटत असले तरी त्याला पर्याय नाही. विकासाची दिशा विवेकवादी असलेच पाहिजे हे जाणवते परंतु जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत तसे होताना दिसून येत नाही. धर्म मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वातील आणि समाजजीवनातील आवश्यक मूल्ये जगापुढे मांडतो. मनुष्य जेव्हा जगाच्या संदर्भात मूल्यांचा विचार करू लागतो तेव्हा ही गोष्ट घडते, मग त्यांचे जग कितीही लहान असो. सामाजिक आणि मानसिक जीवनासारखी ही गोष्टदेखील माणसाच्या बौद्धिक क्षमतेवर आधारलेली असते. मनुष्याची बौद्धिक आणि मानसिक शक्ती ही त्याची मूल्ये आणि त्याच्या संकल्पना यांचे जागतिकीकरण करण्याचा प्रयत्न करते. सारासार विचार करण्याची पद्धत माणसाला वैश्विक संकल्पनाचे भांडार प्रदान करते, तद्वतच धार्मिक यंत्रणाही माणसाला वैश्विकतेचे दर्शन घडवीत असते. जॉन बायलिस आणि स्टीव्ह स्मिथ यांनी जागतिकीकरणाची व्याख्या करताना म्हटले आहे की, जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय या व्याख्येच्या अनुषंगाने जगातील भौगोलिक क्षेत्र लक्षात न घेता तथागत गौतम बुद्धांनी आपले जे सिद्धांत व तत्वज्ञान मांडले ते मानवी विकासासाठी आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. बुध्दाच्या धम्माकडे फक्त अध्यात्म म्हणून पाहिले गेले तर ती फार मोठी चूक

होईल. बुद्ध धम्म हा जितका अध्यात्मिक आहे त्यापेक्षा जास्त तो सामाजिक आहे. म्हणूनच बुद्धाला या जगाच्या पाठीवरील पहिला समाज सुधारक म्हटले गेले आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक इतर सर्व क्षेत्रातील विकास होणे गरजेचे असते. त्यांनी व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी उपरोक्त प्रत्येक क्षेत्राबाबत आपले विचार, उपदेश, सिद्धांत व तत्वज्ञान मांडले आहे. त्यांचे तत्वज्ञान हे व्यक्ती विकासासाठी असल्यामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीच्या ते हिताचे व कल्याणाचे आहे. आपला प्रत्येक सिद्धांत मांडताना त्यांनी जगातील व्यक्ती गृहीत धरलेला दिसून येतो. त्यामुळे त्याला आनंदी व समृद्ध करण्यासाठी बुद्ध भौगोलिक सीमांमध्ये बांधले गेलेले दिसत नाही. या जगाला धम्मराज्य बनविणे हा त्यांच्या शिकवणीचा उद्देश आहे. त्यामुळे बुद्ध हे जागतिकीकरणाचे खंबीर पुरस्कर्ते होते. Globalizing process as desirable or necessary to the well - being of human society

**ब्राम्हो समाज:**

एकोणिसाव्या शतकात सुरू झालेला आहे सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळीचे जनक राजा राम मोहन राय होय. त्यांनी १८१४ साली बंगालमध्ये आत्मीय सभा स्थापन करून हिंदी समाजात सुधारणा चळवळीचा पाया घातला. आमसभेचे रूपांतर पुढे १९२९ सली ब्राह्मो समाजात झाले. या समाजाने एकेश्वरवादाचा पुरस्कार, मूर्ती पूजेस विरोध, निर्गुण, निराकार, परमेश्वराची प्रार्थना, सर्व धर्म आणि धर्माबद्दल आदर या तत्त्वांचा पुरस्कार करण्यासाठी स्थापन केला. ब्राह्मो समाजाची मानवतेवर पूर्ण श्रद्धा असून वंश, लिंग, धर्म इत्यादीच्या पलीकडे जाऊन मानवतेची सेवा करणे हे त्यांचे ध्येय होते. राजा राम मोहन राय यांच्या मृत्यूनंतर माणूस माझ्या चे महत्व काही काळ कमी झाले. त्यानंतर देवेंद्रनाथ टागोर व केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजास ऊर्जितावस्था आणली परंतु दोघांची मते एकमेकांशी न पटल्याने ब्राह्मो समाजाची विभागणी झाली. देवेन्द्रनाथ टागोरांचा आदि ब्राम्हो समाज तर प्रागतिक विचारसरणीचे केशव चंद्र सेन यांनी भारतीय ब्राह्मण समाज म्हणून ओळखले जाऊ लागले. देवेंद्रनाथ टागोर ज्ञानी ब्राह्मो समाजाचे व्यवस्थित रूप प्राप्त करून दिले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हिंदी संस्कृतीवरील टीकेला सडेतोड उत्तर दिले. केशवचंद्र सेन यांनी शिक्षण स्त्री-शिक्षण बालविवाह प्रतिबंध विधवा विवाह आंतरजातीय इत्यादी विषयावर प्रबोधन केले. एकंदरीत पाहता ब्राह्मो समाजाची वाटचाल ही तार्किक व विकी दृष्टिकोनातून सुरू होती. जागतिकीकरणाची तुलना करता हा उदात्तीकरणाचा दृष्टिकोन भारतीय समाजात घट होणे अपेक्षित होते परंतु तसे होताना दिसून येत नाही.

**आर्य समाज:**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी उत्तर भारतात आर्य समाजाची स्थापना सन १९७५ साली केली. त्यांनी प्रामुख्याने सामाजिक धार्मिक सुधारणा यांना चालना दिली. तसेच आर्य समाजाची तत्त्वज्ञान व

विचाराचा प्रचार त्याचबरोबर आर्य समाज आणि यांचे संघटन करण्याचेही कार्य त्यांनी केले. त्याने सत्यार्थप्रकाश वेदभाष्य भूमिका आणि ऋग्वेद यावर टीकात्मक समालोचन असलेला वेदभाष्य हा ग्रंथ लिहिला. आर्य समाजाचे कार्य पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान इत्यादी पर्यंत पोहोचवले. आर्य समाजाची मुख्य शिकवण म्हणजे दयानंद सरस्वतीनी बालविवाहास विरोध करून स्त्रीशिक्षण व विधवा विवाहास उत्तेजन दिले. वैदिक धर्माचे दरवाजे सर्व व्यक्तींना खुले असावे त्यासाठी त्यांनी शुद्धीकरणाची सर्व हाती घेतली होती. मूर्तिपूजा, बहुदैवत्य, स्त्रीदास्य, अस्पृश्यता या गोष्टींना मोठा विरोध केला. त्यांच्या मृत्यूनंतर लाला हजराज, पंडित गुरुदत्त, लालालजपत राय  इत्यादींनी त्यांचे कार्य पुढे चालवले. अरे समाधी सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे वैभवशाली भूतकाळाबद्दल लोकांचा अभिमान जागृत केला. पाश्चात्त्य शिक्षणाची देशभर दयानंद ग्लो वेदिक नावाच्या शिक्षण संस्थेचे जाळे त्यांनी उभारले.

**रामकृष्ण मिशन**

स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना सन १९६७ मध्ये केली. रामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंदांचे व्या शतकातील एक प्रभावी धार्मिक आणि सामाजिक चळवळ म्हणून रामकृष्ण मिशन चे कार्य महत्त्वपूर्ण मानली जाते. भारतीय संस्कृतीची महानता अखिल जगात पोचविण्याचे कार्य स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनच्या माध्यमातून केले. त्यांनी देशभर प्रवास करून सामान्य जनतेची दुःखे आणि अडचणी समजावून घेतल्या. सन १८९३ अमेरिकेतील शिकागो येथे धर्म परिषदेत त्यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख प्रथम जगाला करून दिली. युरोपातही प्रवास करून त्यांनी पाश्चात्य संस्कृती किंवा धर्म यापेक्षा भारतीय संस्कृती व हिंदू धर्म याविषयी आपले विवेचन केले. त्यांनी आपली मांडणी समाजातील दारिद्र्य, आळस, कर्मठपणा, अस्पृश्यता हे दोष काढून टाकले पाहिजेत असे मत मांडले. धर्म शरणात मानव सेवेला प्राधान्य देऊन स्वाभिमानाची व राष्ट्र विमानाची ज्योत समाजामध्ये प्रज्ज्वलित केली. रामकृष्ण मिशनचे कार्य आजही सुरूच आहे. विवेकानंदांची मांडणीही विवेकी तत्त्वाच्या आधारावर केली होती. त्यानी विज्ञानाला प्रथम प्राधान्य दिले.

**थिऑसॉफिकल सोसायटी**

अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे १८७५ साली मादाम ब्लाव्हाटस्की व कर्नल अल्कॉट यांनी या संस्थेची स्थापना केली. भारतातील या सोसायटीचे कार्य डॉक्टर आणि बेझंट या आयरिश बाईंनी स्वीकारले. भारतभर प्रवास करून त्यांनी समाजात धर्मजागृती आणि राष्ट्रवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेज स्थापन केले. या सोसायटीचे प्रमुख तत्त्व म्हणजे जगातील प्राचीन धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञान यांचा अभ्यास करणे. सत्कर्मातून मानवाला मोक्ष निर्वाण

प्राप्ती होते, आत्मा कोणताही लिंगभेद मानत नाही. परिणामी स्त्री-पुरुष समान आहेत सर्व मोक्ष मार्ग दाखवितात म्हणून सर्व धर्म समान आहेत. इतर सामाजिक दृष्टिकोनातून समाजाने निरक्षरता, मध्यपान, बालविवाह, पडदा पद्धत इत्यादी ला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर स्त्री उद्धाराचे काम केले.

**प्रार्थना समाज:**

ब्राह्मो समाजाचे नेते केशवचंद्र सेन ज्यांच्या विचारातून प्रभावित होऊन नाही मूर्ती भांडारकर वामन गोपाळ हरी देशमुख, आत्माराम पांडुरंग प्रभावित झाले आणि त्यातून प्रार्थना समाजाची स्थापना झाली सन १८६७. प्रार्थना समाजास तात्विक बैठक देण्याचे काम न्यायमूर्ती रानडे व भांडारकर यांनी दिले. या समाजाच्या प्रमुख तत्त्वांमध्ये मूर्तिपूजा विरोध, ईश्वर भक्तीने प्रसन्न होत असतो, जीवात्मा व परमात्मा एक नसून दोन आहेत, आत्मिक उन्नती साठी आपले कट्टर हिंदुत्व कायम ठेवून धर्मात सुधारणा करू इच्छितात. प्रार्थना समाजाने सुशिक्षित वर्गात समाजसुधारणेच्या चळवळीची पार्श्वभूमी तयार केली व अस्पृश्यता जातीयता, मूर्तिपूजा, विधवांची, दयनीय स्थिती बालविवाह इत्यादी परंपरावरती टीका केली. प्रार्थना समाजाचे पाश्चिमात्य धर्तीवर आधुनिकीकरण करावयाचे होते. प्रार्थना समाजाने विविध उपक्रमाच्या द्वारे मानवतावादी कार्य सुरू ठेवले. यामध्ये अनाथ बालकाश्रम, रात्रशाळा, मुलींच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन केल्या. शिक्षण प्रसार व्हावा यासाठी स्थापन करण्यात आलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी व गोपाळ कृष्ण गोखले यांनी स्थापन केलेला भारत सेवक समाज या संस्था प्रार्थना समाजाच्या प्रेरणेतून निर्माण झाल्या होत्या. या समाजाचे सदस्य महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलित उद्धारासाठी डिस्प्रेड क्लास मिशन ही संस्था स्थापन केली.

**सत्यशोधक समाज**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी दलित उद्धारासाठी अत्यंत महत्त्वाचे काम केले. सामाजिक विषमता व तरी त्यांची दुःखे नाहीशी करण्यासाठी त्यांनी समाजातील भटभिक्षुकांच्या व उच्चवर्णीयांच्या धर्माचा प्रतिकार करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना २८ सप्टेंबर १८७३ साली केली. सत्यशोधक समाजाची तत्त्वे पूर्वीप्रमाणे.

१) ईश्वर भक्ती करण्याचा प्रत्येक व्यक्तीस अधिकार आहे.

२) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत असून तो गुणांनी श्रेष्ठ ठरतो.

३) ईश्वर एकच असून तो सत्य स्वरूप आहे.

४) ईश्वर भक्तीसाठी मध्यस्थाची गरज नाही.

५) कोणतेही ग्रंथ ईश्वर प्रणित नाहीत.

६) पुनर्जन्म, कर्मकांड इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत. फुले यानी सत्यशोधक समाज द्वारे त्यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सत्यशोधक समाजाने जमीनदार सरकारी अधिकारी ब्राह्मण वरील यांच्याकडून कनिष्ठ वर्गाला मिळणारी अन्यायी वागणूक याबाबत जागृती घडवून आणली. जोतिबांनी आपले विचार व्यक्त करण्यासाठी 'दीनबंधु' वृत्तपत्रात आपले लिखाण केले तसेच 'शेतकऱ्याचा असुड', गुलामगिरी ब्राह्मणांचे कसब हे ग्रंथ लिहिले. महात्मा फुले महाराष्ट्रातील दलित पतितांचा पहिला उद्धारक होते. ज्योतिराव फुले यांची ओळख मानवताधर्माचा प्रसारक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला आहे. महात्मा फुले यांचे धार्मिक विचार क्रांतिकारक होते. हिंदू धर्मात असणाऱ्या रूढी, प्रथा, परंपरा, चालीरीती, पाप-पुण्याच्या कल्पना यावर त्यांनी टीका केल्या. ईश्वराला त्यांनी निर्मिक म्हंटले. संपूर्ण विश्वात ईश्वर मानणारे व न मानणारे लोक आहेत. ईश्वर भक्तीसाठी विविध प्रकारच्या पूजाअर्चा कर्मकांडे केल्यामुळे माणसामाणसात फूट पडते. त्यांनी मानवाच्या हिताचे संरक्षण करण्याचा आणि त्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचा विचार जोतिबांनी मांडला. मानवी हिताचे रक्षण हीच ईश्वर पूजा त्यांची अशी धारणा होती. मूर्तीपूजा जोतिबांना मान्य नाही विश्व ईश्वराने किंवा निर्मिकाने केले. त्याला नैवेद्य दाखवणे, त्याला फळे, फुले इत्यादी वस्तू अर्पण करणे यासारखी मूर्खपणाची दुसरी गोष्ट नाही. दगडाच्या मूर्तीवर फुले वाहून नामस्मरण केल्याने मानवाला कसलाही फायदा नाही. स्वर्ग आणि नर्क या सारख्या गोष्टी पूर्णपणे काल्पनिक आहेत. ब्राह्मनाणे आपल्या फायद्यासाठी खोटे ग्रंथ तयार केले आणि त्यात अनेक काल्पनिक गोष्टी घुसडल्या. जातीभेद पाळणे म्हणजे धर्म नव्हे तसेच धंदा म्हणजे धर्म नव्हे. ब्राह्मनाणी स्वतःच्या फायद्यासाठी कष्ट न करता पोटापाण्याचा धंदा म्हणून धर्माचा उपयोग केला. निर्मिकाचा धर्म एकच आहे तो सत्याचा दुसरा कोणता धर्म नाही. जो सत्य वर्तन करतो तोच पवित्र होतो. बुद्धाने दिलेला संदेश तोच महात्मा फुले यांनी दिला आहे तो म्हणजे मनुष्याने देवाचा शोध घेण्यासाठी आपले आयुष्य वाया घालवू नये. धर्माच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शोषण होत आहे. स्त्रिया व बहुजन समाजातील अनेक लोक ब्राह्मणी धर्माच्या शोषणाचे बळी ठरत आहे. सर्व जाती धर्मातील लोकांनी आपसात संघर्ष न करता प्रेमाने वागावे. ज्योतिबानी मोठ्या प्रमाणावर लिखाण करून अज्ञानी समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. जातीभेद वर्णभेद नाहीसा करत स्वातंत्र्य न्याय बंधुता माणुसकी प्रेमाच्या आधारावर त्यांना नवसमाज निर्माण करावयाचा होता. त्यासाठी त्यांची धडपड सुरू होती.

**नारायण गुरु व केरळ मधील अस्पृश्यता:**

आधुनिक भारतातील महत्त्वाच्या सुधारकामध्ये नारायण गुरु यांचे स्थान वरचे आहे. आपल्या सात वर्षाच्या कालखंडामध्ये नारायण गुरु याने कृती बरोबर विचारातून सामाजिक चळवळ सुरू केली. नारायण गुरु यांनी आपले जीवन सामाजिक बदल व चळवळीसाठी समर्पित केले. नारायण गुरु

केरळमधील एझंवा अस्पृश्य जमातीतील सुधारक होते. ते केवळ सुधारक संत आणि तत्वज्ञानी नव्हते तर ते एक मानवतावादाचे प्रवर्तक होते. प्रत्येक मानवाला चांगली वागणूक देण्यासंदर्भात ते म्हणतात माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी आहे. नारायण गुरुनी कधी धर्म भेदभाव केला नाही ते सर्वांमध्ये मिसळत त्यांच्याबरोबर जेवण करीत नारायण गुरु यांच्यावर प्रथम पासूनच महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. जात ही मानव जातीला शाप आहे असे म्हणत म्हणून ते जाती-जमातीच्या प्रश्नावर नेहमी प्रकाश टाकतात. नारायण गुरुनी एक संत म्हणून आपल्या कार्याची सुरुवात आरुवीपुरम या ठिकाणाहून केली. हे ठिकाण त्रिवेंद्रम पासून २५ किलोमीटर वरती आहे. केरळमध्ये अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात होती. केरळ मध्ये काही मंदिरांमध्ये व मंदिराच्या बाहेर फिरणे अस्पृश्यांना बंद होते. तेथे भक्तीच्या मार्गामध्ये व वागण्यामध्ये पूर्णपणे भेदभाव होता. शूद्रांचा ब्राम्हण वर्गाकडून मोठ्या प्रमाणात छळ होत होता. एझंवा किंवा थियास हा केरळ मधील मुख्य वर्ण होता. या वर्णातील लोकांना मंदिराच्या सुरक्षित भिंतीपासून १४ फूट लांब ठेवले जात होते. अनेक वर्षापासून या राज्यांमध्ये भेदभाव चालू होता. सवर्णांची दडपशाही कायमस्वरूपी हळूहळू मात्र शूद्रानी आपल्या मध्ये बदल करीत आर्थिक ताकद निर्माण केली होती. हे सामाजिक राजकीय परिणामातून घडल्याचे दिसून येते. समाजातील सामाजिक विषमता दूर करण्यासाठी नारायण गुरु यां सर्वामागचे मुळ त्यावर उपाय शोधण्यासाठी अथक परिश्रम घेतले. आणि हे सर्व त्यांनी प्रेमाच्या माध्यमातून केले. समान्य हक्कासाठी त्यांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेशासाठी हक्क मिळवून देण्यासाठी लढा उभारला. नारायण गुरु यांनी विविध चळवळी हाती घेतल्या. नैसर्गिक न्याय व मानवी अधिकार दडपलेल्या व प्रेषित लोकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी ते पुढे आले. मागास समाजाच्या न्याय हक्कासाठी नारायण गुरु धर्म परिपालनम योग ने मोठ्या प्रमाणात लढा दिला. नारायण गुरूंचा लढा आपल्या लिखाणातून व व्याख्यान मालिकेतून चालू होता. नारायण गुरु धर्म परिपालनयोगमने राज्यकर्ते व शासन यांच्या विरोधात बंड पुकारले. वृत्तपत्रीय बातम्या व त्या वृत्तपत्रातील संपादित केले की अतुल समाज प्रबोधनाला चालना दिली.

**वायकोम सत्याग्रहः**

वायकोम हे केरळ राज्यातील कोट्याम जिल्ह्यातील छोटेसे खेडे आहे. येथे प्रसिद्ध आंदोलन १९२४ मध्ये सुरू झाले त्याला वायकोम सत्याग्रह असे म्हणतात. अस्पृश्यतेच्या विरोधात चळवळ सुरू केलेली भारतातील ही पहिली चळवळ. या चळवळी खूप मोठे क्षेत्र व्यापले होते याची सुरुवात १९२३ च्या काँग्रेसच्या काकी नंदा येथील सभेमध्ये झाली. येथून या चळवळीचा एल्गार सुरू झाला. टि.के. माधवन यांनी केरळमधील वंश भेदभाव व हिंदू मागासलेल्या लोकांच्या समस्या व अहवाल सादर केला. या सभेत अस्पृश्यतेच्या विरोधी चळवळ सुरू करावयाची असे ठरले. अस्पृश्यतेच्या विरोधी कायमस्वरूपी लढा देण्यासाठी एक समिती स्थापन केली. १९ फेब्रुवारी १९२४ ला केरळ

पर्यटनम आयोजित करण्याचे ठरवले. सर्व हिंदूंनी मंदिरात प्रवेश करणे व मंदिरावरील रस्त्यावर फिरण्यासाठी केरळ पर्यटनम आयोजित करण्यात आला. जेथे अस्पृश्यता आहे तेथे हे वायकोम आंदोलन पोहोचले. ३० मार्च १९२४ ला या मोठ्या सत्याग्रहाची सुरुवात झाली. या सत्याग्रहाचे पहिले आश्रयदाते चटटपी स्वामी हे होते. ते नारायण गुरु यांचे गुरु होते. त्यांच्या आश्रमामध्ये आंदोलनासाठी आश्रय देण्यात आला. पुढे चटटपी स्वामी यांची जागा नारायण गुरु यांनी घेतली. केरळ व तमिळनाडू येथील मोठ्या प्रमाणात लोक आंदोलनात सहभागी झाले होते. या चळवळीला यश येऊन वायकोम मंदिरात प्रत्येक दरवाजा मागासलेल्या व दबलेले लोकांसाठी खुला करण्यात आला. या चळवळीतून अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळाला केरळातील ही एक अभूतपूर्व अशी घटना होती. ते आपल्या अनुयायांना नेहमी सांगत होते की इतरांच्या मनाला त्रास होईल, त्यांच्या भावना दुखावतील असे काही बोलू नका. या विचारसरणीचा आदर करून उच्च जातीतील श्रीमंत नेत्यांनी त्यांचा आदर करायला सुरुवात केली. दबलेल्या लोकांनी आपल्या हक्कासाठी सुरू केलेल्या चळवळीला त्यांनी पाठिंबा दिला. नारायण गुरु च्या मार्गदर्शनाने आपल्या अस्पृश्य लोकांना आपल्या हक्कासाठी लढण्याला ताकत आली. नारायण गुरु यांनी केरळमध्ये अभूतपूर्व अशी चळवळ सुरू केली. या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी खालच्या जातीतील लोकांना न्याय मिळवून दिला. शिक्षणातून ज्ञान मिळते आणि ज्ञान हे अज्ञान नष्ट करते. दैनंदिन ज्ञानातून दारिद्र्य नष्ट करता येते. श्री नारायण गुरु यांच्या नेतृत्वाखाली खालच्या जातीतील समाजामध्ये जागृती केली. समाज प्रबोधनपर कार्यक्रम घेऊन व्याख्याने दिली. नारायण गुरु यांच्या मते जात ही देवाने दिलेली देणगी नव्हे. जर जात गरजेचे असेल तर सर्वांनी ब्राह्मण बनू या शिवगिरी येथे अस्पृश्यांच्या मुलांना इतर हिंदू मुलाबरोबर त्यांना समान संधी व धर्म उपदेशक वर्गाचे प्रशिक्षण दिले. ते म्हणतात खालच्या वर्गातील लोकांनी शिकले पाहिजे. त्यांना इतरांप्रमाणे समान संधी दिल्या पाहिजेत. महात्मा गांधींनी त्रिवेंद्रम येथे भेट दिल्यानंतर ते म्हणतात, येथे आल्यावर मी विचार केला कि माझे जीवन माझे नशीब खूप मोठे आहे. कारण मी या सुंदर अशा त्रिवेंद्रम् राज्याला भेट दिली आणि तेथील आदरणीय संत श्री नारायण गुरु स्वामी यांची भेट झाली हे माझे भाग्य आहे. रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी व नारायण स्वामी यांच्या भेटीला भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. कारण हे तिन्ही देशभक्त आणि देशाला बंधूभाव, स्वातंत्र्य, सेवा आणि स्वकर्तृत्व या मार्गाने चालण्याचा संदेश दिला. दलित लोकांसाठी ते महत्वपूर्ण संदेश देतात शिक्षण घ्या स्वतंत्र व्हा एकत्र या म्हणजे मजबूत व्हाल. उद्योग करा म्हणजे आर्थिक सदरच्या सुधारेल हे कायम लक्षात ठेवा. नारायण गुरु हे एक निधर्मी जागतिक दर्जाचे सामाजिक विचारवंत व समाज सुधारक होते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक–४**

अ) बहुपर्यायी प्रश्न

१) ......... हे कोणत्या प्रकारच्या अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार करते.

२) ......... केरळमधील एझंवा अस्पृश्य जमातीतील सुधारक होते.

३) ......... जागतिक दर्जाचे सामाजिक विचारवंत व समाज सुधारक होते.

४) .......... यांनी केरळमधील वंश भेदभाव व हिंदू मागासलेल्या लोकांच्या समस्या व अहवाल सादर केला.

५) .......... मानवतेवर पूर्ण श्रद्धा असून वंश, लिंग, धर्म इत्यादीच्या पलीकडे जाऊन मानवतेची सेवा करणे हे त्यांचे ध्येय होते.

६) .......... यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

७) .......... सुशिक्षित वर्गात समाजसुधारणेच्या चळवळीची पार्श्वभूमी तयार केली व अस्पृश्यता जातीयता, मूर्तिपूजा, विधवांची दयनीय स्थिती, बालविवाह इत्यादी परंपरा वरती टीका केली.

८) रवींद्रनाथ टागोर,............ यांच्या भेटीला भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

९) ............. यांनी जागतिकीकरणाची व्याख्या करताना म्हटले आहे की, जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

१०) ............ ईश्वराला त्यांनी निर्मिक म्हंटले.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न क्रमांक–४ उत्तरे**

१) जागतिकीकरण

२) नारायण गुरु

३) नारायण गुरु

४) टि.के. माधवन

५) ब्राह्मो समाजाची

६) महात्मा ज्योतिबा फुले

७) प्रार्थना समाजाने

८) महात्मा गांधी व नारायण स्वामी

९) जॉन बायलिस आणि स्टीव्ह स्मिथ

१०) महात्मा ज्योतिबा फुले

## ३.३ सारांश

या तिसऱ्या घटकात तुम्ही प्रथम जागतिकीकरणाची मूल्ये अभ्यासलेली आहेत. अनिर्बंध स्वातंत्र्य, व्यक्तिवाद व उपभोगतावाद ही तीन जागतिकीकरणाची प्रमुख मूल्ये आहेत. जागतिकीकरण हे व्यक्तीस अनिर्बंध किंवा अनियंत्रित स्वातंत्र्य असावे या मूल्यावर भर देते. तसेच समष्टीपेक्षा व्यक्तीच्या हितास प्राधान्य देते. त्याचबरोबर व्यक्तींनी अधिकाधिक वस्तू व सेवांचा उपभोग घ्यावा व असा उपभोग घेणे योग्य आहे या मताचाही पुरस्कार करते. त्यानंतर तुम्ही जागतिकीकरणाच्या माध्यमातून अमेरिकन संस्कृतीचे कसे प्रसारण व प्रक्षेपण होत आहे हे समजावून घेतलेले आहे. गीलपीन हे विचारवंत यासंदर्भात म्हणतात की, जागतिकीकरणात अमेरिकेसारखी प्रभुत्त्वशाली राष्ट्रे ही आपली धोरणे व मूल्ये विकसनशील राष्ट्रांवर लादीत आहेत. जागतिकीकरणात अमेरिकेची मूल्ये ही इतर राष्ट्रांमध्ये प्रसारित व प्रक्षेपित केली जात आहेत. अमेरिकन संस्कृतीतील मूल्ये, तंत्रज्ञान, वेशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी इत्यादी घटकतत्त्वे इतर राष्ट्रांमध्ये प्रसारित केली जात आहेत. याशिवाय अमेरिकेत असलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था व लोकशाही राज्यव्यवस्था जगातील इतर राष्ट्रात प्रसारीत केली जात आहेत. याशिवाय इंग्रजी ही अमेरिका व इतर पाश्चात्त्य राष्ट्रातील भाषा ऊर्वरीत राष्ट्रांमध्ये स्वीकारली जाऊ लागली आहे. यानंतर तुम्ही जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगात सांस्कृतिक सजातियकरण कसे घडून येत आहे हे समजावून घेतलेले आहे. जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांची संस्कृती वेगवेगळी आहे. पण आज जगातील सर्व राष्ट्रांमध्ये एकसारखी संस्कृती जागतिकीकरणाच्या माध्यमातून आकारास येत आहे. पोषाख, खाणेपिणे, मूल्ये, भाषा इत्यादीबाबतीत जगातील सर्व लोकांमध्ये एकसारखेपणा/एकजिनसीपणा येत चालला आहे. सर्व लोकांची जीवनशैली ही बहुतांशी समान होत आहे. यालाच सांस्कृतिक सजातियकरण असे म्हणतात. आणि असे सजातियकरण घडवून आणण्यामध्ये अमेरिकेचे प्रभुत्त्व आहे. जागतिकीकरणाची धूरा अमेरिका व युरोपियन राष्ट्रांकडे आहे.

## ३.४ स्मरणार्थ संज्ञा

- **संस्कृती :** मानवनिर्मित भौतिक व अभौतिक वस्तूंचा समुच्चय.
- **सजातियकरण :** एखाद्या वस्तूचे विविध भाग किंवा घटक एकजिनसी बनविण्याची प्रक्रिया
- **अर्थव्यवस्था :** मानवी गरजांच्यापूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन, वितरण, विनिमय, उपभोग इ. या प्रक्रियांची व्यवस्था.

- **लोकशाही :** प्रौढमताधिकार पद्धतीने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी राज्यकारभार करण्याचा शासनप्रकार.
- **सांस्कृतिक घटकतत्त्व :** संस्कृतीतील लहानात लहान असा अविभाज्य घटक.
- **विकसित राष्ट्रे :** ज्या राष्ट्रांचे दरडोई वास्तविक उत्पन्न तुलनात्मकदृष्ट्या जास्त आहे अशी राष्ट्रे. उदा. अमेरिका, इंग्लंड, जपान.
- **विकसनशील राष्ट्रे :** ज्या राष्ट्रांत विकासाची प्रक्रिया सुरू झालेली आहे पण अद्याप ती पूर्ण झालेली नाही अशी राष्ट्रे उदा. भारत, चीन, पाकिस्तान, थायलंड इत्यादी.
- **धर्मनिरपेक्षता** : लौकीक जीवन धर्माच्या प्रभावापासून दूर ठेवणे.
- **भांडवलवाद :** उत्पादन साधने खाजगी मालकीची असावीत असे सांगणारी विचारसरणी.
- **पांढरपेशीय व्यक्ती :** बौद्धिक श्रमावर आपला निर्वाह चालविणारी व्यक्ती. उदा. डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, वकील इ.
- **कार्यकारी अधिकारी :** एखाद्या संघटनेत/संस्थेत प्रशासकीय वा व्यवस्थापकीय स्वरूपाचे कार्य करणारा अधिकारी.
- **बहुराष्ट्रीय महामंडळ :** एका राष्ट्रात मुख्यालय असलेली पण अनेक राष्ट्रात शाखा उघडून कार्य करणारी उद्योगसंस्था.
- **धुरिणत्त्व** : पुढारपण/नेतृत्त्व
- **प्रभुत्त्व** : दुसऱ्यांच्या आचारविचारावर प्रभाव टाकण्याची एखाद्याची क्षमता.
- **समाजवाद** : उत्पादन साधने समाजाच्या मालकीची असावीत असे सांगणारी विचारसरणी.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) क २) ब ३) अ ४) ड ५) अ

ब) एका वाक्यात उत्तरे

१) अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिवाद व उपभोगतावाद ही जागतिकीकरणाची प्रमुख मूल्ये आहेत.

२) व्यक्तिवाद व्यक्तिच्या हितास अधिक प्राधान्य देतो.

३) ॲडम स्मिथ हा अर्थशास्त्राचा जनक आहे.

४) उपभोक्तावाद ही एक श्रद्धा आहे. या श्रद्धेनुसार वस्तू व सेवांची खरेदी करून त्यांचा अधिकाधिक उपभोग घेणे ही गोष्ट योग्य वा चांगली मानली जाते.

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ब  २) ड  ३) ब  ४) अ  ५) ब

ब) एका वाक्यात उत्तरे

१) जेंव्हा दोन समाज किंवा समूह एकमेकाच्या संपर्कात येतात तेंव्हा त्यातील एका समूहाची सांस्कृतिक तत्त्वे दुसऱ्या समूहाकडून आत्मसात केली जातात. या प्रक्रियेस प्रसारण म्हणतात.

२) प्रक्षेपण म्हणजे

३) ज्या मानदंडाच्या किंवा निकषांच्या आधारे आपण कोणत्याही बाबतीत योग्य-अयोग्य, इष्ट-अनिष्ट, चांगले-वाईट असा भेद करतो त्यांना मूल्य असे म्हणतात.

४) समाजवादी व कल्याणकारी धोरणाचा त्याग करावयास लावीत आहे.

५) एम. एन. श्रीनिवास यांनी पाश्चिमात्त्यीकरण ही संकल्पना मांडली आहे?

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ड  २) ब  ३) ब  ४) क  ५) ड

ब) एका वाक्यात उत्तरे

१) ज्या भौतिक व बौद्धिक साधनांच्या साहाय्याने लोक आपल्या जैविक व सामाजिक गरजांची पूर्तता करतात आणि आपल्या पर्यावरणाशी अनुकूलता साधतात त्या साधनांच्या समुच्चयास लोकांची संस्कृती असे म्हणतात.

२) संस्कृतीच्या विविध भागांना एकाच प्रकारचे म्हणजे एकजिनसी स्वरूपाचे बनविणे म्हणजे सांस्कृतिक सजातियकरण होय.

३) औद्योगिक-नागर समाजाची संस्कृती ही विजातिय स्वरूपाची असते.

४) भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा प्रभाव मानवी संस्कृतीवर पडला आहे.

५) जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोन वित्तसंस्था आर्थिक जागतिकीकरणास चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावित आहेत.

## ३.६ स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१) जागतिकीकरणाच्या विविध मूल्यांची चर्चा करा.

२) जागतिकीकरणात अमेरिकेच्या मूल्यव्यवस्थेचे प्रसारण व प्रक्षेपण कसे होत आहे हे स्पष्ट करा.

३) जागतिकीकरण व सांस्कृतिक सजातियकरण यावर चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१) अनियंत्रित स्वातंत्र्य

२) व्यक्तिवाद

३) उपभोगतावाद

४) सांस्कृतिक सजातियकरण

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Appadurai, Arjun (1997) Modernity at Large : Cultural Dimensions of Globalization, Oxford University Press, New Delhi.
- Waters, Malcolm (1996) Globalization, London, Routledge
- मधुसूदन साठे : जागतिक अर्थव्यवस्था, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
- सी. पं. खेर; जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे.


❑❑❑

# घटक ४

# जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम

(Social Consequences of Globalization)

**घटक संरचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ राज्यांतर्गत असमानता

    ४.२.२ जागतिकीकरण व भारतीय धोरण

    ४.२.३ भारतीय शेती व ग्रामीण जीवन यावर जागतिकीकरणाचा प्रभाव

    ४.२.४ नागरी समाजावरील जागतिकीकरणाचा प्रभाव

४.३ सारांश

४.४ स्मरणार्थ संज्ञा

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास;

- राज्याअंतर्गत निर्माण झालेल्या असमानता समजावून घेता येतील.
- जागतिकीकरण व भारतीय धोरण या विषयाचे आकलन होईल.
- जागतिकीकरणाचा भारतीय शेती व ग्रामीण जीवन यावरील प्रभाव स्पष्ट करता येईल.
- जागतिकीकरणाचे शहरी समाजावरील परिणाम समजून घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

जागतिकीकरणाने माणसाच्या सर्वांगीण जीवन व्यापून टाकले आहे. मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच अंगानी प्रभावीत झाले आहे. सदर घटकामध्ये तुम्ही सामाजिक परिणामाची माहिती समजून घेणार आहात. दुसऱ्या भागात जागतिकीकरणाच्या संदर्भात

भारतीय धोरणाची चर्चा केली जाईल. तिसऱ्या भागात जागतिकीकरणाच्या भारतीय शेती व ग्रामीण जीवन याचा परिणाम अभ्यासणार आहोत. शेवटच्या चौथ्या भागात जागतिकीकरणाच्या संदर्भातील वादविवाद किंवा चर्चा स्पष्ट केली जाईल.

## ४.२ विषय-विवेचन

जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम समजावून घेण्यासाठी सदर घटकाचे एकूण ४ विभाग केले आहेत. पहिल्या घटकात आपण राज्यांतर्गत निर्माण झालेल्या असमानता समजून घेणार आहोत. वरील भागात आपण एकूण घटकांचा आढावा घेतलाच आहे. जागतिकीकरणाने मानवी जीवनात सर्वांग झालेले बदल व त्याची पार्श्वभूमी याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

### ४.२.१ राज्यांतर्गत निर्माण झालेल्या विषमता (Disparities among the status)

जागतिकीकरणाने राज्यांतर्गत अनेक पायाभूत बदल घडून आले. जागतिकीकरणाचे परिणाम सकारात्मक आणि नकारात्मक अशा पद्धतीने झाले. सकारात्मक असे की, उत्पादनात वाढ, रोजगार संधी, विदेशी भांडवलाचा मुक्त प्रवाह, तंत्रज्ञान प्रवेश, डीजीटल संवाद माध्यमे तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार वाढ इ. परंतु त्यांचे दुष्परिणामही तितकेच झालेले दिसून येत आहेत. काही टिकाकारांच्या मते जागतिकीकरणाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे राष्ट्र व राज्यामध्ये असमानता दिसून आली. १९९० च्या नव आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणजे देशातील अर्थव्यवस्था खुली करण्यात आली. मुक्त उदारीकरणाला चालना मिळाली परिणामी एका राज्याच्या प्रचंड विकास तर दुसऱ्या बाजूला दुसऱ्या राज्याचा अल्पविकासाची स्थिती निर्माण झाली. जागतिकीकरणाचा हा बदल जरी आर्थिकदृष्ट्या दिसत असला तरी राजकीय अस्मिता देखील तितकीच जबाबदार दिसते. ही समस्या अनेक राष्ट्रामध्ये किंबहुना संपूर्ण जगात पहावयास मिळते. राज्यांतर्गत निर्माण होणाऱ्या असमानता या सामाजिक, आर्थिक, राजकीय, तंत्रज्ञानात्मक, सांस्कृतिक आणि इतर प्रकारच्या आहेत.

प्रसिद्ध युरोपीयन समाजशास्त्रज्ञ योरॉन थरबोन यांच्या मते ''जागतिकीकरणाच्या जणू लाटा आहेत.'' या लाटा अनेक शतके येत राहिल्या आहेत. योरॉन थरबोन यांच्या मते जेव्हा एकादा विचार सामाजिक, तात्त्विक, राजकीय, आर्थिक बदल हा देशाच्या राष्ट्राच्या खंडाच्या सीमा ओलांडून खूप जगभर पसरतो त्याचा परिणाम हा दीर्घकालीन, सर्वव्यापी असा असतो. त्याला जागतिकीकरण असे म्हणतात. जागतिकीकरण वाढत्या असमानतेशी जोडले गेले आहे. परंतु बहुतेक वेळा भिन्न ध्रुवीकरण केले जाते.

राज्यांतर्गत असमानता समजावून घेताना सर्व प्रथम जागतिकीकरणाविषयीच्या पार्श्वभूमीची ओळख असणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत १९९० च्या दरम्यान गतिविविध अनेक बदल झाले या कालावधीत अर्थव्यवस्था ही संकटात होती. या दरम्यान परदेशी कर्जाचा बोजा भारतीय अर्थव्यवस्थेवर होता. जीवनावश्यक वस्तूची किंमत वाढली होती. भाववाढ १७ टक्क्यांपर्यंत वाढली होती. आर्थिक संकट १९८० च्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या अकार्यक्षम व्यवस्थापनाचा हा परिणाम होता. त्याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक दोष यामुळे अर्थव्यवस्थेत

अपेक्षित वाढ होत नव्हती. या संकटातून वाचण्यासाठी भारत सरकारने खाजगी क्षेत्रातील बंधने कमी करून अर्थव्यवस्था खुली करावी, आंतरराष्ट्रीय उद्योगाना व्यापारावरील निर्बंध कमी करावेत या अटीवर जागतिक बँक (आंतरराष्ट्रीय पुनर्रचना व विकास बँक), (आय.आर.डी.ए.) आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF- International Monetary Fund) यांच्याकडून ७ अब्ज कर्ज घेतले होते. अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आनण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (एल.पी.जी.) हे धोरण २४ जुलै १९९१ नंतर सुरू करण्यात आले. हा कालावधी १९९२ ते १९९७ साली पाचवर्षासाठी घोषित करण्यात आला. आर्थिक सुधारणाच्या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण हे धोरण एल.पी.जी. नावाने ओळखले जाते. या सर्वांच्या पाठिमागे अर्थव्यवस्था जलदगतिने विकसीत बनवणे हा मूळ हेतू या धोरणाचा होता. उदारीकरणात परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान आकर्षित करणे, देशातील कर्जाचे प्रमाण कमी करणे, सार्वजनिक क्षेत्राची तसेच सरकारची अर्थव्यवस्थेतील भूमिका कमी करणे, औद्योगिक उत्पादनाची अंतर्गत स्पर्धा वाढवणे यानंतर खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची मालकी व नियंत्रण किंवा खाजगी कंपन्यानी हस्तांतरण करणे.

खाजगीकरणाची पुढील लक्षणे होती.

१) निर्गुंतवणूक धोरण स्विकार : जे उद्योग तोट्यात चालले आहेत त्या उद्योगात सरकारने निर्गुंतवणूक धोरण स्विकारणे म्हणजे त्या उद्योगातून सरकारची हिस्सेदारी कमी केली आहे.

२) खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीत वृद्धी

३) सार्वजनिक क्षेत्रातील आकूंचन

४) खाजगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासाला व विस्ताराला प्रोत्साहन.

५) कर्जाचे भागामध्ये (शेअर) रूपांतर करण्याची गरज. जागतिकीकरण हे उदारीकरण आणि खाजगीकरण धोरणाचे परिणाम आहे. जागतिकीकरण जागतिक अर्थव्यवस्थेचे एकीकरण समजले जाते. जागतिकीकरण हे परस्परावलंबीत आणि एकात्मतेच्या दिशेने जग बदलण्याच्या उद्देशानेच विविध धोरणाचा परिणाम आहे. जागतिकीकरणाने समाजामध्ये बरेच परिणाम घडून आले. देशातील व्यापाराचे अडथळे दूर झाले. सेवाक्षेत्र, औद्योगिक उत्पन्न वाढले. परकीय गुंतवणूकीमध्ये वाढ झाली. कुशल रोजगारीमध्ये वाढ झाली. या निर्माण झालेल्या नवीन आर्थिक धोरणाने (New Economic Policy) तंत्रज्ञानांतही वाढ झाली. यामुळे भारतीय नागरीकाच्या आर्थिक उत्पादनात वाढ झाली. परंतु लिंगभाव, क्षेत्रीयता, सामाजिक, धार्मिक भेदभाव, कुपोषण, दारीद्र्य, शेतकरी आत्महत्त्या, महिला लिंगभाव यामध्ये बदल झाला नाही.

जागतिकीकरणाचा फायदा शहरी मध्यम वर्गाला झाला. परंतु दलित मुस्लीम, महिला, आदिम यांना याचा लाभ झाला नाही. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत देशातील राज्ये दोन स्तरावर विभागली गेली ती म्हणजे विकसीत आणि अविकसीत. विकसीत राज्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि

केरळ तर अविकसीत राज्यामध्ये ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्याचा विकास खुंटला, ही असमानता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये दिसून आली. राज्यांतर्गत असमानतेत काही राज्याचे स्थूल उत्पन्न ही वाढले. यामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, तमीळनाडू इत्यादी. जागतिकीकरणाच्या ओघात सिंमातता ही वाढीस लागली यामध्ये रोजगार, शिक्षणाचा अभाव, अज्ञान याचा समावेश होतो. अल्पविकसीत राज्ये विकसीत राज्यात रोजगारासाठीचे स्थलांतराची प्रक्रियेत वाढ होऊ लागली. तसेच नवीन तंत्रज्ञानाने कुशल अकुशल वर्ग निर्माण झाले. तंत्रज्ञानाचा विकास देशी उद्योगाना मारक ठरला. परिणाम अकुशल बेरोजगारीत वाढ झाली. जागतिकीकरणानंतर भारतीय राज्यांतर्गत झालेले बदल लक्षणीय आहेत आणि म्हणूनच समाजातील सामाजिक मुद्दे कमी-अधिक प्रमाणात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी जोडलेले आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गति प्राप्त झाली असली तरी विकसीत आणि अविकसीत अशी दरी निर्माण झाली आहे. देशाच्या एकूण महसूलामध्ये एकट्या महाराष्ट्राचा महसूल ४० टक्के आहे. तर औद्योगिक उत्पन्न १५% आहे. तरीही महाराष्ट्रात बेरोजगारीचे, कुपोषण, शेतकरी आत्महत्त्येचे प्रमाण कमी नाही. काही विकसीत राज्यामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या मोठी भांडवल गुंतवणूक करीत आहेत. खाजगीकरण, तंत्रज्ञानात्मक क्रांती, बहाराष्ट्रीय कंपन्या, राष्ट्र-राज्याचा ऱ्हास, कल्याणकारी राज्याचा ऱ्हास, बाजारपेठांचे सार्वभौमत्त्व,ऊ बहुसांस्कृतिक वाद असेही प्रवाह निर्माण झाले आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक राज्यांतर्गत सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसतो. कुटुंबव्यवस्था, विवाह, स्त्री-पुरुष संबंध, जाती, आदिम, भाषा इ. सामाजिक घटकावर मोठा प्रभाव पडत आहे. यातून नवसमाज आकार घेत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आणि माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटातून राष्ट्र-राज्याच्या सीमा अंधुक होऊन राष्ट्र व राज्यांचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे.

जागतिकीकरणाने समाजात अमूलाग्र बदल घडून आले. ते सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पद्धतीने बदल झाले. जागतिकीकरणाने खाजगीकरण, उदारीकरणाला प्रोत्साहन मिळाले. त्याचबरोबर प्रचंड औद्योगिक स्पर्धा निर्माण झाली. विकसीत राज्याकडे अल्पविकसीत राज्यातील कामगाराचे स्थलांतर होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या. जागतिकीकरणाने राज्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक त्याचबरोबर धार्मिक असमानता वाढल्या. त्यापलिकडे सिमांत समुह, महिला, आदिम, मुस्लीम यांच्या दर्जात बदल झाला नाही. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत सिमांत समुहात असुरक्षितता वाढीस लागली आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) जागतिकीकरणाचे कोणते सकारात्मक बदल आहेत.

अ) उत्पादनात वाढ ब) रोजगारात वाढ

क) तंत्रज्ञान प्रवेश व डिजीटल संवाद  ड) वरीलपैकी सर्व

२) भारतामध्ये जागतिकीकरणाची सुरवात केव्हापासून झाली.

अ) १९९०  ब) १९८० क) १९९१  ड) १९९२

३) विकसीत राज्ये कोणती.

अ) महाराष्ट्र व गुजरात  ब) कर्नाटक

क) केरळ  ड) वरीलपैकी सर्व

४) अविकसीत राज्ये कोणती.

अ) ओरसा व बिहार  ब) उत्तरप्रदेश

क) मध्यप्रदेश  ड) वरीलपैकी सर्व

५) राज्यांतर्गत कोणत्या असमानता दिसून आल्या.

अ) दारीद्र्य व कुपोषण  ब) बेरोजगारी

क) अज्ञान व भेदाभेद  ड) वरीलपैकी सर्व

६) N.E.P. चे पूर्ण रूप कोणते.

अ) National Economy Policy  ब) National Economic Polity

क) National Ecological Project  ड) National Ecological Policy

## **४.२.२ जागतिकीकरण आणि भारतीय धोरण** (Globalization and Indian Policy)

जागतिकीकरणामुळे एखाद्या राष्ट्र-राज्यांतर्गत निर्माण झालेली विषमता तसेच विविध राष्ट्र-राज्यांच्यामध्ये निर्माण झालेली विषमता अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरणाच्या संदर्भातील भारताचे धोरण कसे आहे हे समजावून घेणार आहोत.

१९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण जाहीर करून या धोरणात जागतिकीकरणाचा स्वीकार केला. म्हणजे भारतात १९९१ पासून जागतिकीकरण सुरू झाले असे स्थुलमानाने मानले जाते. तथापि, काही अभ्यासक म्हणतात त्याप्रमाणे जागतिकीकरण ही प्रक्रिया पूर्णतः नवीन नाही. ब्रिटिश राजवटीतच पाश्चिमात्त्यीकरण (Westernization) आधुनिकीकरण (Modernization) यांच्यारूपाने जागतिकीकरणाची सुरूवात झालेली होती. जागतिकीकरणाच्या संदर्भात भारताचे धोरण कसे आहे हे समजावून घेण्यासाठी प्रथम जागतिकीकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात समजावून घेऊ.

**जागतिकीकरणाची पार्श्वभूमी** - इ.स. १४५३ मध्ये तुर्की लोकांनी कॉन्स्टंन्टिनोपल शहराचा ताबा घेऊन युरोपातून पूर्वेकडील देशात जाणारा भूमार्ग बंद केला. त्यामुळे युरोपातील राज्यकर्ते व व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील देशांकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध घेण्याचे काम खलांशावर सोपविले.

यातूनच पोतुर्गीज खलाशी वास्को-द-गामाने भारताकडे जाण्याचा जलमार्ग १४९८ मध्ये शोधून काढला. त्यामुळे व्यापाराच्या निमित्ताने पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच हे युरोपियन लोक भारतात आले. भारतातील व्यापार व प्रदेश यावर वर्चस्व मिळविण्यासाठी त्यांच्यात संघर्ष झाला व त्यामध्ये इंग्रज यशस्वी झाले व पुढे इंग्रजानी भारतावर राजकीय सत्ता प्रस्थापित केली व ही सत्ता १९४७ पर्यंत टिकून राहिली. ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात युरोपियन व्यापार कंपन्या, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, भांडवल, वेगवेगळया संस्था, संघटना आल्या. भारतीय बाजारपेठेत परकीय वस्तूंचा शिरकाव झाला. युरोपियन राष्ट्रांशी भारताची आयात-निर्यात होऊ लागली. भारतात मोठमोठे उद्योगधंदे सुरू होऊन औद्योगिकीकरणास प्रांरभ झाला. भारतीयांनी युरोपियन आचारविचार, सवयी, श्रध्दा, मूल्ये, कला व क्रीडा प्रकार, मनोरंजन साधने इत्यादींचे अनुकरण करण्यास सुरूवात केली. या प्रक्रियेस युरोपिकरण असे म्हटले गेले. पुढे युरोपियन राष्ट्रांबरोबरच अमेरिका, आस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादी पश्चिमात्त्य राष्ट्रांशीही भारताचे संबंध प्रस्थापित होऊन भारतीयांनी पाश्चिमात्त्यांचेही अनुकरण सुरू केले. यास पाश्चिमात्त्यीकरण असे म्हटले गेले. पुढे भारतीयांनी जपान, तुर्कस्थान, रशिया या देशांचेही अनुकरण सुरू केले. यातूनच परकीय विकसित राष्ट्रांच्या अनुकरणास आधुनिकीकरण ही व्यापक संज्ञा दिली गेली व युरोपिकरण व पाश्चिमात्त्यीकरण या संज्ञा मागे पडल्या. युरोपिकरण, पाश्चिमात्त्यीकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांतर्गत भारताचे जगातील अन्य देशांशी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होऊन भारत जागतिक व्यवस्थेशी जोडला गेला. १९९१ नंतर भारताने आर्थिक पुनर्ररचनेचा कार्यक्रम जाहीर करून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक व्यवस्थेशी जोडली. या प्रक्रियेसच आता जागतिकरण म्हटले गेले. थोडक्यात जागतिकीकरण हे पूर्वीच्या युरोपिकरण, पाश्चिमात्त्यीकरण व आधुनिकीकरण या प्रक्रियांचे नवे व विस्तारीत रूप आहे असे म्हणता येईल.

**जागतिकीकरणाचे धोरण भारताने का स्वीकारले?**

जागतिकीकरणाची पार्श्वभूमी पाहिल्यानंतर आता आपण भारतास १९९१ मध्ये जागतिकीकरणाचे धोरण का स्वीकारावे लागले हे थोडक्यात समजावून घेऊ.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. आपला सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी भारताने भांडवलशाही व समाजवादी या दोन्ही प्रकारच्या अर्थव्यवस्थेतील उत्तम वैशिष्ट्यांचा समन्वय साधणाऱ्या मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. नियोजनाचा स्वीकार करून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले. संपूर्ण समाजाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे उद्योगधंदे राखीव ठेऊन ते सार्वजनिक (सरकारी) क्षेत्रात उभारले. तसेच कांही उद्योगधंदे खाजगी क्षेत्रात उभे करण्यास परवानगी दिली. मात्र खाजगी आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे व त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार सरकारला दिले. १९५१ मध्ये केंद्रसरकाच्या मालकीचे केवळ ५ उद्योग होते. त्यांची संख्या वाढत जाऊन १९९१ मध्ये २४६ वर पोहचली. १९ महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवले. तथापि, १९५० ते १९९० या ४० वर्षात अकार्यक्षमता, लालफित, भ्रष्टाचार, गैरव्यवस्थापन, नोकरशाहीचे वर्चस्व, राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप, सरकारची नियंत्रणे, परवाना (लायसन्स) पध्दती इत्यादींमुळे फायदा होण्याऐवजी तोटाच झाला. बहुसंख्य सार्वजनिक उद्योग तोट्यात गेले. दारिद्र्य, बेकारी, महागाई वाढत गेली. आयात वाढली मात्र निर्यात कमीच राहिली. १९८० ते १९९० या दशकात मोठीच चलनवाढ झाली. परकीय गंगाजळी (चलनसाठा) घटत गेली.

अन्य आर्थिक अडचणीही निर्माण झाल्या. यातूनच १९९१ मध्ये भारतात मोठे आर्थिक संकट (Economic Crisis) उदभवले. या संकटाचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

- मे १९९१ पासून भारताच्या आर्थिक विकासाचा दर ऋणात्मक झाला.
- चलनवाढीचा वार्षिक दर १७ % इतका झाला.
- विदेशी व्यवहारकोषाच्या चालू खात्यावरील तूट १९९०-९१ मध्ये २९० कोटी डॉलर्स इतकी झाली.
- भारतातील राजकीय अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची आर्थिक पत घसरून विदेशात व्यापारी कर्ज उभारणे अवघड झाले.
- १९८९ ते १९९१ या काळात अनिवासी भारतीयांच्या भारतीय बँकेतील ठेवी कमी होत गेल्या.
- भारताचा परकीय चलनसाठा कमी होत गेला. १९८७-१९८८ मध्ये ५०० ते ६०० कोटी डॉलर्स असलेला हा चलनसाठा कमी होत जाऊन तो फक्त ११० कोटी डॉलर्स (म्हणजे १५ दिवसांच्या आयातीचा खर्च भागविण्याइतका) इतका झाला.

अशी या संकटग्रस्त स्थितीत २१ जून १९९१ रोजी पी.व्ही. नरसिंहराव सरकार सत्तेवर आले. घटलेला चलनसाठा वाढविण्यासाठी या सरकारने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधी या आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थाकडे कर्ज मागितले. कर्ज देताना या संस्थांनी भारताने आपल्या आर्थिक धोरणात पुढील मूलभूत बदल करावेत अशी अट घातली.

- रुपयाचे अवमूल्यन करावे.
- राजकोषीय तूटीत कपात करावी.
- परकीय भांडवलास भारतात मुक्त प्रवेश द्यावा.
- विविध अनुदानात कपात करावी इत्यादी.

या अटी मान्य करून सरकारने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर करून त्यामध्ये उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांचा स्वीकार केला आणि भारतात जागतिकीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली.

**नवीन आर्थिक धोरणाचे स्वरूप –**

खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण संदर्भातील १९९१ मध्ये जाहीर केलेले नवीन आर्थिक धोरण अत्यांत विस्तृत आहे. त्यामध्ये पुढील प्रमुख तरतुदी केलेल्या आहेत.

अ) **नियंत्रण व परवानामुक्त औद्योगिक धोरण –** नवीन आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून २४ जुलै १९९१ रोजी नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले व त्यामध्ये पुढील तरतुदी केल्या.

१) पूर्वी नवीन उद्योग उभारणे, जुन्या उद्योगाचा विस्तार करणे, यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागे. शिवाय उद्योगावर सरकारची अनेक नियंत्रणे होती. नवीन औद्योगिक धोरणात ही परवाना पध्दती व सरकारी नियंत्रणे काढून टाकली.

२) मक्तेदारी कायदा शिथिल करण्यात आला. १०० कोटी रुपयापेक्षा अधिक गुंतवणूक असणारा उद्योग उभारण्यासाठी, उद्योगाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी सरकारची परवानगी घ्यावी लागे. नवीन धोरणात ही परवानगी पध्दत रद्द केली.

३) परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान यांना भारतात मुक्त प्रवेश दिला. ३४ उद्योगात ५१% पर्यंत परकीय गुंतवणूक करण्यास परवानगी दिली. या गुंतवणूकीतून कच्चा माल व यंत्रसामग्री आयात करण्यासाठी सरकारची परवानगी घेण्याची पध्दती रद्द केली. तसेच परकीय तंत्रज्ञान आयात करण्याचे करार करण्याची परवानगी उद्योगांना दिली.

४) उद्योगाचे स्थान निश्चित करण्यावर असलेले सरकारी निर्बंध काढून टाकले. १० लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या शहरात उद्योग उभारण्यासाठी तसेच १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरापासून २५ कि.मी. पुढील अंतराच्या ठिकाणी उद्योग उभारण्यासाठी सरकारची परवानगी घेण्याची अटही रद्द केली.

५) सार्वजनिक उद्योगांचे महत्त्व कमी केले १९५६ च्या औद्योगिक धोरणात १९ उद्योग सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवले होते. नवीन धोरणात प्रथम ८ उद्योग (अणुऊर्जा, रेल्वे, खनीज तेल, कोळसा, लिग्नाईट, लोखंड, तांब्र, झिंक) सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवले. पुढे आणखीन २ उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रातून वगळले. म्हणजे फक्त ६ उद्योग सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेऊन उरलेले सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले केले. म्हणजेच खाजगीकरणास चालना दिली.

६) टप्प्याटप्प्याची उत्पादन पध्दती रद्द केली. अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात उत्पादन किती, केंव्हा व कसे करावे इत्यादीवर सरकारची अनेक बंधने होती. ही बंधने नवीन धोरणात काढून टाकली.

७) लघु व कुटिरोद्योगांना उत्तेजन दिले. लघुउद्योगातील गुंतवणूक मर्यादा ३५ लाख रुपयांवरून ६० लाख रुपयापर्यंत वाढविली. पूरक व साहाय्यक उद्योगातील गुंतवणूक मर्यादा ७५ लाख रुपयार्पंत वाढविली तर अतिलहान (Tiny) उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपयांपर्यत वाढविली.

८) समतोल प्रादेशिक विकास घडवून आणण्याचे तत्त्व स्वीकारले. त्यानुसार मागास भागातील उद्योगांना वीज, पाणी, वाहतूक, दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे धोरण स्वीकारले.

**ब) मुक्त परकीय व्यापार व विनिमय दरात बदल–** नवीन आर्थिक धोरणात पुढील तरतुदी केल्या.

१) आयात–निर्यातीवरील निर्बंध शिथील केले.

२) आयात–निर्यातीवरील जकात करात मोठी कपात केली.

३) मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारले.

४) रुपयाचे टप्प्याटप्प्याने अवमूल्यन करून रुपया पूर्णतः परिवर्तनीय केला.

५) सोन्याच्या आयातीवरील निर्बंध उठविले.

६) परकीय चलनाच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवणाऱ्या FERA (Foreign Exchange Regulation Act) कायद्यात बदल करून कमीत कमी नियंत्रणे असणारा FERA (Foreign Exchange Management Act) हा कायदा संमत केला.

**क) राजकोषीय धोरणात बदल –** १९८०-९० या दशकात सरकारी खर्चात वाढ व महसूलात घट होत गेल्याने वित्तीय तूट सतत वाढत गेली. त्यामुळे पुढील तरतुदी केल्या.

१) सरकारी खर्चात कपात करण्याच्या अनेक योजना आखल्या. उदा. संरक्षण खर्चात, विविध अनुदानात शक्य तेवढी कपात करणे, सरकारी उद्योगांना दिली जाणारी मदत व सतलती कमी करणे इ.

२) सरकारचा महसूल वाढविण्यासाठी कांही उपाय योजले. उदा. प्राप्तीकरात सुधारणा, करवसुलीत सुधारणा, घसारा निधीत सवलत इ.

**ड) वित्तीय क्षेत्रात सुधारणा** - बँका व वित्तीय संस्थांची घसरलेली कार्यक्षमता व लाभता वाढविण्यासाठी पुढील सुधारणा केल्या.

१) स्पर्धाधिष्ठित कार्यक्षमतेचे तत्त्व स्वीकारले.

२) बँका व वित्तसंस्थांना नफा मिळविण्याचे स्वातंत्र्य दिले.

३) त्यांना स्पर्धा व कार्यक्षमता याबाबतचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले.

४) त्यांच्या कार्यपध्दतीत लवचिकता आणण्याची परवानगी दिली.

**ई) जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्त्व –**

१) वरील धोरणाच्या अनुषंगाने पुढे भारताने १५ एप्रिल १९९४ रोजी गॅट करारावर सही केली व जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्त्व स्वीकारले.

२) दळणवळण, पर्यटन, व्यापारी व पायाभूत सेवा उद्योग इत्यादीतही परकीय गुंतवणूकीस मान्यता दिली.

३) भारतात कार्यरत असणाऱ्या परकीय कंपन्यांना स्वतःचे नाव व ट्रेडमार्क वापरण्याची परवानगी दिली.

**फ) २००१ चे औद्योगिक धोरण** - १९९१ मध्ये आर्थिक सुधारणांना अधिक गती देण्यासाठी सरकारने २००१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करून त्यामध्ये पुढील तरतुदी केल्या.

१) विदेशी गुंतवणूकीस उत्तेजन दिले. सर्व प्रकारच्या उद्योगात आपोआप मान्यता मिळण्याच्या योजनेनुसार विदेशी गुंतवणूक करता येईल. विदेशी गुंतवणूकीबाबतचा निर्णय घेण्याचा कालावधी ६ आठवड्यावरून ४ आठवडे केला.

२) विदेशी गुंतवणूकीचे उदारीकरण केले. तेलशुध्दीकरण क्षेत्रात १००%, टेलिकॉम क्षेत्रात कांही अटीवर १००%, विमाक्षेत्रात २६% पर्यंत तसेच माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातही विदेशी गुंतवणूकीस परवानगी दिली.

३) प्रदूषण न करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर, सॉफ्टवेअर, छपाई इ. उद्योग १० लाखपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांपासून २५ कि.मी. अंतराच्या आत सुरू करण्यास परवानगी दिली.

४) सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक मोकळी करण्याचे धोरण म्हणजेच निर्निवेशाचे धोरण (Policy of disinvestment) चालू ठेवले.

५) लघु व कुटिराद्योगांना चालना देण्याचे धोरण स्वीकारले. होजिअरी व तत्सम उद्योगांसाठीची गुंतवणूक मर्यादा १ कोटी रुपयावरून ५ कोटी रुपयार्पंत वाढविली. तसेच खेळणी, पादत्राणे, कातडी वस्तू इ. १४ वस्तूचे उत्पादन लघुउद्योगांसाठी राखून ठेवले. लघुउद्योगांना बाजारविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना सुरू केली.

६) आजारी उद्योग कंपनी कायदा मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला. कंपनी कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला.

७) पेट्रोलियम, खते, साखर, औषधे इत्यादींच्या बाबतीत प्रशासित किंमतीचे धोरण स्वीकारले.

अशाप्रकारे भारताने जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या तीन प्रक्रियांचा स्वीकार करण्याचे धोरण राबविलेले आहे.

★ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : क्रमांक २**

**अ) बहुपर्यायी प्रश्न**

१) कोणत्या साली भारताने नवीन आर्थिक धोरण जाहीर केले?

अ) ११९०   ब) १९९१   क) १९९२   ड) १९९३

२) ११९१ मध्ये भारतास कर्ज देताना जागतिक बँकेने कोणती अट घातली होती?

अ) रुपयाचे अवमूल्यन करणे   ब) परकीय भांडवलास मुक्त प्रवेश देणे

क) विविध अनुदानात कपात करणे   ड) वरील सर्व

३) सद्या किती उद्योग सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव आहेत?

अ) ६   ब) ८   क) १७   ड) यापैकी एकही नाही

४) भारताने गॅट करारावर कोणत्या साली सही केली?

अ) ११९०   ब) १९९१   क) १९९२   ड) १९९४

५) कोणत्या सरकारने जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले?

अ) राजीव गांधी   ब) नरसिंहराव   क) बाजपेयी   ड) मनमोहनसिंग

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) भारताकडे जाणारा जलमार्ग कोणी शोधून काढला?

२) १९९१ मध्ये केंद्र सरकारच्या मालकीचे किती उद्योग होते?

३) कोणत्या साली भारतात मोठे आर्थिक संकट उद्‌भवले?

४) आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांची नावे सांगा.

५) FERA चे पूर्ण रूप द्या.

### ४.२.३ भारतीय शेती आणि ग्रामीण समाज यावरील जागतिकीकरणाचा प्रभाव (Impact of globalization on Indian agriculture and rural society)

जागतिकीकरण आणि भारतीय धोरण अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीरणाचा भारतीय शेतीवर किंवा शेती क्षेत्रावर व भारतातील ग्रामीण समाजावर काय प्रभाव पडला हे समजावून घेणार आहात.

१९९१ मध्ये उद्‌भवलेल्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वित्तीय संस्थांकडे कर्ज मागितले. हे कर्ज देताना या संस्थांनी भारतावर उदारीकरणाचे, खाजगीकरणाचे व जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारण्याची अट घातली. या अटीनुसार तत्कालीन पी.व्ही. नरसिंहराव सरकारने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर करून त्यामध्ये या तीन प्रक्रियांचा स्वीकार केला. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. परिणामी, भारतात जागतिकीकरणाचे जोरदार वारे वाहू लागले. भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होऊन आज २४ वर्षे झाली आहेत. या कालावधीत जागतिकीकरणाचा भारतीय समाजाच्या सर्व क्षेत्रावर मोठा प्रभाव आहे. या ठिकाणी तुम्ही भारतातील शेती व ग्रामीण समाज यावर जागतिकीकरणाचा काय प्रभाव पडला आहे हे समजावून घेणार आहात.

**अ) शेतीवरील प्रभाव** (Impact of globalization on agriculture)

**शेतीचे महत्त्व–** जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील प्रभाव समजावून घेताना भारतात शेतीस असलेले महत्त्व थोडक्यात समजावून घेऊ. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान म्हणजेच शेतीप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. कारण ती प्रामुख्याने शेती व्यवसायावर आधारलेली आहे. कारण सुमारे ६५% लोकांना आजही कृषी क्षेत्रात रोजगार मिळतो आहे. ग्रामीण भागातील बिगरशेती व्यावसायिकांचे (बलुतेदारांचे) व्यवसायही शेतीशीच निगडीत आहेत. शिवाय पशुपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, मधुमक्षिकापालन, रेशमी किड्यांची पैदास, दुग्धव्यवसाय, विणकाम इत्यादी जोडधंदे हे शेतीवरच आधारलेले आहेत. एवढेच नव्हे तर साखर कारखाने, सूत व तेल गिरण्या, फळप्रक्रिया उद्योग, चर्मोद्योग, कागद उद्योग, चहा, रबर, कॉफी इत्यादी उद्योग हे कच्च्या मालासाठी शेतीवरच अवलंबून आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा आजही सुमारे १४ ते १५% च्या आसपास आहे. भारतातील एकूण उत्पादनापैकी सुमारे ५०% उत्पादन कृषी उद्योगातून होते. देशाच्या निर्यातील प्रमुख वस्तू ह्या कृषी उत्पादने (अन्नधान्य, चहा, कॉफी, रबर, तंबाखू इ.) असून त्यांच्याद्वारे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर मिळते. रस्ते व लोक मार्गावरून होणाऱ्या वाहतुकीत शेतीमालाचा मोठा वाटा आहे. केंद्र सरकार, राज्यसरकार, ग्रामीण स्थानिक स्वशासनसंस्था (पंचायत राज्य) यांना शेतसारा, जलसिंचन कर, तंबाखुवरील अबकारी कर, इत्यादीद्वारे मोठे उत्पन्न मिळते. एखाद्या वर्षी शेती हंगाम बुडाल्यास सरकारचे उत्पन्न घटते, बाजारातील उलाढाल मंदावते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की शेती व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अशा या शेतीवर जागतिकीकरणाचा इष्ट तसेच अनिष्ट प्रभाव पडलेला आहे. येथे आपण प्रथम इष्ट व नंतर अनिष्ट प्रभाव अभ्यासणारे आहोत.

**इष्ट प्रभाव**

१) **कृषी उद्योगास चालना** – जागतिकीकरण व उदारीकरणामुळे सहा उद्योग सोडून बाकीचे सर्व उद्योग सुरू करण्यास खाजगी उद्योजकांना व परकीय कंपन्यांना परवानगी मिळाली. त्यामुळे अनेक भारतीय उद्योजकांनी तसेच कांही परकीय कंपन्यांनी (उदा. पेप्सी, कोका कोला, आयटीसी, पिझ्झा, हच इत्यादी) शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारले. कुरकुरे, चिप्स, सॉस, कोल्ड ड्रिंक्स, फ्रुट ज्यूस, आईस्क्रीम इत्यादी खाद्यपदार्थांच्या निर्मितीचे कारखाने काढले. या खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग वाहतूक व विक्री करणे यासारख्या स्वयंरोजगाराचे प्रमाणे वाढले. त्यामुळे रोजगार वृद्धी होऊन लोकांना काम मिळू लागले. कृषी उद्योगास चालना मिळाल्याने बटाटा, टोमॅटो, फळे यांच्या उत्पादनात वाढ होण्यासही चालना मिळाली आहे.

२) **कृषी मालाच्या निर्यातीत वाढ** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत निर्यातीवरील अनावश्यक व जाचक निर्बंध कमी किंवा शिथील करण्यात आले. शिवाय निर्यातीचे दर ही कमी केले. त्यामुळे भारतातून इतर राष्ट्रांना गहू, तांदूळ, कापूस, चहा, कॉफी, रबर, ताग, तंबाखू, फळे, फुले, भाजीपाला, प्रक्रियायुक्त डबाबंद खाद्यपदार्थ इत्यादींची मोठ्या प्रमाणावर निर्यात होऊ लागली आहे. त्यामुळे भारताची परकीय गंगाजळी (चलनसाठा) वाढण्यास मदत झाली आहे. भारतात सद्या अन्नधान्याचे शिलकी उत्पादन होते. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेपेक्षा भारतात अन्नधान्याच्या किंमतीही बऱ्याच कमी आहेत. त्यामुळे जागतिकीरणाचा फायदा उठवून भारत शेतीमालाची निर्यात वाढवू शकतो. थोडक्यात जागतिकीकरणामुळे भारतास कृषीमालाची निर्यात वाढविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

३) **शेती उद्योगास उर्जितावस्था** – भारतात शेतीमालावर आधारलेली अनेक उद्योग उदा. साखर कारखाने, सूत, तेल, ताग इत्यादींच्या गिरण्या, खाद्यपदार्थांवरील प्रक्रिया उद्योग इत्यादी उद्योगधंदे हे सहकारी क्षेत्रात उभारलेले आहेत. तथापि, सहकार क्षेत्रात अनेक अपप्रवृत्ती (उदा. गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार, वशिलेबाजी, लाचलुचपत, दप्तरदिरंगाई, अकार्यक्षमता, स्वार्थ, सुसहित संबंध, घाणेरडे राजकारण इत्यादी) निर्माण झाल्याने अनेक उद्योगधंदे एकतर बंद किंवा आजारी पडले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत खाजगीकरणाचे धोरण भारताने स्वीकारले. त्यामुळे सहकारी क्षेत्रातील हे आजारी वा बंद पडलेले उद्योग खाजगी उद्योजकांना चालविण्यासाठी देण्यात आले. त्यामुळे अशा उद्योगधंद्यांना उर्जितावस्था प्राप्त झाली आहे. शिवाय सहकारी क्षेत्रास द्यावे लागणारे अनुदान बंद झाल्याने सरकारचा खर्चदेखील वाचला आहे.

४) **संविदा शेती** (Contract Farming) – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतात संविदा शेतीचा प्रकार सुरू झाला आहे. शेतकरी व शेती मालाचे खरेदीदार यांच्यातील करारानुसार शेती उत्पादन व त्याचे विपणन (Marketing) करणे म्हणजे संविदा शेती होय. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक उद्योगांनी किंवा कंपन्यांनी शेतकऱ्यांशी करार करणे सुरू केले. या कंपन्या शेतकऱ्यांना कृषी आदाने, जमीन लागवडीयोग्य बनविणे, तांत्रिक सल्ला पुरविणे, वाहतूक सोयी उपलब्ध करून

देणे इत्यादी प्रकारचे साहाय्य पुरवितात. संविदा शेतीमुळे शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेच्या सोयी चांगल्या पध्दतीने उपलब्ध होत आहेत. तसेच अपरंपरागत पिकांना खात्रीची बाजारपेठ व खात्रीची किंमत मिळत आहे. त्यामुळे शेतीतील जोखीम कमी होण्यास मदत होत आहे. शेतीतील गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळण्याची हमी मिळत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे संविदा शेतीचे फायदे भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध होऊ लागले आहेत.

**अनिष्ट प्रभाव**

**१) निर्यातीवर मर्यादा–** जागतिकीकरणामुळे भारतातून शेतीमालाची निर्यात वाढू शकते हे खरे असले तरी निर्यात वाढविण्याच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. पहिला अडथळा असा की कांही परकीय राष्ट्रे ही भारताच्या निर्यातीच्या मार्गात अडथळे उभा करीत आहेत. उदा. भारतातील मच्छिमार (कोळी) हे मासे पकडताना कासव निवारक सामग्रीचा वापर करीत नाहीत म्हणून अमेरिकेने भारतीय कोळंबीच्या आयातीवर बंदी घातली. आरोग्यविषयक गोष्टींची काळजी घेतली जात नाही म्हणून युरोपियन संघाने भारतातून होणारी माशांची निर्यात थांबविली. अधिक कीटकनाशके फवारली जातात म्हणून मध्यपूर्वेतील राष्ट्रांनी द्राक्ष, आंबे, संत्री इत्यादींची निर्यात रोखून धरली. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. दुसरा अडथळा म्हणजे भारतीय शेतीमालाची गुणवत्ता देखील आंतरराष्ट्रीय मानकांच्या (International Standards) कसोटीवर उतरत नाही. त्यामुळे अनेक विकसित राष्ट्रे भारतीय शेतीमाल नाकारतात. तिसरा अडथळा म्हणजे भारतात वाहतूक, सुसज्ज बंदरे, साठवणूक, पॅकेजिंग इत्यादीबाबतच्या प्रगत सोयीसुविधांची मोठी कमतरता आहे. त्यामुळे निर्यातीवर मर्यादा पडतात. त्यामुळे भारतात शेतीमालाचे उत्पादन वाढले तरी त्याची निर्यात करून फायदा मिळविणे शक्य होत नाही.

**२) सामान्य शेतकरी वंचित** – जागतिकीकरणाच्या फायद्यापासून भारतातील सामान्य शेतकरी वंचित राहीला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतीमालाचे उत्पादन वाढवून त्याची निर्यात करून फायदा मिळविण्याची संधी भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध झाली आहे हे खरे. तथापि, या संधीचा फायदा करून घेणे केवळ मूठभर बड्या बागायतदार शेतकऱ्यांनाच शक्य होत आहे. बहुसंख्य शेतकरी हे अल्पभूधारक, गरीब, अडाणी, दैववादी व परंपरागत तंत्राने शेती करणारे असे आहेत. त्यामुळे त्यांची शेती नेहमीच तोट्यात असते. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे बीबियाणाचे पेटंट गेले आहे. तसेच खते व कीटकनाशकावर मिळणारे सरकारी अनुदान कमी झाले आहे. तसेच शेतमजुरीचे दरही प्रचंड वाढले आहेत. या विविध कारणांमुळे शेतीतील उत्पादन खर्चही वाढला आहे. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना जागतिकीकरणाद्वारे उपलब्ध झालेल्या संधींचा लाभ उठविणे शक्य होत नाही. त्यामुळे आपल्या निर्वाहविषयक व व्यवसायविषयक गरजा भागविण्यासाठी अनेक शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला आहे. कर्जबाजारीपणाच्या समस्येतून सुटका होण्यासाठी अनेक शेतकरी आत्महत्त्या करू लागले आहेत. जागतिकीकरणामुळे भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या वाढल्या आहेत असे जागतिकीकरणाचे विरोधक म्हणतात.

**३) अन्नधान्यांच्या किंमतीत वाढ** – सद्या भारतात अन्नधान्याच्या (आणि इतर वस्तू व सेवांच्याही) किंमती दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. याला जागतिकीकरणच जबाबदार आहे असे अनेकांचे मत आहे. कारण जागतिकीकरणात फळे, भाजीपाला, फुले, कोळंबी, इत्यादींची

निर्यात करून अधिक नफा मिळविण शक्य होत आहे. परिणामी, बागायतदार शेतकरी व करारपध्दतीने शेती करणाऱ्या कंपन्या केवळ अशाच पिकांचे उत्पादन करण्यावर भर देत आहेत. त्यामुळे तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया इत्यादींचे उत्पादन घटून त्यांच्या किंमती वाढत आहेत. अनुदान कपातीच्या धोरणामुळे सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेतील (स्वस्त धान्य दुकानातील) अन्नधान्याच्या व इतर खाद्यपदार्थांच्या किंमतीत वाढ झाली आहे. परिणामी सर्वसामान्यांना पोट भरणे कठीण झाले आहे.

४) **जैवविविधतेचा ऱ्हास** - भारतात जैवविविधता मोठ्या प्रमाणावर आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत या जैवविविधतेचा ऱ्हास होत चालला आहे. वर म्हटल्याप्रमाणे बडे बागायतदार शेतकरी व शेती क्षेत्रातील कंपन्या ह्या केवळ निर्यातक्षम असलेल्या पीके घेत असून अन्य पीकांकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अनेक पीकांचे देशी वाण नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने उद्योजक व बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अंदाधुंदपणे वापर करीत आहेत. उद्योगधंदे, खाणी, इमारती, रस्ते इत्यादीच्या उभारणीसाठी शेतीक्षेत्रावर आक्रमण करीत आहेत. प्रचंड जंगलतोड करीत आहेत. त्यामुळे विविध वनस्पती, पशुपक्षी, कृमीकीटक यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे.

५) **लागवड क्षेत्रात घट** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतीखालील जमीनीचे क्षेत्र म्हणजेच लागवडीखालील क्षेत्र घटण्याचा धोका वाढला आहे. जागतिकीकरणात देशाची निर्यात वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्यानुसार विशेष आर्थिक क्षेत्रे (Special Economic Zones - SEZs) निर्माण करणारा कायदा भारतात २००५ मध्ये संमत केला व १० फेब्रुवारी २००६ रोजी देशभर लागू केला. सुरूवातीस या क्षेत्रांच्या निर्मितीसाठी पडीक जमिनीचा वापर करणे अभिप्रेत होते. तथापि, पुढे मात्र मोठमोठ्या उद्योगपतींनी पैशाच्या जोरावर गरिब शेतकऱ्यांच्या लागवडीखालील सुपीक जमीन अल्प मोबदल्यात गिळंकृत करणे सुरू केले. परिणामी, लागवडीखाली क्षेत्र घटू लागले, शिवाय गरिब शेतकरी भूमिहीन बनले. अनेक लोक विस्थापित झाले. यातून अनेक राज्यात विशेष आर्थिक क्षेत्रांच्या विरोधात असंतोष उद्‌भला, आंदोलने सुरू झाली, कांही आंदोलनांना हिंसक वळण लागले. परिणामी शेती क्षेत्रात अशांतता निर्माण झाली.

### ब) ग्रामीण समाजावरील प्रभाव

जागतिकीकरणाचा शेती क्षेत्रावरील इष्ट व अनिष्ट प्रभाव अभ्यासल्यानंतर आता तुम्ही जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला इष्ट व अनिष्ट प्रभाव समजावून घेणार आहात.

इतर कोणत्याही समाजप्रमाणे भारतीय समाजाचेही ग्रामीण समाज व नागर समाज असे मुख्य दोन विभाग आहेत. त्यापैकी ग्रामीण समाज हा नागर समाजापेक्षा लोकसंख्यंच्या दृष्टीने मोठा आहे. भारतात सुमारे ६.५ लाखापेक्षा अधिक खेडी असून त्यामध्ये ६८.८% इतकी लोकसंख्या वास्तव्य करते. त्यामुळे भारतीय समाज हा खेड्यांचा समाज म्हणजेच ग्रामीण समाज म्हणून ओळखला जातो. त्यामुळे जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव हा भारतीय ग्रामीण समाजावर पडलेला प्रभावासारखाच आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही.

**इष्ट प्रभाव**

**१) जगाशी घनिष्ठ संबंध –** ब्रिटिश राजवटीपूर्व भारतीय ग्रामीण समाज हा बाह्य जगापासून अलग होता. ब्रिटिश राजवटीत औद्योगिकीकरण, नागरीकरण, भांडवलशाही अर्थव्यवस्था प्रगत दळणवळण साधने इत्यादींचा प्रभाव पडून भारतीय ग्रामीण समाजाची अलगता कमी होण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तरकाळात तर बाह्य जगाशी ग्रामीण समाजाचा संपर्क वाढत जाऊन अलगता संपुष्टात येण्यास चालना मिळाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर भारतीय ग्रामीण समाज संपूर्ण जगाशी घनिष्टपणे जोडला गेला आहे. त्यामुळे जगामध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा प्रभाव भारतीय ग्रामीण समजावर पडू लागला आहे. जागतिक स्तरावरील नवे ज्ञान, नवे विचार, नव्या कल्पना, नवी मते, इत्यादींचे संक्रमण भारतातील ग्रामीण समाजाकडे हळूहळू होऊ लागले आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील परिवर्तनाची गती वाढली आहे.

**२) रोजगार संधीची उपलब्धता** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतात औद्योगिक, कृषी, सेवा या तीनही क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. या संधी ग्रामीण लोकांनाही उपलब्ध होऊ लागल्या आहेत. ग्रामीण भागातील बुध्दिमान व कर्तृत्त्ववान अशा सुशिक्षित तरुण–तरुणींना रोजगाराच्या या नवीन संधी आकर्षित करू लागल्या आहेत. या संधींचा लाभ घेऊन आपल्या करिअरचा विकास करण्याविषयीची जागृती ग्रामीण तरुण–तरुणींमध्ये हळूहळू निर्माण होऊ लागली आहे.

**३) इंग्रजी शिक्षणास चालना** – परंपरेने बहुसंख्य ग्रामीण जनता अडाणी व निरक्षर होती. ब्रिटिश राजवटीत भारतात केवळ साक्षरता प्रसारास प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या प्रसारास चालना मिळाली. ग्रामीण लोक सर्व प्रकारचे शिक्षण घेऊ लागले. तथापि, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मात्र इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणास मोठे महत्त्व आले आहे. जागतिकीकरणामुळे संगणक, माहिती–तंत्रज्ञान, व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रातील ज्ञान व कौशल्ये व रोजगार संधी मिळविण्यासाठी इंग्रजी भाषेने ज्ञान आवश्यक ठरले आहे. त्यामुळे ग्रामीण जनता देखील इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाविषयी जागृत होऊ लागली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जागृती पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी शिक्षणासाठी शहरात पाठवू लागले आहेत. एवढेच नव्हे तर जागतिकीकरणानंतर ग्रामीण भागात इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांची संख्या हळूहळू वाढू लागली आहे. त्यामुळे कांही खेड्यात विशेषतः शहरालगतच्या खेड्यांमध्ये मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या सरकारी शाळांतील विद्यार्थी संख्या घटत चालली आहे.

**४) बँकिंग सुविधात वाढ** – जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक विदशी बँकांना भारतात शाखा उघडण्याची परवानगी मिळाली. या बँकांनी भारतातील मोठमोठ्या शहरात आपल्या शाखा सुरू केल्या. त्यामुळे भारतीय बँकांना मोठी स्पर्धा निर्माण झाली. परिणामी, भारतीय बँकानी ग्रामीण भागात आपल्या शाखा उघडणे सुरू केले. त्यामुळे ग्रामीण भागात बँकिग सुविधा वाढू लागल्या आहेत. परिणामी, ग्रामीण लोकांचे बँकिग व्यवहाराचे ज्ञान हळूहळू वाढत चालले आहे.

**५) संप्रेषण सुविधात वाढ** – जागतिकीरणामुळे भारतात संप्रेषण क्षेत्रात मोठी क्रांती घडून आली आहे. टपाल, दूरध्वनी, मोबाईल, मोटार, विमान इत्यादी सुविधांचे अत्याधुनिकीकरण व विस्तारीकरण घडून आले. टेलिफोन, आयएसडी, एसटीडी, मोबाईल, इंटरनेट इत्यादी सुविधा

खेड्यापाड्यातही उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण लोकांना जगातील कोणत्याही व्यक्तीशी व संस्था - संघटनांशी संपर्क साधता येऊ लागला आहे. मोबाईल कंपन्यातील स्पर्धेमुळे मोबाईल सेवा स्वस्त होऊन खेड्यातील मजूरांच्या हातातही मोबाईल हँडसेट दिसू लागला आहे. त्यामुळे संपूर्ण जग हे आपल्या मुठीत आले आहे. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संप्रेषण सुविधांत वाढ झाल्याने भारतीय ग्रामीण समाजाचे संपर्क क्षेत्र प्रचंड प्रमाणात विस्तारलेले आहे.

६) **उपभोग्य वस्तूंचा पुरवठा–** जागतिकीकरणामुळे भारतीय बाजारपेठेत उपभोगाच्या उत्तमोत्तम वस्तू (उदा. मोटार सायकल, मोटार, फ्रिज, टि.व्ही., वॉसिंग मशिन, मोबाईल सेट, संगणक सेट, लॅपटॉप इत्यादी) वाजवी दरात विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण समाजातील सधन वर्ग त्यांचा उपभोग घेऊ लागला आहे. जागतिकीकरणाच्यापूर्वी या वस्तू केवळ शहरी समाजातील सधन व्यक्तींनाच खरेदी करणे शक्य होते. जागतिकीकरणानंतर मात्र या वस्तू ग्रामीण समाजासही उपलब्ध झाल्या आहेत.

**अनिष्ट प्रभाव**

जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर अनिष्ट (प्रतिकूल किंवा नकारात्मक) परिणाम किंवा प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **कुटिरोद्योगावर आघात** - जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील कुटिरोद्योगावर आघात झालेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक परकीय उद्योग भारतात आले. या उद्योगांकडे प्रचंड भांडवल, अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल तंत्रज्ञ आहेत. या उद्योगांशी ग्रामीण समाजातील कुटिरोद्योगांने स्पर्धा करणे शक्य नाही. त्यामुळे अनेक कुटिरोद्योग बंद पडले आहेत. शिवाय जागतिकीकरणामुळे उत्तम दर्जाच्या विदेशी वस्तू कमी किंमतीत भारतीय बाजारपेठेत विपूल प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे कुटिरोद्योगातून उत्पादीत वस्तूंना विदेशी वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. परकीय उद्योग वा कंपन्या ह्या जाहिरातीच्याद्वारे ग्राहकांना आकर्षित करतात. कुटिरोद्योगांना हे शक्य नाही. त्यामुळे त्यांच्या मालाला बाजारेपठेत ग्राहक मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटिरोद्योग बंद पडत चालले आहेत.

२) **बेरोजगारीत वाढ** - जागतिकीरणाच्या प्रक्रियेत भारतीय तसेच विदेशी उद्योगांना भारतात नवीन उद्योग उभारण्यास, जुन्या उद्योगांचे विस्तारीकरण करण्यास, परकीय तंत्रज्ञान व तंत्रज्ञ वापरण्यास परवानगी मिळाली आहे. त्यामुळे अनेक उद्योगात आधुनिक यंत्राचा व तंत्रांचा वापर होऊ लागला. परिणामी, अनेक कामगारांवर बेकारीची पाळी आली आहे. कांही उद्योगांनी कामगार कपात केली तर कांही उद्योगांनी कामगारांना स्वेच्छा निवृत्ती घेण्यास भाग पाडले. त्यामुळेही अनेक कामगार बेकार झाले. असे हे बेकार कामगार मूळचे ग्रामीण समाजातील असल्याने त्यांच्यापैकी कांहीजण परत आपल्या खेड्यांकडे स्थलांतरीत झाले आहेत. त्यामुळे ग्रामीण बेकारांच्या संख्येत वाढ झाली आहे.

३) **विषमतेत वाढ** - जागतिकीकरणामुळे उद्योग, व्यापार, रोजगार, व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रातील संधी ह्या शहरी लोकांप्रमाणेच ग्रामीण लोकांनाही उपलब्ध झाल्या आहेत. परंतू, या संधींचा लाभ उठविण्यासाठी लागणारी पात्रता, क्षमता, गुणवत्ता, साधने इत्यादी गोष्टी ग्रामीण लोकांकडे नाहीत. त्यामुळे ग्रामीण लोक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले

आढळतात. परिणामी शहरी व ग्रामीण समाजात असलेली विषमतेची दरी अधिकच रुंदावली आहे. ग्रामीण समाजातील दलित, अदिवासी, अल्पभूधारक, शेतमजूर यांना जागतिकीकरणाचा फायदा मिळालेला दिसत नाही.

**४) पर्यावरणावरील प्रभाव** - जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मोठमोठे भारतीय तसेच विदेशी उद्योगधंदे अधिक नफा मिळविण्यासाठी पर्यावरणातील साधनसंपत्तीचा अंदाधुंदपणे वापर करीत आहेत. यातूनच बेसुमार जंगलतोड होत आहे. अनेक खेडीही जंगलाजवळ वसलेली आहेत. जंगले नष्ट होऊ लागल्याने जंगलातील हिंस्र प्राणी खेड्यातील मानवी वस्तीवर तर अन्य प्राणी शेतातील पिकांवर हल्ले करू लागले आहेत. याशिवाय औद्योगिकीकरणाची गती वाढल्याने हवा, पाणी, मृदा, ध्वनी यांचे प्रदूषण वाढत आहे. याचेही दुष्परिणाम ग्रामीण लोकांना भोगावे लागत आहेत.

**५) सामूहिक जीवनावर परिणाम** - अनिर्बंध स्वातंत्र्य, व्यक्तीवाद, चंगळवाद ही जागतिकीकरणाची मूल्ये (किंवा ध्येये) आहेत. या मूल्यांचा प्रभाव ग्रामीण समाजावरही पडू लागला आहे. प्रत्येक गोष्टीचे बाजारीकरण वा व्यापारीकरण झाले आहे. लोक पैशाच्या मागे धावू लागले आहेत. परिणामी, पूर्वीच्या परस्पर सहकार्यावार आधारलेल्या ग्रामीण सामूहिक जीवनावर विपरित परिणाम झाला आहे. जागतिकीकरणातील स्पर्धेमुळे खेड्यातील 'जगा व जगू द्या' हे तत्त्व कोलमडून पडले आहे. समष्टीवादाच्या जागी व्यक्तीवादाचा प्रभाव वाढत आहे. म्हणजेच समूहाच्या हितापेक्षा व्यक्तिगत हितास प्राधान्य देण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

**६) ग्रामीण संस्कृतीवरील प्रभाव** - जागतिकीकरणाचा ग्रामीण लोकांची वेशभूषा, केशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी, भाषा उच्चारण पध्दती, अभिवादन प्रकार इत्यादी सांस्कृतिक बाबींवर प्रभाव पडलेला आहे. खेड्यातील युवावर्गात विदेशी कपडे, कोल्ड, डिंक्स मद्यपान, धुम्रपान या गोष्टी लोकप्रिय होऊ लागल्या आहेत. जीन्स, बरमोडा, टी शर्ट, हॅट, यांचा वापर वाढत आहे. भारतीय हवामानास सुसंगत नसलेली वेशभूषा व खाण्यापिण्याच्या सवयी (उदा. उन्हाळ्यात जीन्स घालणे, हिवाळ्यात आईस्क्रीम खाणे व कोल्ड डिंक्स घेणे इ.) ग्रामीण युवावर्गास लागत आहेत. संभाषणातील ग्रामीण ढंग मागे पडत असून त्यामध्ये इंग्रजी शब्दांचा वापर वाढत आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे ग्रामीण संस्कृतीवर अनिष्ट प्रभाव पडला आहे.

**★ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न : क्रमांक ३**

**अ) बहुपर्यायी प्रश्न सोडवा.**

१) १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण कोणत्या पंतप्रधानांनी जाहीर केले?

अ) राजीव गांधी ब) मनमोहनसिंग क) नरसिंहराव ड) बाजपेयी

२) भारतीय अर्थव्यवस्था ही कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था आहे?

अ) उद्योगप्रधान ब) सेवाप्रधान क) निर्वाहप्रधान ड) कृषीप्रधान

३) खालीलपैकी कोणत्या परकीय कंपनीने शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारले आहेत?

अ) आयटीसी  ब) पेप्सी  क) पिझ्झा हच  ड) वरील सर्व

४) कोणत्या साली विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधीचा कायदा भारतात संमत झाला?

अ) २००५  ब) २००६  क) २००७  ड) २००८

५) खालीलपैकी कोणते एक जागतिकीकरणाचे मूल्य आहे?

अ) समष्टीवाद  ब) चंगळवाद  क) समतावाद  ड) उदारमतवाद

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) संविदा शेती म्हणजे काय?

२) १९९१ मध्ये उद्‌भवलेल्या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताने कोणत्या संस्थांकडे कर्ज मागितले होते?

३) कोणत्या व्यवसायास भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हणतात?

४) जागतिकीकरणाची प्रमुख मूल्ये सांगा.

५) जागतिकीरणामुळे कोणत्या भाषेस महत्त्व आले आहे?

## ४.२.४ नागरी समाजावरील जागतिकीकरणाचा प्रभाव

भारतीय समाजाचे प्रामुख्याने आदिवासी समाज, ग्रामीण समाज व नागरी समाज असे तीन प्रमुख विभाग आहेत. त्यामध्ये नागरी समाज हा ग्रामीण समाजाच्या एकूण लोकसंख्येच्या दृष्टीने संख्येने लहान आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात नागरी लोकसंख्या ३१.१५ टक्के होती. आज शहरात उद्योग, व्यापार, सेवा, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इत्यादी बाबतीत अनेक सुविधा निर्माण झाल्या आहेत. दळणवळण व वाहतुकीच्या सुविधांमुळे त्याचा ग्रामीण समाजावर प्रभाव पडला. त्यामुळे ग्रामीण समाजातील लोक शहरी समाजात स्थलांतर करू लागले. म्हणजेच भारतात नागरीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिकरण व नागरीकरण या प्रक्रियांची गती खूपच वाढली. परिणामी शहरांकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती देखील मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यानंतर १९९१ मध्ये भारताने जागतिकीकरणाचे धोरण स्विकारले. या धोरणाचा प्रभाव खेड्यांपेक्षा नागरी समाजावर अधिक पडत आहे. जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासल्यानंतर आता आपण नागरी समाजावर जागतिकीकरणाचा पडलेला इष्ट व अनिष्ट प्रभाव समजून घेणार आहोत.

**इष्ट प्रभाव :**

**अ) आर्थिक क्षेत्रावरील जागतिकीकरणाचा प्रभाव :**

जागतिकीकरणाचा देशातील आर्थिक क्षेत्रावर दूरगामी प्रभाव होत आहे. नागरीकरण, औद्योगिकरण, दळणवळण व वाहतूक विस्तार, संप्रेषण क्षेत्रात वाढ, जागतिक बाजारपेठा, सेवा क्षेत्राचा विकास अशा विविध बाबी जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे विकसित होत आहेत. मूलतः जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, एखाद्या देशाचे आर्थिक व्यवहार त्याच्या भौगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारित करता येणे होय. म्हणजेच संपूर्ण जगासाठी एकच अर्थव्यवस्था निर्माण करणे होय. जागतिकीकरणामुळे नागरी अर्थव्यवस्थेतील पुढील विविध घटकांचा प्रभाव दिसून येतो.

**१) औद्योगिकरणाचा विकास :** जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रात औद्योगिकरणाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. उद्योगांची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने अनेक इष्ट निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे प्रामुख्याने परवाना पद्धतीचे निर्मूलन करणे, परकीय गुंतवणुकीस संधी, कर व्यवस्था सुधारणे, वगैरे बाबी अस्तित्वात आल्या. या गोष्टींमुळे नवीन उद्योग उभारणे, उद्योगाचे वैशिष्ट्यीकरण करणे, परकीय कंपनीसह संयुक्त उद्योग उभारणे बाबतचे स्वातंत्र्य उद्योगपतींना मिळाले. त्यामुळेच औद्योगीकरणाला चालना मिळावी. भारताचा विचार करता जागतिकीकरणामुळे भारतात अनेक परकीय तसेच स्थानिक कंपन्यांचे नवीन उद्योगधंदे सुरू झाले. उदा. फोर्ड व हुंडाई या कंपनीचे मोटार कारखाने किंवा हिंदुस्थान लिव्हर, आय.टी.सी., पेप्सी, कोका कोला वगैरे परकीय कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी स्थानिक उद्योगांनी आपल्या मालाचा दर्जा सुधारण्यास सुरवात केली. साहजिकच त्यामुळे देशी उद्योगधंद्यामध्ये सुधारणा होण्यास चालना मिळाली.

**२) उदारीकरण व खाजगीकरण :** उदारीकरणामुळे परकीय गुंतवणूक, तंत्रज्ञान, व्यावसायिक कौशल्य, कच्चा माल इत्यादींची आयात वाढून स्थानिक उद्योगांची कार्यक्षमता व स्पर्धात्मक शक्ती वाढण्यास चालना मिळाली.

खाजगीकरण प्रक्रियेमुळे आजारी असलेले सरकारी उद्योगांना वाचवता आले. हे उद्योग खाजगी उद्योजकांना चालविण्यास दिले. त्यामुळे आजारी उद्योगांना जीवनदान तर मिळालेच पण त्याचबरोबर त्यांची उत्पादकता, कार्यक्षमता व गुणवत्ता सुधारली.

**३) बाजारपेठांचा विस्तार :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत परकीय भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापन इत्यादी गोष्टींना एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात सहज प्रवेश मिळू लागला आहे. प्रत्येक राष्ट्रातील उद्योजकांना परकीय बाजारात भांडवल उभारण्यास व त्याची उत्पादने परकीय बाजारपेठेत निर्यात करण्यास परवानगी मिळाली त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होणेस चालना मिळाली. थोडक्यात जागतिकीकरणामुळे शहरात देशी उत्पादनाच्या दृष्टीने बाजारपेठा विस्तारित झाल्या आहेत.

**४) रोजगाराची संधी :** जागतिकीकरणामुळे लोकांना विशेषतः उच्चशिक्षित व कुशल व्यक्तींना रोजगाराच्या नवनवीन संधी शहरात उपलब्ध झाल्या आहेत. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, वाहतूक संप्रेषण व माहिती तंत्रज्ञानात अशा विविध क्षेत्रात असंख्य नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. आणि अशा नोकऱ्यांसाठी आवश्यक असणारे शिक्षण देणाऱ्या विविध शिक्षणसंस्थाही सुरू झाल्या आहेत. जागतिकीकरणामुळे विकसनशील राष्ट्रातील उच्च शिक्षित तरुणांना देखील देश विदेशात आकर्षक वेतन देणारे रोजगार मिळू लागले आहेत.

**५) सेवा क्षेत्राचा विस्तार :** जागतिकीकरणामुळे सेवाक्षेत्राचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. शहरामध्ये व्यापार, वाणिज्य, बँका, वित्तपुरवठा, विमा, दळणवळण, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, प्रशासन, पर्यटन इत्यादी सेवांची वाढ व विस्तार होत चालला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये शहरात संगणक, इंटरनेट, माहिती तंत्रज्ञान, संप्रेषण इत्यादी संदर्भातील सेवा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहेत. त्यामुळे शहरातील सेवा क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडून येत आहेत. (दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट इत्यादींचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही व्यक्तीशी त्वरित संपर्क साधणे शक्य झाले आहे.)

**ब) शहराच्या सामाजिक क्षेत्रावरील जागतिकीकरणाचा प्रभाव**

आर्थिक क्षेत्राप्रमाणेच नागरी समाजाच्या सामाजिक क्षेत्रातील, विविध घटकावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडला आहे. नागरीकरणामुळे नागरी समाजातील सामाजिक विजातीयता वाढत चालली आहे. शहरात विविध वंश, धर्म, जाती, भाषा व विविध व्यवसायीक लोक वास्तव्यात आहेत. त्यांचे आचार विचार, रूढीपरंपरा, श्रद्धा मुळे, जीवनशैली इत्यादींमध्ये प्रचंड विविधता आहे. जागतिकीकरणानंतर तर परकीय लोकांचेदेखील प्रमाण लक्षणीय स्वरूपात भारतीय शहरामध्ये वाढलेले दिसून येते. त्यामुळे भारतीय नागरी समाजात सामाजिक विजातियता मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे. आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनामुळे नागरी समाजात चंगळवादाचा वा उपभोक्तावादाचा प्रभाव वाढत चालला आहे. नागरी समाजात चैनीच्या वा कृत्रिम गरजा मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहेत. आणि जाहिरातीच्या माध्यमातून त्या गरजा लोकांच्या मनावर ठसविल्या जात आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडल्याने व आयातकराचे दर कमी झाल्याने भारतीय बाजारपेठेत परदेशातील असंख्य दर्जेदार वस्तू उदा. कपडे, खेळणी, दुचाकी व चार चाकी वाहने, टी.व्ही., फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल सेट, संगणक, लॅपटॉप इत्यादी वस्तू मुबलक प्रमाणात वाजवी दरात भारतीय शहरात उपलब्ध झाल्या आहेत. अशा वस्तू घरी असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात आहे. नागरी लोकांच्या मनोवृत्तीतील हा बदल लक्षणीय स्वरूपाचा आहे. चैनीसाठी व प्रतिष्ठेसाठी अगदी कर्ज काढून लोक वस्तू खरेदी करीत आहेत. शहरात विजातीयतेचे प्रमाण वाढत गेले. त्याचबरोबर जातीव्यवस्थेच्या बंदिस्त सामाजिक स्तरीकरणाच्या जागी वर्गव्यवस्थेसारखी मुक्त स्तरीकरणाची प्रक्रीया रूढ झाली आहे. जातीऐवजी व्यक्तीच्या गुणकर्तृत्वावर त्याचा सामाजिक दर्जा ठरत आहे.

**क) नागरी समाजातील शैक्षणिक क्षेत्रावरील जागतिकीकरणाचा प्रभाव**

जागतिकीकरणामुळे विभिन्न राष्ट्रातील लोक शिक्षण, रोजगार व पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने जगात कोठेही स्थलांतरीत होऊ लागले आहेत. नागरी समाजात शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन विषयक सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या आहेत. नागरी समाजात शिक्षणासाठी व संशोधनासाठी सभोवतालच्या प्रदेशातून व काही परराष्ट्रातूनही असंख्य विद्यार्थी येताना दिसतात. जागतिकीकरणात जगातील नामांकित शिक्षण संस्थांना इतर राष्ट्रात आपल्या शाखा उघडण्यास परवानगी मिळाल्याने तेथील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शिवाय या परकीय शिक्षणसंस्थांशी होणाऱ्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्थानिक शिक्षण संस्थांना आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे भाग पडत आहे. यातून शहरातील शिक्षणक्षेत्रातील सुधारणांना गती मिळत आहे. शिक्षणाद्वारे रोजगार, संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा मिळविता येते हे शहरी लोकांना उमजल्याने ते अधिकाधिक शिक्षण घेण्यासाठी प्रयत्नशील बनले आहेत.

**अनिष्ट प्रभाव**

जागतिकीकरणाचा नागरी समाजावर अनिष्ट प्रभाव किंवा परिणाम देखील झाला आहे.

**१) आर्थिक विषमतेत वाढ :** नगर समाजात जागतिकीकरणामुळे आर्थिक तसेच सामाजिक विषमता वाढत चालली आहे. शहरात एका बाजूला श्रीमंतांचे सर्वसुखसोयींनी युक्त असे आलिशान बंगले व मध्यमवर्गीयांचे डिलक्स फ्लॅटस् आढळतात तर दुसरीकडे कामगारांच्या बकाल वस्त्या व दरिद्री लोकांच्या गलिच्छ वस्त्या (झोपडपट्ट्या) आढळतात. शहरातील उच्च वर्गीय म्हणजेच श्रीमंत लोक उद्योजक, बडे व्यापारी, व्यवस्थापक, उच्चपदस्थ, प्रशासकीय अधिकारी, राजकारणी इत्यादी आणि गरीब निम्नवर्गीय लोक यांच्यात दरी वाढत चालली आहे. दुर्बल घटक जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे शहरात श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत तर गरीब वर्ग अधिक गरीब होत आहे. काही ठराविक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना लाखो करोडो रुपयाचे पॅकेज मिळत आहे. तर काही लोकांना दोनवेळचे पोटभर अन्न मिळेल इतके उत्पन्न मिळत नाही. परिणामी आर्थिक व सामाजिक विषमता वाढत आहे.

**२) बेरोजगारीत वाढ :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय तसेच विदेशी उद्योगांना भारतात नवीन उद्योग उभारण्यास, परकीय तंत्रज्ञान व तंत्रज्ञ वापरण्यास परवानगी मिळाली आहे. त्यामुळे आधुनिक यंत्र व तंत्राचा वापर होऊ लागला. परिणामी अनेक कामगारांवर बेकारीची पाळी आली आहे. शहरात परकीय वस्तूंशी स्पर्धा करू शकत नसल्याने अनेक स्थानिक उद्योग आजारी किंवा बंद पडून त्यातील कामगार बेकार बनले आहेत. लघूउद्योगांची पिछेहाट झाल्यानेही बेकारीत वाढ होत आहे. तसेच खाजगीकरणाच्या धोरणामुळेही कामगार कपात होऊन अनेक कामगार बेकार झाले आहेत.

**३) स्थानिक उद्योगांवर आघात :** जागतिकीकरण हे शहरातील स्थानिक उद्योगांना मारक ठरत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उत्तम गुणवत्तेच्या परकीय वस्तू मुबलक प्रमाणात व वाजवी दरात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत. स्थानिक वस्तूला परकीय वस्तूंशी स्पर्धा करणे शक्य होत नाही. त्यामुळे शहरातील स्थानिक उद्योगात मंदी येऊन ते आजारी पडत आहेत.

**४) कर्जबाजारीपणात वाढ :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या कर्जबाजारीपणात वाढ होत आहे. उदारीकरण व खाजगीकरण या धोरणांमध्ये परकीय भांडवल, तंत्रज्ञान, वस्तू व सेवा यांची आयात करावी लागते. आयात वाढल्याने कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढावे लागले. परीणामी नागरी समाज काळाच्या विळख्यात अडकला आहे.

**५) पर्यावरणावरील प्रभाव :** जागतिकीकरणामुळे शहरात पर्यावरणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे, बहुराष्ट्रीय कंपन्या किंवा मोठे उद्योगपती हे जास्तीत जास्त फायदा वा नफा मिळविण्याच्या हेतूने नैसर्गिक साधनसामग्रीचा स्वैरपणे वापर करत आहेत. हवा, पाणी, भूमी, ध्वनी यांचे प्रदूषण वाढवत आहेत. जंगलतोड करत आहेत त्यामुळे पर्यावरण दूषीत होत आहे. पर्यावरणाच्या समस्या निर्माण होत आहेत.

**६) सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रभाव :** जागतिकीकरणाचा शहरातील सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रावर अनिष्ट प्रभाव पडत आहे. शहरातील लोकांचे आचार-विचार, श्रद्धा, मूल्ये, सवयी, अभिवृत्ती, जीवनपद्धती, इत्यादीमध्ये अनिष्ट परिवर्तन होत आहे. व्यक्तीवाद, उपभोक्तावाद, चंगळवादी वृत्ती अशा मूल्यांचा प्रभाव वाढत आहे. राष्ट्राचे हित, सामाजिक बांधिलकी, स्वसंस्कृती अभिमान अशा गोष्टींमध्ये घट होत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक ४**

**खाली दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) २०११ च्या जनगणनेनुसार भारतात नागरी लोकसंख्या ........... टक्के इतकी होती.

अ) ६८.८ ब) ३१.१५क) ३२.३२ ड) ४०.४८

२) भारताने जागतिकीकरणाचे धोरण ........... साली स्विकारले.

अ) १९५१ ब) १९७१ क) १९९१ ड) २००१

३) नागर समाजात ............ चा प्रभाव वाढत चालला आहे.

अ) अध्यात्मवादाचा ब) चंगळवादाचा क) धर्मवादाचा ड) संस्कारशीलतेचा

४) भारतातील नागरी समाजात .................... मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे.

अ) सामाजिक विजातियता ब) सामाजिक समता

क) सामाजिक सजातियता ड) आर्थिक समता

५) नागरी समाजात ............ विषमता वाढत चालली आहे.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) शैक्षणिक ड) धार्मिक

## ४.३ सारांश

या घटकात तुम्ही जागतिकीकरणाचे सामाजिक परिणाम अभ्यासलेले आहेत. सर्वप्रथम तुम्ही जागतिकीकरणामुळे जगातील विविध राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये निर्माण झालेली विषमता किंवा असमानता समजावून घेतलेली आहे. तसेच राष्ट्रांतर्गत निर्माण झालेली विषमताही समजावून घेतलेली आहे. औद्योगिकदृष्ट्या विकसित असलेल्या राष्ट्रांना जागतिकीकरणामुळे अधिक फायदा होत असून विकसनशील राष्ट्रांना मात्र तुलनेने फारसा फायदा होत नाही असे दिसून येत आहे. जागतिकीकरणामुळे उच्च उत्पन्न असलेली राष्ट्रे व मध्यम उत्पन्न असलेली राष्ट्रे यांच्या उत्पन्नात भर पडत आहे. उलट निम्न उत्पन्न असलेल्या राष्ट्रांतील समस्यांची तीव्रता वाढण्यास हातभार लागला आहे. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांतर्गत विषमता ही वाढीस लागली आहे. जागतिकीकरणाचा फायदा हा केवळ मुठभर अशा भांडवलदार, बडे बागाईतदार, उच्च शिक्षित वर्ग, माहिती-तंत्रज्ञान व व्यवस्थापनातील तज्ज्ञ, अतिकुशल कर्मचारी इत्यादींना होत असून अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, कामगार, अनुसूचित जाती-जमाती इत्यादी दुर्बल घटक हे जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेले दिसतात. त्यामुळे श्रीमंत व गरीब वर्ग यांच्यातील दरी उंचावत चालली आहे. यानंतर तुम्ही जागतिकीकरण व भारतीय धोरण याचा अभ्यास केलेला आहे. १९९१ मध्ये भारतात आर्थिक संकट उद्भवले. या संकटावर मात करण्यासाठी भारताने जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वित्तसंस्थांकडे कर्ज मागितले. हे कर्ज देताना या संस्थांनी भारतास उदारिकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण स्वीकारावे अशी अट घातली. या अटीनुसार भारताने जून १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारले व या धोरणात या तीन प्रक्रियांचा स्वीकार केला. त्यानुसार नियंत्रण व परवानामुक्त असे औद्योगिक धोरण स्वीकारले. परकीय भांडवल, तंत्रज्ञान व तंत्रज्ञांना भारतात मुक्त प्रवेश दिला. परकीय व्यापार मुक्त केला. विनिमय दरात बदल केले. रुपयाचे अवमूल्यन केले. राजकोषीय व वित्तीय धोरणातही बदल केले. जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्त्व स्वीकारले. थोडक्यात भारताने जागतिकीकरण स्वीकारून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली. यानंतर तुम्ही जागतिकीकरणाचा शेतीवर जो इष्ट-अनिष्ट प्रभाव पडला आहे तो समजावून घेतला आहे. जागतिकीकरणामुळे कृषीउद्योगास चालना मिळाली असून कृषी मालाची निर्यात वाढण्यास मदत झाली आहे. तसेच अनेक आजारी कृषी उद्योगांना उर्जितावस्था प्राप्त झालेली आहे. संविदा शेती हा प्रकार उदयास आला आहे. अर्थात जागतिकीकरणाचे कांही अनिष्ट परिणामही होत आहेत. कृषीमालाच्या निर्यातीवर अनेक मर्यादा पडत आहेत. सामान्य शेतकरी जागतिकीकरणाच्या फायद्यापासून वंचित राहिलेला आहे. अन्नधान्य महागले आहे. जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. लागवडीचे क्षेत्र घटण्याचा धोका वाढला आहे. शेतीप्रमाणेच ग्रामीण जीवनावरही जागतिकीकरणाचा इष्ट-अनिष्ट प्रभाव पडलेला आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाज जगाशी जोडला जात आहे. ग्रामीण भागात रोजगार, शिक्षण, बँकिंग संप्रेषण इत्यादीच्या संधी वाढत आहेत. उपभोगाच्या वस्तुंचा पुरवठा वाढला आहे. अर्थात जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील कुटिरोद्योगावर आघात झाला आहे. बेरोजगारी व विषमता वाढली आहे. ग्रामीण पर्यावरण, सामूहिक जीवन व संस्कृती यावरही अनिष्ट प्रभााव पडत आहे. सर्वात शेवटी तुम्ही जागतिकीकरणाच्या संदर्भातील वादविवाद/चर्चा अभ्यासली आहे. जागतिकीकरणाची व्याख्या, फायदे तोटे, इत्यादीबाबत विचारवंतात मोठी मतभिन्नता आढळते. **डेव्हिड हेल्ड** व त्यांच्या सहकाऱ्यांनी जागतिकीकरणाच्या संदर्भातील वादविवादाच्या आधारे

विचारवंतांचे तीन संप्रदाय पाडलेले आहेत. १) संशयवादी या संप्रदायाच्या मते जागतिकीकरणास अवाजवी महत्त्व दिले जात आहे. ही प्रक्रिया पूर्णतः नवीन नाही. जागतिक अर्थव्यवस्था ही अद्याप पुरेसी एकात्म झालेली नाही. जागतिक व्यापाराचे प्रादेशिकरण झालेले आहे. २) अतिजागतिकवादी संप्रदायाच्या मते जागतिकीकरण ही वास्तविक व सर्वव्यापी घटना असून तिच्यामुळे नवीन जागतिक व्यवस्था निर्माण होत आहे. या संप्रदायाच्या मते जागतिकीकरणात राष्ट्र-राज्यसरकारांची सत्ता मर्यादित होत आहे. ३) रूपांतरणवादी संप्रदायाच्या मते जागतिकीकरणामुळे जागतिक व्यवस्था बदलत चालली आहे हे खरे पण कांही जुनी प्रतिमाने अद्याप टिकून आहेत. राष्ट्र-राज्येही नवीन व्यवस्थेशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

भारतीय समाजातील ग्रामीण समाजाप्रमाणे नागरी समाजावरदेखील जागतिकीकरणाचा खूप मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. नागरी समाजातील अर्थव्यवस्थेत विशेषतः परिणाम झाला. जागतिकीकरणामुळे नागरीकरण वाढले आणि औद्योगिकरणाला अधिक चालना मिळत गेली. नवीन उद्योगधंद्यांची वाढ झाली. पाश्चात्त्य देशालाही जगात कोठेही उद्योगव्यवसाय निर्माण करणे शक्य झाले. शहरात बाजारपेठांचा विस्तार झाला. नगरात जागतिकीकरणामुळे रोजगाराची संधी उपलब्ध होऊ लागली. व्यापार, वाणिज्य, बँका, विमा, शिक्षण, आरोग्य, पर्यटन अशा विविध सेवा क्षेत्रांचा विकास झाला. मोबाईल व इंटरनेटच्या माध्यमामुळे जग जवळ आले. सामाजिक विजातीयता, शहरात अधिक वाढली. जागतिकीकरणामुळे शैक्षणिक क्षेत्राचा विकास झाला. परराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कोणत्याही देशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली. त्यातून पुढे रोजगार,  संमत्ती, सत्ता, प्रतिष्ठा शिक्षणामुळे प्राप्त करणे शक्य होऊ लागले. जागतीकीकरणाचा इष्ट प्रभाव जसा नगरात झाला त्याचप्रमाणे अनिष्ट प्रभावही झाला. त्यामध्ये प्रामुख्याने शहरात आर्थिक विषमता वाढली, बेरोजगारीमध्ये वाढ झाली. स्थानिक उद्योगधंद्यामध्ये मंदी येऊ लागली. पर्यावरणावरही अनिष्ठ प्रभाव शहरामध्ये वाढत चालला आहे.

## ४.४ स्मरणार्थ संज्ञा

- **राष्ट्र-राज्य :** विशिष्ट भूप्रदेशात एकाच राजकीय सत्तेच्या अंमलाखाली राहणारा एकतेची भावना असलेला समुदाय.
- **परकीय व्यापार :** परकीय राष्ट्रांशी होणारा व्यापार
- **कृषी उद्योग :** कृषीमालावर आधारलेले उद्योग
- **संविदा शेती :** शेतकरी व शेतीमालाचे खरेदीदार यांच्यातील करानानुसार शेती उत्पादन व त्याचे विपणन करणे म्हणजे संविदा शेती होय.
- **जैवविविधता** : वनस्पती व प्राणी यांची विविधता.
- **संप्रेषण सुविधा :** माहिती व ज्ञान यांचे संक्रमण करणारी साधने उदा. वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, चित्रपट, इंटरनेट इ.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

१) वरीलपैकी सर्व

२) १९९०

३) वरीलपैकी सर्व

४) वरीलपैकी सर्व

५) वरीलपैकी सर्व

६) National Economic Policy

★ **स्वयं अध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) ब २) ड ३) अ ४) ड ५) ब

ब) एका वाक्यात उत्तरे

१) वास्को-द गामा

२) २४६

३) १९९१

४) जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

५) Foreign Exchange Management Act

★ **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

अ) बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे

१) क २) ड ३) ड ४) अ ५) ब

ब) एका वाक्यात उत्तरे

१) शेतकरी व शेतीमालाचे खरेदीदार यांच्यातील करारानुसार शेतीमालाचे उत्पादन व विपणन करणे म्हणजे संविदा शेती होय.

२) जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

३) कृषी किंवा शेतीव्यवसायास भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणतात.

४) अनिर्बंध स्वातंत्र्य, व्यक्तीवाद व उपभोगतावाद ही जागतिकीकरणाची मूल्ये आहेत.

५) जागतिकीकरणामुळे इंग्रजी भाषेस महत्त्व आले आहे.

**स्वयं अध्ययन ४ ची उत्तरे**

१) ब २) क ३) ब ४) अ ५) अ

## ४.६ स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.

१) जागतिकीकरणामुळे राष्ट्र-राज्यांमध्ये व राष्ट्र-राज्यांतर्गत निर्माण झालेल्या विषमतेची चर्चा करा.

२) जागतिकीकरण व भारतीय धोरण याविषयी चर्चा करा.

३) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

४) जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

५) जागतिकीकरणासंदर्भातील वादविवाद स्पष्ट करा.

६) नागरी समाजावरील जागतिकीकरणाचा झालेला प्रभाव सविस्तर विशद करा.

७) नागरी समाजातील अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचा झालेला प्रभाव स्पष्ट करा.

ब) टीपा लिहा.

१) राष्ट्र-राज्यांमध्ये असलेली विषमता

२) १९९१ चे भारतीय नवीन आर्थिक धोरण

३) २००१ चे भारतातील औद्योगिक धोरण

४) जागतिकीकरणाचा शेतीवरील इष्ट प्रभाव

५) जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावरील अनिष्ट प्रभाव

६) संशयवादी आणि अतिजागतिकवादी संप्रदाय

१) नागरी समाजावर जागतिकीकरणाचा झालेला इष्ट प्रभाव

२) नागरी समाजातील जागतिकीकरणामुळे बदललेली अर्थव्यवस्था.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


- Anthony Giddens (2008) : Sociology 5th edition, Wiley India Pvt. Ltd.
- S. S. Rolhon & S. R. Lambot – Sociology of Globalization – Commonwealth, New Delhi.
- पंडित नलिनी (२००९) जागतिकीकरण आणि भारत-लोकवाङ्मय
- सु. गो. भानुशाली : भारतीय अर्थव्यवस्थेचे निर्णायक दशक, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- सी. पं. खेर : जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
- मधुसूदन दत्तात्रय साठे : जागतिक अर्थव्यवस्था – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.


❑❑❑